शनिवार । २७ मार्च १९८२ । एक रुपया

# माणूस

## राष्ट्रीय एकात्मता : सातपुड्याच्या पायथ्याजवळची....

सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेले हजारभर आदिवासी वस्तीचे पिंपराणी गाव. शहाद्यापासून निघाल्यानंतर, समोर दिसणाऱ्या पर्वतरांगांच्या दिशेने निघाल्यानंतर अवघ्या २५ किलोमीटरवर होते. हे अंतर कापण्यासाठी आवश्यक असलेला अर्ध्या तासाचा असह्य प्रवास संपवून धूळ उडवत आमची गाडी पिंपराणीला पोचली !

भारतीय कष्टकरी संघटनेचा प्रमुख लक्ष्मण कदम व गावचे प्रमुख गुंजाऱ्या कारभारी स्वागतासाठी हजर होतेच. जंगलातील मुबलक बांबूपासून तयार केलेल्या कुडाच्या भिंती आणि छत लावून उभारलेले (मोबाइल) सभागृह, भोजनगृह आणि निवासासाठी उभारलेल्या राहुट्या असे एक छोटेसे नगरच उभारलेले होते.

पिंपराणी परिसरातले, नौघा, कनमाई, कुसुमवाडे, मडकानी, दरा, पाडळदे, फत्तेपूर, भूतिया आकाशपूर, असलोद आदी १८ गावातले सुमारे १५० आदिवासी कार्यकर्ते भारतीय कष्टकरी संघटनेच्या दोन दिवसांच्या शिबिरासाठी आले होते. दीड वर्षापूर्वी सुरू झालेले हे कष्टकरी संघटनेचे काम आता शहादा आणि तळोदा तालुक्यातल्या तीसपस्तीस गावांत जाऊन पोचले आहे त्याचे तसे हे पहिलेच शिबीर !

मार्क्सवाद्यांच्या श्रमिक संघटनेने पेटवलेला शेतकरी-शेतमजूर संघर्ष, त्यासाठी हिंसा आणि दहशतीचा मार्ग, यामुळे प्रभावित असेच हे क्षेत्र आणि अशा या संघर्षक्षेत्रात 'संघर्ष हे साध्य नसून साधन आहे. हिंसेशिवाय संघर्ष करून शोषणमुक्तीवर विश्वास ठेवणाऱ्या भारतीय कष्टकरी संघटनेने या भागात संघर्षाबरोबरच विकास आणि रचनात्मक कामाच्या माध्यमाने नवा विश्वास निर्माण केला आहे.

एक नवी वैचारिक लढाईच येथे सुरू आहे. ती फार विस्तृत व व्यापक आहे. ढोबळ फरक करायचा तर शेतकऱ्याकडून शेतमजुरांचे शोषण होऊ नये व शोषण होत असेल तेथे संघर्ष दोघांनाही मान्य; पण 'श्रमिक'ला ग्रामीण भागातला छोटा शेतकरी जो काही काळ शेतमजूरही असतो हा वर्ग शत्रु वाटतो व त्याविरुद्ध कायमचा संघर्ष पेटवून शेतकऱ्याच्या शेतातले पीक कापून, चोरून नेणे त्यांना चूक वाटत नाही तर शेती हा मुळातच आतबट्ट्याचा व्यवसाय, त्यामुळे शेतकऱ्यानेही लढावे; पण त्यासाठी शेतमजुराला उपाशी ठेवता येणार नाही. त्याला न्याय मिळालाच पाहिजे ! पोटभर अन्न, अंगभर कापड, शिक्षण, आरोग्य यांपासून त्याला वंचित ठेवणे आम्हाला अमान्यच, असे मानणारे कष्टकरी.

शेतमजुरीसाठी संघर्ष करत असताना या भागात रस्ते, पूल, धरण, आश्रमशाळा, दवाखाने आदि कामे सुरू व्हावीत म्हणूनही

## विजापूर जवळच्या एका मठात...

पृष्ठ १४

कष्टकरी शासनाशी लढतात आणि केवळ लढत नाहीत तर स्वत: पिंपराणी येथे स्वत: संघटनेने बालवाडी सुरू करून त्यानी संघर्षाला रचनेची जोड दिली आहे. गेली १०–१२ वर्षे काम करणाऱ्या 'श्रमिका'ना मात्र विकास आणि उत्थान मान्य नाही. कारण आदिवासी माणूस शिकला वा पुढारला तर त्याला कायम संघर्षाचे हत्यार बनविता येणार नाही ही त्यांची भीती आहे

हा वैचारिक सघर्ष केवळ वैचारिक राहिला नाही. सुरुवातीच्या काळात कष्टकरीच्या गावांवर हल्ले करून, मारहाण करून हे काम रोखण्याचा श्रमिक संघटनेचा हिंसक प्रयत्न आणि दहशत झुगारून आता भारतीय कष्टकरी संघटना या भागात हिंमतीने उभी आहे. श्रमिक संघटनेच्या १०–१२ बाहेरून आलेल्या पूर्ण वेळ कार्यकर्त्यांशी एकटा लक्ष्मण कदम लढतो आहे!

भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता असलेला आणि आणीबाणीत सत्याग्रह केला म्हणून ज्याला मिसात नव्हे तर अक्षरश: पोलीसकस्टडीत एक वर्ष ठेवले तो तरुण लक्ष्मण कदम! त्याचे काम पाहिले म्हणजे जणू गोरगरीब भूमिहीन आदिवासीसाठीच हा जन्माला आलेला आहे आणि तेच त्याचे जीवितकार्य आहे याची प्रचीती पदोपदी जाणवल्यावाचून राहात नाही!

शिबिराचे औपचारिक उद्घाटन नव्हते, हारतुरेही नव्हते आणि फोटोग्राफरही नव्हता, सुरुवात केली ती गावोगावच्या कार्यकर्त्यांनी माडलेल्या समस्या आणि त्यासाठी काय करावे याबाबत लक्ष्मणच्या मार्गदर्शनाने!

दुसऱ्या सत्रात युवककार्यकर्ते श्री. धरमचद चोरडिया यानी आदिवासीचे आणि दुर्गम भागाचे प्रश्न मांडले. आदिवासीना कसण्यासाठी अतिक्रमित वनजमिनी आणि पडित वनजमिनी मिळाल्या पाहिजेत व त्या शेतीला सहाय्य करून त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणले पाहिजे. प्रगती रस्त्यावरून येते; पण या भागात रस्ते नाहीत, रस्ते नाहीत म्हणून पावसाळ्यात ६ महिने जगाशी या भागाचा संबंधच तुटतो आणि त्यामुळे डॉक्टरही येत नाही. शाळामास्तरही येत नाही आणि तक्रार करायला जाण्याचा मार्गच थाबतो. त्यामुळे दळणवळण ही प्राथमिक महत्त्वाची सोय. नंतर आश्रमशाळा, दवाखाने, जोडधंदे, पाणी, वीज आदी प्रश्न त्यानी मांडले.

श्री. रतनजी मावजी या आदिवासी कार्यकर्त्याने आदिवासी बोलीभाषेत शिक्षणाचे महत्त्व विशद केले. शिक्षण नसल्यामुळे सरकारी कर्मचारी व पुढारी आपली कशी अडवणूक करतात, कशी कुचंबणा होते व आपण कायमचे मागेच कसे राहतो याविषयी सविस्तर माहिती दिली. अनुभवाचे कटु पण खरे शब्द आणि त्यातली बोच जाणवत होती.

मानववंशशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेला तरुण आदिवासी कार्यकर्ता कुवरसिंह वळवी याने आदिवासीसाठी असलेल्या शासकीय योजनाची माहिती दिली. शेती, पीक कर्ज, खावटी कर्ज, ऑइल एंजिन, आदिवसी उपयोजना व एकाधिकार खरेदी, शिक्षण, नोकऱ्या, सांस्कृतिक भजनी मंडळे आदी अनेक योजनांची अभ्यासपूर्ण माहिती त्यांनी करून दिली व त्याचे फायदे घेऊन प्रगती करण्याचे आवाहन केले.

भारतीय शेतमजूर संघटनेचे नेते व भाजपचे चिटणीस सूर्यभानजी वहाडणे कोपरगावहून खास आले होते. शेती आणि शेतमालाला रास्त भाव, शेतमजुराला १० रुपये रोज आणि एक किलो धान्य, सालदाराला ३६०० रुपये साल आदी मागण्या आणि शेतमजुरांचे प्रभावी संघटन आणि त्यांच्या दु:खांना वाच फोडण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भारतीय जनता पार्टीचे आणि शेतकरी संघटनेचे या भागातले कार्यकर्ते डॉ. कांतीलाल टाटीया यांनी 'आरोग्य आणि व्यसनमुक्ती' हा एक वेगळाच विषय मांडला, ज्याचा विचार राजकीय पक्ष आणि संघटनांना किमान आदिवासी भागात टाळून चालणार नाही. दारू आणि विडी सोडा, हे आदिवसीना न पटणारे आवाहन त्यांनी कळकळीने केले. त्याचे दुष्परिणाम समजावून सांगितले. रोग झाल्यावर डॉक्टरकडे न जाता भगतुडयाकडे (भगताकडे) तुम्ही जाता आणि तो खोटे–नाटे सागून पैसे उकळत राहतो, हेही त्यांनी सागून अंधश्रद्धावर हल्ला चढवला आणि आरोग्याची निगा कशी राखावी, हे समजून सागितले.

समारोप केला महाराष्ट्र भाजपचे चिटणीस श्री. वसंतराव भागवत यानी. समता व समृद्धीवर आधारित समाज, जो शोषण आणि अन्याय–अत्याचारापासून मुक्त असेल, हीच भारतीय कष्टकरी सघटनेची प्रेरणा आहे आणि आदिवासी, दलित, भूमिहीन शेतमजूर, छोटा शेतकरी व वंचित–उपेक्षित गरिबांसाठी आपली सारी धडपड आहे. त्यासाठी गावागावात व गिरि-कंदरातली एकही पाऊलवाट अशी राहू देता कामा नये की, जेथे भारतीय कष्टकरी संघटनेचा कार्यकर्ता पोचला नाही, असा संकल्प करून कामास गती देण्याचे आवाहन त्यांनी केले.

आमचे या भूमीवर प्रेम आहे आणि या भूमीवर राहणारा माणूस माझा आहे, त्याच्या सुख–दु:खात मी समान वाटेकरी आहे, या भावनेने व चिकाटीने काम करू. आवश्यक तेथे शासकीय योजना व गरजू आदिवासी


# साप्ताहिक माणूस

**वर्ष : एकविसावे**

**अंक : त्रेचाळिसावा**

२७ मार्च १९८२

**किंमत : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

यात दुवा म्हणूनही काम करू, असाही विश्वास व्यक्त करून त्यांनी समारोप केला.

इतके कमी खर्चातील आणि उपयुक्त असे अभ्यास-शिबिर म्हणजे एक अपवाद आणि आदर्शच. गावागावांतून बाजरी, तांदूळ-डाळ, चवळी जमवून एक वेळ उसळ, भाकरी आणि कांदा तर दुसऱ्या वेळी फक्त खिचडीचे जेवण, त्यासाठी ना ताट, ना वाटी. सागाच्या झाडाची मोठी पाने त्यासाठी होती. आंघोळीची सोय मात्र भारी उत्तम.'उनमदेव' नावाचे ठिकाण. जिथे नैसर्गिक गरम पाण्याचा झरा होता. गोमुखातून येणाऱ्या गरम पाण्याने स्नानाचा आनंद औरच होता. संपूर्णपणे निसर्गाच्या सान्निध्याचा अपूर्व आनंद होता !

२७ व २८ फेब्रुवारी या दोन दिवसाच्या कार्यक्रमात रात्री झालेल्या करमणुकीचा कार्यक्रम विसरता येणार नाही. ढोल वाजू लागल्यावर आदिवासी माणसाचे पाय स्वस्थ बसूच शकत नाहीत. ढोलाच्या तालावर समूहनृत्य, 'रोडाली' (प्रणयगीत) आणि संघटनेची भूमिका माडणारी काही गीते! 'कष्टकरी संघटना आपली पक्की करू. मालदारी आम्ही नष्ट करू', तर दुसरे ' डोगमीन दादा तुम्ही लेखा हिका दादा लेखाहिका ' म्हणजे ' डोगरच्या राजा लिहायला शिका. '

शिबिरातील भिंतीवर लिहिलेले सुविचार प्रकर्षाने लक्ष वेधून घेत होते. ' परमेश्वराला या देशात जन्म घ्यावयाचा असेल तर तो भाकरीच्याच रूपाने घ्यावा लागेल ' हे महात्मा गांधींचे वाक्य आणि त्याच्या शेजारी असलेले अटलबिहारी वाजपेयींचे वाक्य, ' जोपर्यंत भारतमातेचा एकही पुत्र उपाशी, बेरोजगार आणि निराश्रित आहे तोपर्यंत आपले स्वातंत्र्य अपुरे आहे. ' हा झाला सिद्धांत. तो राबवणार कोण आणि कसा, ह्यासंबंधीही वचने होती. एक लोकनायक जयप्रकाश नारायण यांचे–' युवक क्रांती का वाहक है। मुझे धुनी युवकोंकी तलाश है. ' दुसरे डॉ. लोहियांचे–' विचाराशिवाय आचार हे कर्मकांड आहे, तर आचाराशिवाय विचार ढोंग आहे. ' तर तिसरे पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे–'जे रस्त्याची भीती दाखवून न चालायचा सल्ला देतात त्यांचे ऐकू नका. तुम्ही जिकडे चालायला लागाल तोच रस्ता बनेल'. मला वाटतं, ह्या साऱ्या वचनांची निवड भारतीय कष्टकरी संघटनेची भूमिका स्पष्ट करणारीच होती.

आणि हा संदेश घेऊन 'आवाज कुणाचा, कष्टकरी संघटनेचा ' ही घोषणा देत पायी आलेले आदिवासी बांधव नवा संदेश घेऊन आपापल्या पाऊलवाटांनी गावोगावी परतले.

— प्रा. रवींद्र पंड्या, शहादे

# राष्ट्रीय एकात्मता : पुणे

सतीश कामत

सुमारे पंधरा दिवस स्थानिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून गाजलेली 'राष्ट्रीय एकात्मता परिषद' गेल्या २० मार्चला अखेर निर्विघ्नपणे पार पडली. पुण्यातल्या अहिल्याश्रमात झालेल्या या परिषदेचं उद्घाटन प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी केलं वयोवृद्ध, विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. सुमारे पाच हजार पुणेकरानी परिषदेला उपस्थित राहून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर इथे झालेल्या वाकताडनाचे प्रहार झेलले.

पु. ल. व तर्कतीर्थांच्या भाषणानंतर सुमारे वीस–पंचवीस वक्त्यांनी भाषणांची सरबत्ती केली.परिषदेच्या अखेरीस राष्ट्रीय एकात्मतेसाठी झटण्याचे सर्व भारतीयाना आवाहन करणारा ठरावही मंजूर झाला व 'कोणताही अनुचित प्रकार न होता' परिषद समाप्त झाली.

आता या परिषदेची उद्दिष्टं काय होती आणि नेमकं फलित काय, यावर या पुढले पंधरा दिवस–महिनाभर तरी पुण्यात लहानमोठ्या स्वरूपात वाद–विवाद, चर्चा चालू राहतील. अशा एका दिवसाच्या परिषदेने, तुफान भाषणबाजीने संयोजकांना अपेक्षित असलेली 'राष्ट्रीय एकात्मता' साधली जाणार नाही, याची जाणीव त्यानाही आहे. ही परिषद म्हणजे कशाची तरी सांगता नसून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रयत्नांची सुरवात आहे, असंही एक वक्ते म्हणाले. पण मग प्रयत्नांची पुढली पायरी कोणती, याचं सुस्पष्ट उत्तर तरी ते आज देऊ शकतील, असं वाटत नाही.

परिषदेनिमित्त पुण्यात गेले पंधरा दिवस झालेले परिसंवाद, सभा, मेळावे, त्यामध्ये मांडले गेलेले विचार मुख्यत्वे स्थानिक वृत्तपत्रांच्याच ('सकाळ व 'केसरी') माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत पोचले. पण त्याची किंवा प्रत्यक्ष परिषदेची पुण्यातल्या सुशिक्षित वर्गाने फारशी दखल घेतल्याचं जाणवलं नाही. त्यापैकी एका गटाने असा निर्णय देऊनच टाकला होता की, (हा गट कट्टर हिंदुत्ववाद्यांचा नव्हता) ही परिषद म्हणजे, गेल्या महिन्यात विश्व हिंदु परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जनजागरण अभियानाला दिलेलं 'प्रत्युत्तर' आहे. 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर यांनी आपल्या संपादकीयात, 'हिंदू' शब्दाच्या द्वेषातून या परिषदेचा जन्म झाल्याचा आरोप केला व त्याच्या जोडीला हिंदुत्ववाद्याना या विषयावरील वादात अतिशय उपयुक्त ठरेल, असं तर्कसुसंगत आर्ग्युमेंटही दिलं. (२० मार्च, 'माणूस')

पण या परिषदेचा संबंध अशा तऱ्हेने केवळ गेल्याच महिन्यात घडलेल्या घटनाशी लावणं योग्य होणार नाही, असं वाटतं. तिचं मूळ शोधून काढण्यासाठी किमान जवळजवळ एक वर्ष तरी मागं गेलं पाहिजे.

गेल्या वर्षी याच सुमारास मीनाक्षीपुरमला काही हिंदु धर्मीयानी मुस्लिम धर्माचा स्वीकार केला आणि सबंध देशात भूकंपाचा फारसा तीव्र नसला तरी धक्का जाणवावा, इतपत लहर उमटून गेली.पैशाच्या प्रलोभनातून हे धर्मांतर झालं असल्याचा निवाडा करून आत्मसंतुष्ट हिंदुत्ववादी पुन्हा स्वस्थचित्त झाले. पण इतर अनेक विचारवंताना, राजकारण्यांना (यातही काही हिंदुत्ववादी आहेत) या घटनेनं झोपेतून उठवल्यासारखं जागं केलं. आपल्या तत्त्वज्ञानाच्या पोथ्यांवरची धूळ झटकून या घटनेचं 'तटस्थ, सम्यक् विश्लेषण व अन्वयार्थ' ही प्रक्रिया करण्यात आली. धर्माला अफूची गोळी मानणाऱ्या डाव्यांनाही या घटनेची 'किक' जरा जास्तच बसली. माणूस म्हणून जगण्याच्या तीव्र ओढीतून संबंधित लोकांनी हे कृत्य केलं, या साध्या सरळ निष्कर्षाप्रत येण्यास अनेक मंडळींचं जवळजवळ एक वर्ष खर्ची पडलं !

पण या निष्कर्षामुळे अस्वस्थता जास्तच वाढली. म्हणजे आम्ही काय यांना माणूस म्हणून वागवत नव्हतो की काय, असं आपापसातच विचारणं सुरू झालं. त्यातच प्रा. लक्ष्मण मान्यानी, 'आम्हाला अतिशय अमानुष वागणूक देणाऱ्या साडेतीन टक्के (की तीन टक्के ? ) लोकाच्या या देशाला आम्ही आमचा देश का म्हणायचं,' असा बाँब टाकला आणि जास्तच भडका उडाला !

पृष्ठ २४ वर

मुंबई वार्ता

# गंगाविहारच्या चौथ्या मजल्यावर

गॉड सदाचारी साईबाबाजी हे दिल्ली-निवासी स्वामिजी मुबईत' आले असून दर्शनार्थी भक्तासाठी उपलब्ध आहेत, अशा आशयाच्या जाहिराती बरेच दिवस वर्तमान-पत्रातून येत होत्या. निरनिराळ्या संदर्भात राजकीय वजन असणारे. स्वामीजी म्हणून त्यांची ख्याती ऐकलीच होती. तेव्हा अशा या महात्म्याची मुलाखत 'माणूस'च्या वाचका-साठी घ्यायलाच हवी, म्हणून फोन करून वेळ ठरवली. संपादकांचं अ‍ॅथॉरिटी लेटर वगैरे काही नसतानाही थेट टॉप बॉसपर्यंत 'डायरेक्ट अ‍ॅक्सेस' मिळाला! कारण, पूर्वी अशा एका ठिकाणी, व्यक्तिश: थेट वरपर्यंत जाण्याची परवानगीही मिळाली. नव्हती! असो. प्रस्तुतच्या स्वामीजींच्या मुलाखतीच, निख्खळ आणि निरुपद्रवी (?) करमणूक करण्याचं कलामूल्य इतक्या उच्च दर्जाचं आहे की, कुठल्याही टीका-टिप्पणी अथवा शेऱ्याविना ती इथे जशीच्या तशी पेश करत आहे.

मस्जिदच्या अति गजबजत्या व्यापारी बाजारपेठेत अध्यात्माचं हे कॉंपॅक्ट दुकान खोललेलं होतं. गंगाविहार इमारतीच्या पाचव्या मजल्यावर गोडाउनवजा--कार्या-लयासारख्या दिसणाऱ्या एका हॉलमध्ये बऱ्याच भक्तगणाचा मेळावा भरला होता. ही सर्व मंडळी जनरल दर्शनवाली! खाली चौथ्या मजल्यावर फक्त पूर्वनियोजित भेटी असणारे. तोही क्यू भला मोठा! कारण स्वामीजीच्या तुऱ्यात अनंत पिसं. ते काय नाहीत? प्रसिद्ध आतरराष्ट्रीय महात्मा, ज्योतिषी, योगी, तांत्रिक, (शिवाय वाचकांनी काही आपल्या मनानं या यादीत अ‍ॅड केलं तरी चालेल!) भगवानदास आणि कंपनी नामे कुणा एका कंपनीचं ते रेग्युलर ऑफिस होतं आणि दहा-वीस दिवस सगळं या धर्म-कार्यार्थ वाहिलेलं असावं डनलॉपचे सोफे आणि सनमायकान सजवलेली छोटी वेटिंगरूम. तरीच वर्दळ. लगबगीनं वावरणाऱ्या दोन-तीन स्मार्ट सेक्रेटरी, असिस्टंट! सतत खण-खणणारा फोन. 'स्वामीजीने आपको मंत्र दिया होगा, वही बायहार्ट करना है. नहीं दिया है? ठीक है, लिख लीजिये. एक ग्लास में पानी लेके हंड्रेड अँड एट टाइम्स बोलिये-ओम् सदाचारी शिवाय नम.। बाद में वही पानी पीजिये' इत्यादि प्रकारची संभाषणं फोनवर चालू होती. सफारी घातलेला एक चटपटीत, प्रौढ अमुकजी 'प्रशाद तथा विभूती डिस्ट्रिब्यूशन' वगैरे बघत होता. एका कॅमेरा धारक भक्ताची शांतता व सुव्य-वस्था राखून बिन अपॉइंटमेंटवाल्यावर खेकसण्यासाठी खास नेमणूक झाली होती. रीतसर गांजलेली काही मंडळी डेंटिस्टच्या वेटिंगरूममध्ये बसल्यासारखी गालाला हात लावून बसली होती. उरलेली, हातातली मिठाईची, हारांची, फळाची पुडकी संभाळीत 'मॉडेलिंग की लाइन तो तुम्हे बहुत सूट होगी' वगैरे नॉन-आध्यात्मिक चर्चा करत होती. प्रत्येकाला एकेक फॉर्म भरायला देण्यात आला होता. त्यामध्ये 'नाव, वडिलांचं नाव, व्यवसाय, पत्ता, फोन नंबर, मोटरकार नंबर, समस्या आणि आवडता देव' वगैरे तपशील भरायचे होते; अखेर माझा नंबर लागला तेव्हा नियोजित वेळेहून चार तास उशीर झाला होता! मध्यंतरीच्या काळात स्वामी-जींची, व्यवस्थापन करणाऱ्या भक्ताशी चर्चा चालल्याचं ऐकू येत होतं, की संध्याकाळच्या भजनात धृपदात ओम् सदाचारी नम. हे कसं बसवता येईल इत्यादी. छताला काळ्या काचा लावलेली, सात-आठ फोन असलेली स्वामीजींची कॅबिन ही, हिंदी पिक्चरमध्ये शेवटपर्यंत स्वरूप अज्ञात रहाणाऱ्या एखाद्या 'शाकाल'च्या कॅबिनसारखीच होती. एवढं म्हटलं की वर्णनाचे तपशील वाचतील. स्वामीजी तरुण. दाढी-जटांचं भयंकर जजाळ मनगटावर डिजिटल वॉच. बॉस्कीची पायघोळ केशरी कफनी फिरत्या एक्झिक्युटिव खुर्चीत बसलेल्या स्वामींनी खाली बसायचा आदेश दिला!

स्वामीजीच्या कार्यक्षेत्राची अगोदरच कल्पना असल्यानं फुटकळ प्रश्नात वेळ न दवडता सरळच त्यांच्या इभ्रतीला शोभेलसा प्रश्न विचारला, या देशात एवढं दारिद्र्य, भ्रष्टाचार, अनागोंदी का आहे? या परि-स्थितीतून देशाला कस बाहेर काढता येईल?

'करणारी अशी या देशात फक्त एकच व्यक्ती आहे, ती म्हणजे इंदिरा गाधी. तीही नारी अबला, सुकोमल एकटी करून-करून किती करणार? तिचे सगळे मंत्री, मुख्य-मंत्री एकजात मूर्ख आहेत तरी पण मी आहेच पाठीशी, त्यामुळे सुरळित चाललंय.

पाठीशी आहात म्हणजे काय?

'करंट सोडण्याच्या माझ्या शक्तीनं मी गोष्टी बदलत असतो. खेरीज मंत्र्यांची नेम-णूक, हकालपट्टी, आर्थिक योजना या साऱ्या-वर मी तिला सल्ले देतो. १९७७ सालपासून तर ती माझी संपूर्ण भक्त आहे. नेहरू घरा-ण्यातला पहिला यज्ञ मी तिच्यासाठी घडवून आणला. चांगली आस्तिक बाई आहे ती. संजय गांधी मात्र नास्तिक होता.'

तरी पण तुम्ही असताना संजय गाधीचा मृत्यु कसा झाला?

'अरे डेथ कहाँ, उसे तो धीरेन्द्र ब्रह्म-चारीने मारा!' आतली बातमी उघड करत स्वामीजी म्हणाले, 'मला हे आधीच कळलं होतं. मी सागितलंही होतं त्याला. पण मी दिल्लीत असेपर्यंत घेतली त्यांनी सावधगिरी. अब मैं कहाँ तक उसके पीछे घुमूं? मुझे तो पूरे वर्ल्डकी चिंता है मी गेलो दिल्लीतून आणि झाला अपघात!'

एक संजय गांधी जरी नास्तिक असले, तरी बाकीचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नेते मात्र तसे नाहीत. हां, कारण त्यातले किती तरी स्वामीजीचे 'बहुत अच्छे भक्त' आहेत. झैलसिंग, कमलापती त्रिपाठी, नरसिंह राव बुटासिंगपासून ते थेट भिंदरपर्यंत हे सारे राष्ट्रीय पातळीवरचे खेरीज ब्रेझनेव, मार्गरेट थॅचर इत्यादि मंडळीपण त्यांना मानून आहे. 'जनरल झियाना मी १९८० मध्ये पत्र लिहिलं होतं, की 'भारताबरोबर युद्ध वर्ज करार करा म्हणून' युद्ध वर्ज कराराची कारण परंपरा सागताना स्वामीजी म्हणाले. अर्थातच झिया स्वामीजीचे 'बहुत अच्छे

भक्त' असणार !

रेगनचं नाव स्वामीजी विसरले असावेत या कल्पनेनं मी त्याना तशी आठवण करून दिली. 'अहो रेगनच काय, राजा वीरेन्द्र, वाग चुक जयवर्धने हे सगळेच माझे शिष्य आहेत. देशात आणि परदेशात, दोन्ही ठिकाणी माझे सर्वाधिक भक्त आहेत. भारतीय महात्म्यामध्ये मी सर्वाधिक लोकप्रिय आणि प्रसिद्ध महात्मा आहे' स्वामीजींनी स्वतःबद्दल अधिक माहिती पुरवली.

तुमचं मिशन काय ? तुमच्यात एवढी बरीच शक्ती आहे, त्याच्या सहाय्यानं काय करायचा तुमचा इरादा आहे ?

स्वामीजींचं हे मिशनही त्यांच्यासारखंच अगडबंब !

'माझं मिशन केवळ भारतापुरतं मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीशी संबंधित आहे. ये पूरीकी पूरी जनरेसन मुझे चेंज करनी है। आता ही 'जनरेसन' चेंज करायची म्हणजे ओल्ड जनरेसनला मारून टाकायचं असं नाही हं–मला नीट समजावून सांगत स्वामीजी म्हणाले ' जनरेशन चेंज करायची म्हणजे सगळ्यांची मन बदलायची. हृदयपरिवर्तन घडवून आणायचं. मी अगदी प्रॅक्टिकल महात्मा आहे. तात्त्विक चर्चेपेक्षा थेट मनच बदलावीत अशी माझी धारणा आहे. आता पहालच तुम्ही मी करंट सोडीन आणि फटाफट माणसं बदलतील. त्यायोगे जगात शांतता नांदेल. मी करंट सोडल्यानं जगातली ९९% गुन्हेगारी कमी होईल आणि ९९% अहिंसा, शांतता नांदू लागेल! आणि हे सगळं ८–१० वर्षात घडून येईल. खरं म्हणजे आताच जगाच्या किती तरी भागात शांतता आलेली सुद्धा आहे !'

स्वामीजींचा आशावाद ग्रेटच होता.अर्थात त्यांच्याकडे पॉवरबाज करंट असल्यामुळे हा आशावाद योग्यच असणार. आतापर्यंत तुम्ही काय काय चमत्कार केलेत असं विचारलं, तेव्हा माझ्या या बाळबोध प्रश्नाचं स्वामीजींना हसूच आलं.

'अरे भाई, चमत्कार तो रोजके ही है, कितनो की गिनती रखे ! रोजच मी चमत्कार करतो. तरी त्यातल्या त्यात नावचं घ्यायचं म्हटलं, तर मी इराण–इराकचं युद्ध थांबवलं. आणीबाणीनंतर इंदिरा गांधीबद्दल लोकांच्या मनात चीड होती. पण मी करंट सोडला, आणि त्या तिरस्काराचं आपुलकी आणि प्रेमात रूपांतर झालं. नंतरची निवडणूकही मी तिला जिंकून दिली !

'आणखी एक महत्त्वाचा चमत्कार म्हणजे १९७८ साली मी स्कायलॅब कुणावर पडण्यापासून वाचवलं. त्या वेळी मोरारजींचं सरकार होतं (मोरारजी स्वामींचे भक्त आहेत हे सांगणे नकोच) सगळं सरकार, सारं जग आणि शास्त्रज्ञ भयभीत झाले होते. पण मी अशी व्यवस्था केली की, स्कायलॅब फक्त समुद्रातच पडावी. सगळे जग चकित झाले. शास्त्रज्ञ म्हणाले, जिथे आमचं शास्त्र उणं पडतं, तिथं स्वामीजींचाच दिलासा असतो !!'

या स्पेशल चमत्काराबरोबर स्वामीजींचे रूटिन आणि ऑर्डिनरी चमत्कारही असतातच. कोर्टात केस जिंकून देणं, रोगमुक्त करणं, नोकरी मिळवून देणं, गरजूंना इच्छेनुसार मंत्री–मुख्यमंत्री–पंतप्रधान करणं हे स्वामीजींच्या लेखी डाव्या हाताचा खेळ आहेत !

स्वामीजींच्या या थोरवीने मी आतापर्यंत पुरेशी गारद झाले होते. फक्त एकच प्रामाणिक शंका होती–ही शक्ती करंट वगैरे गोष्टींचा स्वामीजींना लाभ कसा झाला ? काही अभ्यास केला का ?

'छे, छे अभ्यास वगैरे नाही, मैं तो इस फील्ड में बचपन सेही हूँ. जब मैं छोटा था, तभीसे मैं महात्मा हूँ' अभ्यास वगैरे मध्यमवर्गीय वस्तु अंगावरून झटकून टाकत स्वामीजी म्हणाले. खेरीज महात्मा वगैरे शब्द ते ज्या पद्धतीनं वापरत होते, त्यावरून त्यांच्या लेखी महात्मा हे काही विशेषण वगैरे नसून सामान्य नाम असावं. काही माणसं शिक्षणानं डॉक्टर–इंजीनियर असतात, काही व्यवसायानं बँक ऑफिसर असतात, तशी काही 'महात्मा' असतात. त्यामुळे, 'सर्व भारतीय' डॉक्टरांमध्ये मी अधिक लोकप्रिय आहे' असं एखाद्या डॉक्टरनं म्हणावं, त्या धर्तीवर 'मैं सबसे पाप्युलर इंडियन महात्मा हूँ' असं स्वामीजी म्हणत होते.

'माझी या क्षेत्रातली करियर बरीच आहे. माझ्या जन्मानंतर पाच मिनिटांनी माझ्या शरिरातून कुंकू, चंदन, विभूती निघायला लागली. शिवाय मी इंग्लिश, हिंदी, उर्दू, गुजराती वगैरे सव भाषांतून बोलायला लागलो' हे बोलताना तर दस्तुरखुद्द स्वामीजींना पण हसू आवरत नसावं असं मला वाटलं. 'काय बाकी आपण थापा मारतो आणि पब्लिक बनतं !' असं बहुधा त्यांच्याही मनाला चाटून गेलं असावं !

नंतर अन्य महात्मा मंडळींचा विषय निघाला. धीरेन्द्र ब्रह्मचारींची करियर संपुष्टात आल्याचं त्यांनी मला ठासून सांगितलं. "आणीबाणीनंतर सपलाच तो ! सेक्स वगैरे भानगडीत अडकला ना. ये सेक्सका चक्कर महात्मा लोगोके लिए एकदम खराब रहता है"–मला ट्रेड सिक्रेट सांगत ते म्हणाले, " मग त्याचं कोणी नावही घेईना. एका रात्री माझ्याकडे आला आणि खूप रडला. म्हणाला, काही तरी करा माझ्यासाठी! मग मीच केली इंदिरेकडे रदबदली त्याच्यासाठी."

"हरेरामच्या प्रभुपादस्वामींविषयी काय मत आहे तुमचं ?"

"प्रभुपादस्वामी ? अहो, ते इंजिनियर होते कलकत्यात. मला येऊन म्हणाले, मला काही तरी करायचंय; पण पैसेच नाहीत. मग मी ५०,००० ची देणगी मिळवून दिली, आश्रम काढून दिला त्यांना. म्हटलं, आता मात्र संभाळा तुमच तुम्ही !"

रजनीशबद्दल काय ?

"रजनीशचं काय आहे, व्यासंग वगैरे बरा होता त्याचा; पण महात्मा नव्हता तो ! मी पुष्कळ उपदेश करायचो त्याला. सरळ सांगितलं, ये सेक्स का लफडा इंडिया के लिए अच्छा नहीं ! त्याला म्हटलं, तू इथून नीघ. अमेरिकेला जा, जाईना ! तेव्हा मी म्हटलं, माझी पॉवर वापरून बाहेर काढीन. तेव्हा गेला मग. करतो काय ? आणि आता नाही तरी त्याची डेथच झालीये !'

–हे कसं काय कळलं तुम्हाला ? काही पत्र, फोन, निरोप वगैरे आलं, की तुम्ही करंट सोडून जाणून घेतलंत ?

"ये पता लगाने के लिए करंट की कुछ आवश्यकता नहीं है"–स्वामीजींनी विषय झटकून टाकत म्हटलं. " मला विनोदचा फोन आला अमेरिकेतून.–विनोद म्हणजे आपला विनोद खन्ना हो ! मूळ माझा भक्त ! मीच म्हटलं, ऐकत जा मधून मधून रजनीशची प्रवचनं वगैरे.–तर सांगत काय होतो, विनोदचा फोन आला की रजनीश सध्या

भेटत वगैरे नाहीत. तेव्हाच मी म्हटलं, उनकी तो डेथही हुई होगी. अभी जो उधर है, वो तो उनका डुप्लिकेट है. अमरिकावाले तो क्या किसीका भी डुप्लिकेट बना देते हैं!" –माझ्या सामान्यज्ञानात भर घालत स्वामी म्हणाले.

मुलाखतीच्या अखेर 'पर्सनल टच' देण्यासाठी म्हणून स्वामीजींनी जादू-इ-मतर करून तळहातातून एक गणपतीची प्रतिमा मला काढून दिली. मला चागलं 'उज्ज्वल भवितव्य' मिळवून देण्याचं प्रॉमिस केलं आणि मग जराशानं आठवण येऊन, ज्या साप्ताहिकासाठी मी लिहिते आहे, 'उसका भी सर्कुलेसन खूब बढेगा!' असा आशीर्वाद दिला.'

अनंतकोटिब्रह्माडनायकाची ही भेट संपवून मी बाहेर पडले, तेव्हा रात्र बरीच झाली होती. भोवतीची गजबजती बाजारपेठ आता सुनी झाली होती. गल्लीबोळातून दिवसभराच्या दगदगीनं श्रमलेले ट्रक्स गुपचूप उभे होते. कामंधामं आटपून पेढयांवरचे शेटजी, मुनीमजी आणि कष्टकरी लगबगीनं घरी निघाले होते. रस्त्यावर साडलेलं धान्य वेचणाऱ्या भिकारी बाया–पोराचीच काय ती गडबड होती! गंगाविहारच्या चौथ्या मजल्यावरचा झगमगता करंट वगळला, तर बाकी सारा अंधार होता!

–ललिता बर्वे

---

# 'मुंबई सकाळ' कोंडी फुटण्याच्या मार्गावर

---

समाजप्रबोधन करणाऱ्या घटकांमध्ये संप किंवा टाळेबंदी घडवून आणावी किंवा नाही या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपली आहे. लोकशाहीमध्ये वृत्तपत्रे ही जबरदस्त शक्ती मानली जाते. इतकी की, त्याला कुणी तरी आपला आत्मा म्हणावे! सकाळच्या प्रहरी उठल्याबरोबर प्रथम चहा नाही मिळाला तरी चालेल; पण येथील नागरिकाना प्रथम वृत्तपत्र हवे असते. त्याविना त्यांना चहाच गोड लागत नसतो!

गेल्या काही वर्षांपासून मुबईला संप आणि टाळेबंदीने पुरते ग्रासले आहे. आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी, कामगार, मालकाना जेरीस आणण्यासाठी अशा प्रकारे सहा–सहा महिने संप करत असतात. तर अमुक एका नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपले कामगार गेल्याने कारखान्यात दहशत वाढेल म्हणून येथील मालक टाळेबंदीचाही अशाप्रकारे उपयोग करतात!

या गोष्टीपासून मुंबईतील वृत्तपत्रेही सुटली नाहीत. ज्या टाइम्सचा इतका मोठा गवगवा आहे, त्या टाइम्समधील कामगारांनीही आपल्या मागण्यासाठी गेल्या वर्षी संप केला. हीच प्रक्रिया नवशक्ती–फ्री प्रेसमध्ये घडली. येथील कामगारानी आपल्या मागण्यांसाठी मोठा लढा दिला. नंतर हे लोण मुबईच्या एक्स्प्रेसपर्यंत येऊन पोहचले आणि अखेर 'मुंबई सकाळ!'

कामगाराना पालेकर लवादानुसार कोणती श्रेणी द्यावी ह्या मुद्द्यावरून 'मुबई सकाळ'मध्ये सध्या कोंडी निर्माण झाली आहे. या कामगारानी आपल्या मागण्यासाठी १६ जानेवारीपासून येथे संपही सुरू केला आहे.

पण कामगारांचा हा पहिलाच संप नव्हे. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये याच कारणासाठी त्यांनी संप सुरू केला होता व तो दीड महिना चालला होता; पण त्या वेळचे मजूरमंत्री श्री. तिडके यांनी याबाबतीत समेट घडवून आणून हा प्रश्न लवादाकडे सोपवण्याचे ठरवले. कामगारांनी तिडक्यांच्या म्हणण्याला मान दिला आणि ते कामावर परतले.

याच दरम्यान आणखी एक घटना घडली. सकाळमधील कामगारानी आपणाला मिळणाऱ्या वेतनाबाबत असंतोष प्रकट केल्यानंतर व तो कृतीत आणल्यानंतर व्यवस्थापकानी त्याना पालेकर लवादाची द्वितीय श्रेणी लागू केली. वास्तविक त्या वेळेपर्यंत मुबई आणि पुण्याचे दोन्हीही 'सकाळ' एकाच व्यवस्थापनाखाली चालत होते. दोन्हीचे जमाखर्च, ताळेबद एकत्र दाखवले जात. कामगाराना नेमणुकीचे पत्र पुण्याहूनच मिळत असे. मॅनेजर–चेअरमन हे एकच होते. म्हणून 'मुबई सकाळ'मधील कामगारानी आपणासही पालेकर अॅवॉर्डची द्वितीय श्रेणी मिळावी ही रास्त मागणी केली; पण पालेकर अॅवॉर्ड येताच या दोन संस्था वेगवेगळ्या दाखवण्यात आल्या!

या वेळेपर्यंत हे सर्व १५० कामगार सीटूचे श्री. कोल्हटकर यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यासाठी लढा देत होते. या कोल्हटकरांच्या युनियनने व्यवस्थापकाबरोबर दोन करार केले होते. पैकी एक सानुग्रह अनुदानाचा तर दुसरा अॅडहॉक इन्क्रीमेंटबाबतचा होता! हे जरी करार झालेले असले तरी हा प्रश्न अखेर लवादाकडे सोपविला होता.

त्यानुसार न्यायालयाने आपला निकाल दरम्यानच्या काळात जाहीर केला. या काळात २० टक्के बोनस मिळावा ही मागणी पुढे आली. व्यवस्थापनाने कामगारांना १४ टक्के बोनस दिल्यानंतर हा प्रश्न न्यायालयात नेण्यात आला. न्यायालयाने कामगाराची मागणी अवैध असल्याचा निर्णय दिल्यावर ६ टक्के रक्कम पगारातून कापून घेण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला. या निर्णयाला कामगारांनी जोरदार विरोध तर दर्शवलाच परंतु ज्या कोल्हटकरांच्या करारामुळे हे झाले त्या कोल्हटकर युनियनलाच कामगारांनी सोडचिठ्ठी दिली आणि शिवसेनेच्या भारतीय कामगार सेनेत हे कामगार दाखल झाले.

शिवसेनेच्या नेतृत्वाखाली येताच कामगारांनी १ जानेवारीपासून आपण संपावर जात असल्याची नोटीस दिली पण प्रत्यक्षात त्यानी १६ जानेवारीपासून संप सुरू केला. म्हणजे हा संप कायदेशीर की नाही, हा परत प्रश्न आलाच.

संप सुरू होऊन आता पुरते दोन महिने लोटल्याने 'मुंबई सकाळ' लवकर सुरू होण्याच्याच दृष्टीने सर्वांचे प्रयत्न चालले आहेत. या कामगारांना सध्या पालेकर अॅवॉर्डची पाचवी श्रेणी मिळते. ती दुसरी मिळावी ही त्याची प्रथमतः मागणी होती. पण ती मिळणे अशक्य कोटीतील असल्याने कामगारांनी द्वितीय श्रेणीची मागणी तर सोडलीच पण तृतीय श्रेणीची मागणीही त्यानी आता सोडून दिली आहे. चतुर्थ श्रेणी मिळाली आणि प्रत्येक कामगाराला दोन वेतनवाढी (इन्क्रिमेंटस्) मिळाव्यात ही आता कामगाराची मागणी आहे.

पालेकर अॅवॉर्डचा गेल्या दोन वर्षांपासून मुंबई सकाळमध्ये जो घोळ चालू आहे त्यातून मार्ग काढण्यासाठी कामगार उपमंत्री शेरेकर

पृष्ठ २४ वर

## उत्तरमीमांसा : ४३ :

स. शि. भावे

# आज स्वस्त, उद्या महाग !

सिमेंट खुले झाले. नव्या वर्षाची चांगली बातमी.

नव्या बांधकामांचे संकल्प जाहीर करणाऱ्या जाहिराती वृत्तपत्रात लगेच झळकू लागल्या आहेत. या जाहिराती सुबक असतात. देखण्या असतात. बंगल्यांची, फ्लॅटस्‌ची रेखीव, आकर्षक चित्रे त्यांत असतात. कंपाउंड, झाडे, पार्किंग स्पेसमध्ये उभ्या असलेल्या मोटारी—सारे झकास असतें सारे जिथल्या तिथे !

आपण अक्षरशः हुरळतो. उद्या, नाही परवा, हे सारे आपले होणारच, असा भरंवसा गळयात दाटतो. आपण पुन्हा जाहिरात पाहतो. आपली उणीपुरी शिल्लक आठवतो. पुन्हा जाहिरात पाहतो. वाचतो : ' साठ टक्के कर्ज मिळवून देण्याची हमी.' शिल्लक आणि भावी कर्ज. यांचे आकडे जुळतात. बेरीज होते. आपण सुखावतो. मागे रेलून बसतो. एक सिगरेट मोकळघा मनाने शिलगावतो. बजेटच्या पलीकडे जाणारा धुराचा पहिला गच्च लोट तोंडातून सोडतो.

बंगला म्हणा, फ्लॅट म्हणा, आपल्या डोळघासमोर तयारच झालेला असतो. आता फक्त ठरवायचे असतात रंग. भिंतीचे, दाराचे, खिडक्यांचे रंग. खिडक्यांच्या पडद्यांचे रंग, बंगल्याच्या नावाच्या पाटीचे रंग !

बंगल्याचे नाव. होय, बंगल्याला कसे छान नाव हवे, छान म्हणजे वेगळे. 'पर्वतीदर्शन' वगैरे नको. 'श्रमसाफल्य'ही नको. नाव छान हवे. वेगळे. कोरे करकरीत. नावाची पाटी लोखंडी नको. लाकडी पॉलिश केलेलीही नकोच खोडातून काढलेली वेडीवाकडी ढलपीच हवी. त्या ढलपीवर तशीच सहज, वेडीवाकडी अक्षरे !

पाटी बंगल्याच्या कपाळावर नाही ठोकायची. कपाउंडच्या आत, नव्हे. गडग्याच्या आत, एक वेडेवाकडे वाढलेले झाडाचे खोड. फक्त खोडच. तर त्या खोडाला सहजपणे ठोकलेली नावाची पाटी. सगळे कसे स्वाभाविक. अनौपचारिक, अकृत्रिम, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेला बंगला. त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेले नाव. तितकेच स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली नावाची पाटी. आणि बंगल्यात राहणारे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे आपण. ¤

स्वतंत्र व्यक्तिमत्त्व ! आपण हसतो.

आपले व्यक्तिमत्त्व स्वतंत्र खरे. पण ते सिमेंटमध्ये बसले पाहिजे. सिमेंट आता खुले झाले. म्हणून व्यक्तिमत्त्व खुले. उद्या सिमेंटवर पुन्हा नियंत्रण आले की व्यक्तिमत्त्वावरही नियंत्रण येणार !

सिमेंट खुले झाले. पण कोणासाठी ? तर सत्तर रुपये देऊ शकतात त्यांच्यासाठी. मग आपणाला सिमेंट कुठले. का ? कोटघातले. ३५ रुपयेवाले सिमेंट आपल्यासाठीच नाही का ? छे, छे. खुले सिमेंट जे घेणार त्यांनाच नियंत्रित सिमेंट मिळणार. फक्त खुल्या सिमेंटाचे सर्व आणि नियंत्रित सिमेंटाचे ३५ असे आता पाढऱ्या, म्हणजे नं. एकच्या पैशातून द्यायचे. आणि नियंत्रित कोटघासाठी उरलेले ३५ रुपये काळघा, म्हणजे नं. २ च्या पैशातून द्यायचे. म्हणजे एकूण सिमेंटचा हिशेब तोच. सारे सिमेंट श्रीमंताकडे. फक्त आता निम्म्या सिमेंटसाठी सर्वच्या सर्व पांढरा पैसा चालेल !

आता हे साधे गणित जिथे आपल्यासारख्याला कळते तिथे ते अर्थमंत्री, अर्थखात्याचे चिटणीस, नियोजनमंडळाचे विद्वान सभासद यांना कळत नाही असे कसे म्हणावे? धनिकांसाठी चढा दर, आणि गरिबांसाठी नियंत्रित दर, असे केवळ जाहीर करून तसे होत असते का ? धनिक फक्त चढघा दरानेच खरीदतील आणि गरीबासाठी कमी दर उपलब्ध राहील, असे मानणे हे स्वप्नरंजन आहे. ही एक तर अव्वल दर्जाची बदमाषी तरी आहे, अथवा पराकोटीचा भोळसटपणा आहे.

वास्तविक, यात सर्व फायदा धनिकांचाच आहे. चढघा दराचे सिमेंट ते पूर्वी त्याच दराने काळघा बाजारात खरेदी करीतच होते. तेच सिमेंट ते आता खुल्या बाजारात खरेदी करतील. त्यांच्या दृष्टीने ही दरवाढ नव्हेच. उलट, जे निम्मे सिमेंट आता ते ३५ ने एकवट खरेदी करतील ते ४० ते ५० रुपये जास्त घेऊन गरजूना नव्या काळघा बाजारात विकतील. एक रकमी रोकड मोजणाऱ्यांना सरकारने निम्मे सिमेंट स्वस्त दरात उपलब्ध करून दिले, असा हा धनिकांनाच नवी सवलत देण्याचा मामला आहे.

गरीबांच्या सोयीच्या म्हणून ज्या ज्या योजना आजपर्यंत सरकारने अमलात आणल्या त्यांचा त्याचा खरा फायदा आजवर धनिक वर्गानेच घेतला आहे. कारण सवलतींच्या योजनात एकमुठीने पैसा घालण्याची ताकद धनिकांच्या जवळच असते. टू टियर डब्यात खास शायिकांची (berths) सोय रेल्वेने मध्यमवर्गीय उत्पन्नदारांसाठी केली होती. तिचा फायदा आजतागायत धनिक लोकच घेत आहेत. महाबळेश्वरसारख्या निसर्गरम्य ठिकाणी पर्यटन खात्याने खास मध्यमवर्गीयासाठी आणि गरिबासाठी अ, ब, क, ड अशा चार स्तरांच्या वसाहती बांधल्या. त्यात अगदी सुरवातीपासून राहत आहेत मात्र मुंबईचे धनिक. साताऱ्याच्या E. E. कडे (कार्यकारी अभियंत्याकडे) स्वतःच्या गाडीतून जाऊन वर्षावर्षाचे आगाऊ आरक्षण करणे धनिकांनाच जमते. आणि त्यांच्या एकूण अवाढव्य खर्चात या योजनांनी महत्त्वाची घट होते. सारे श्रीमंत लोक सवलतीचा जास्तीत जास्त उपभोग घेतात—घेऊ शकतात. कारण खरा श्रीमंत तोच, जो बारीक बाबीतही पैसा वाचवणे जाणतो ! ¤

इथे आपण जाम वैतागतो ! आपण पैसे मिळवू शकत नाही म्हणूनच आपण ते साठवू शकत नाही. पैसा वाचविण्याची अभिजातता-देखील आपल्याजवळ नसते.

मग सरकार अशा सवलती जाहीर तरी

का करते ? गरिबाऐवजी श्रीमंतच सवलतीचा फायदा उठवणार, हे ठाऊक असूनही या योजना का आखते ? श्रीमंतांना स्वस्ताई करून देण्यासाठी ? गरिबाच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी ? की गरिबाना भुलवण्यासाठी ?

भुलवण्यासाठीच ! कारण आपण नाही का भुललो ? श्रीमंत शहाणे असतात, सावध असतात. गरीब मात्र भुलतात, त्यांना असे भुलायला आवडतेच मुळी !

आपलेच पहा. सिमेंट खुले झाले, तेही निम्मे, असे सकाळी प्रादेशिक बातम्यात ऐकायचा अवकाश, लगेच आपण मजल्यावर मजले चढविले, निदान कल्पनेचे, अगदी बंगल्याच्या नावाच्या पाटीपर्यंत सारे तयार केले. स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा ठसा पाटीवर, बंगल्यावर उमटला पाहिजे अशा जिद्दीने सारे तयार केले. सारेच्या सारे कल्पनेत ! काय याचा उपयोग ?

आपण हसतो, आपण कल्पना करीत असतो आणि त्या कधीही खऱ्या होणार नाहीत, हेही आपणास माहीत असते; पण तरीही कल्पनेचा हा खेळ खेळायला आपल्याला आवडते. खरे वैभव कधीच मिळणार नाही, हे ठाऊक असते; निदान कल्पनेच्या खेळातले काल्पनिक वैभव का सोडा ? पाच ते पंधरा मिनिटांचा खेळ; कधीकधी तासाभराचा ! दरवर्षी बजेटनंतर खेळायचा खेळ.

मला वाटते, आपण असा खेळ खेळतो हे बजेट तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना माहीत असावे. मंत्र्याना माहीत असणे असंभव. बिचाऱ्यांची खाती सतत बदलत असतात आणि मंत्रिपदेही टिकत नाहीत ! त्यानी माहिती तरी कशाकशाची करून घ्यायची ? आणि माहिती करून घ्यायची म्हटली तरी वेळ कुठे असतो ? तेव्हा ही माहिती सचिवाना असते आणि सचिवावर विसंबून राहणाऱ्या मंत्र्याचा कार्यभाग कधी बुडत नाही !

या सचिवाना नक्की माहीत असते की, बजेटनतर आपण गरीब लोक कल्पनेचे खेळ खेळतो. म्हणून दरवर्षी बजेटमध्ये ते नवी, नवी निमित्ते देत असतात, आपल्याला उमगते की, यंदा नवे निमित्त आहे; पण कल्पनेच्या खेळासाठी नवे निमित्त मिळाले म्हणून आपण खूष असतो !

□

बजेटनंतरचा जसा हा खेळ असतो, तसा बजेटच्या आधीचा एक खेळ असतो.

कोणत्या वस्तू महाग होणार, याचा अंदाज बांधून त्या वस्तू आधी स्वस्तात खरेदी करण्याचा खेळ ! आपण कोणत्या वस्तूबाबत हा खेळ खेळणार ? बहुधा रेडिओ, टीव्ही, फ्रीज आणि पंखे याच्यावरचे कर वाढणार आणि म्हणून नंतर त्यांच्या किमती वाढणार, असे अंदाज आपण अंदाजपत्रकाआधी करू लागतो. जानेवारीत बहुधा हे अंदाज सुरू होतात. फेब्रुवारीत या वस्तूंची मूल्यपत्रके तपासणे सुरू होते आणि मार्चच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात दुकानांवर मोर्चा निघतो !

कमी केलेल्या किमतीचे मोठे फलक दुकानावर लावलेले असतात. ५,७०० अशा मूळ किमतीवर फुली मारून शेजारी वा खाली ४,६०० असा आकडा लिहिलेला असतो. आपला विश्वास बसत नाही. एकदम अकराशे रुपये कमी म्हणजे काय ? हे कसे शक्य आहे ? आपण जरा अजिजीच्या आवाजात विचारतो, 'म्हणजे मूळ किंमत ५,७०० च आहे ना ?'

आपली किंमत करणाऱ्या नजरेने दुकानदार एकदा आपणाकडे आपादमस्तक पाहून घेतो, शेजारी बसलेल्या सहकाऱ्याकडे साभिप्राय बघतो आणि सहज निष्कपट आवाजात सागतो, 'काय आहे साहेब, सत्तावनशेसुद्धा जेमतेम पंधरा दिवस टिकणार आहेत. एकदा बजेट होऊ दे ! मग बघा कशा एकेक किमती वाढतात. आज सत्तावनशे, तर उद्या सात हजाराच्या घरात किंमत जाईल. सवलतच सहा हजार होईल !'

ठासून आणि ठामपणाने दुकानदार बोलत असतो आणि ऐकता ऐकता त्याचे म्हणणे पटवून घेण्याचा निकराचा प्रयत्न आपण करीत असतो. ते म्हणणे आपल्याला पटत नसते; पण न पटण्याला काही आधारही नसतो. म्हणून मग नाइलाजाने ते पटवून घेताना, आजची खरेदी टळली तर नंतर टीव्हीसाठी आणखी किती मोजावे लागतील, याचे हिशेब आपण करीत असतो आणि आजची खरी, आजची सवलतीची व उद्याची खरी-अशा तीन किमतीच्या ताणात तो टीव्ही आजच्या सवलतीच्या किमतीत आपण खरेदी करतो.

टीव्ही खरेदी केला की, मनातला ताण संपतो असे मात्र नव्हे. या व्यवहारात आपण बनवले गेलो, खरेदीत उतावळी झाली, या खात्रीचा ताण वाढतच जातो. घरची माणसे, शेजारी, मित्र हे सारे मिळून आपली उतावळी आपल्याला सप्रमाण पटवून देतात.

मग, निदान चर्चेत तरी दुकानदाराकडून आपल्याला समाधानासाठी थोडा आधार मिळतो का, हे पाहण्यासाठी आपण पुन्हा दुकानात जातो. दुकानदार आपला मित्रच असतो. त्यात परवा त्याच्याकडून टीव्ही घेतलेला ! तोंडभरून हसत तो स्वागत करतो. दुकानातल्या पोऱ्याला चहा आणायला पाठवतो.

'का हो, टीव्हीवर कर वाढवलाच नाही बजेटात तर ?' आपण आपली मूलभूत शंका विचारतो. गेल्या दोन दिवसांत हीच शंका प्रत्येकाने आपल्याला विचारलेली असते. आपली खरेदी ही चपळाई नसून उतावळी झाली, हे आपल्या मनावर ठसविलेले असते.

'म्हणजे ? अजून तुमच्या मनात ही शंका आहे ? मी खात्रीनं सागतो, यंदा टीव्हीवर कर वाढणार ! घरी शंका काढली असणार ! त्यांना ठणकावून सांगा !' दुकानदार मित्र आपली गरज अचूक ओळखून, विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याच्या तत्परतेने पाठिंबा देतो.

पाठिंब्याने आपल्याला बरे वाटते; पण शंका कायम राहते, कारण खिसा आपलाच रिकामा झालेला असतो ! चहा येतो. तो घेताना, आपल्याच पैशाचा चहा आपण घेत आहो, असे वाटत राहते, चमत्कारिक वाटते.

'पण, खात्री काय ? टीव्हीवरचा कर वाढेल हा केवळ अंदाजच ना ?' बळकट करण्यासाठी आपण मुद्द्याचा खुंटा पुन्हा हलवतो.

'यंदा संक्रात टीव्हीवरच येणार !' दुकानदार मित्र पुन्हा आश्वासन देतो. त्याच ठाम स्वरात पुढे सांगतो, 'मी बघतोय ना इतकी वर्षं ! गेल्या वर्षी पहा, फ्रीजवर कर वाढले, त्याच्या मागच्या वर्षी रेडिओवर वाढले. त्याच्या आदल्या वर्षी पंख्यांवरचे, म्हणजे यंदा टीव्हीवरच संक्रांत !'

त्याच्या ठामपणाने मिळालेला दिलासा आपल्या चेहऱ्यावर दिसतो. दुकानदार मित्र अधिक उत्साहाने सागू लागतो, 'त्याच्याजवळ कर बसवायला जास्त वस्तू आहेत

कुठे ? कॅटमध्ये बावन्न पत्ते असतात. तेच पुन्हा पुन्हा पिसायचे, आळीपाळीने एकेक पत्ता वर येतो, यंदा टीव्हीचा पत्ता वर येणार !'

'पण समजा, यंदा हा पत्ता वर नाही आला तर ?' आपला शेवटचा क्षीण प्रयत्न.

'म्हणजे प्रत्यक्ष कर बसला नाही तर ? अशीच शंका तुमच्या मनात आहे ना ?' दुकानदार आश्वासक आवाजात सांगतो, 'तरीही बजेटनंतर टीव्ही महाग व्हायलाच पाहिजे ! अस पहा. रेल्वे माल-वाहतुकीचं भाडं वाढलं, टीव्ही महागणार ! पेट्रोल महागलं, ट्रक-वाहतूक महागली, टीव्ही महागणार ! अहो, बजेटमध्ये एका वस्तूवर कर वाढला की, इतर वस्तू आपोआप महागतात !'

'म्हणजे ?' आपल्याला आता खरा आधार मिळू लागतो. ते ओळखून दुकानदार मित्र आपल्या माहितीत भर टाकतो.

'हे पहा. काचेवर कर वाढवला. काचेच्या वस्तू-बल्बपासून, औषधाच्या बाटल्यांपर्यंत-महागणार ! प्लॅस्टिक-पॉलिथिनवर कर वाढवला. मुलाचे खाण्याचे डबे आणि पाण्याच्या बाटल्या महाग होणारच. तात्पर्य काय, प्रत्यक्ष कर कोणत्याही वस्तूवर बसो. बजेटनंतर सर्वच मार्केट महाग होणार, हे सरळ आहे. दर वर्षीचं आहे !' तो विजयी मुद्रेने समारोप करतो.

घरी परतताना आपल्याजवळ समाधान असते. कशाही परिस्थितील टीव्ही महागलाच असता, या खात्रीचे समाधान ! त्या रात्रीच्या महागाईच्या तुलनेने परवाची खरेदी स्वस्त पडली. याचे समाधान. उद्या सारेच महागणार आहे, आज सारेच स्वस्त आहे, याचे समाधान. म्हणजे, बजेटनतर सिमेंट खुले झाल्याचे समाधान, बजेटच्या आधी टीव्ही स्वस्त मिळाल्याचे समाधान. एकूण समाधानच समाधान !

¤

घरी येऊन या समाधानात आपण टेकतो. मागे रेलून आराम होतो आणि आपले समाधान हळूहळू मावळत जाते.

सिमेंट खुले झाले. आपण मनात बंगला बांधला. टीव्ही उद्या महाग होणार म्हणून आज तो आपण स्वस्त मानून घेतला. हा मनाचा खेळ, की मनाचा नाइलाज ? आशावादीपणा की केविलवाणेपणा ? नाइलाज आणि केविलवाणेपणाच !

आता या क्षणी आपल्याला सिगरेट प्यावीशी वाटत नाही, म्हणून आपण वर्तमानपत्र डोळ्यांसमोर धरतो. वरच्या पानावरच चौकट असते. 'नाइलाजाने उद्यापासून किंमतीत वाढ करावी लागत आहे.'

थोडे बरे वाटते. आपल्या जोडीला वृत्तपत्राचाही नाइलाज आहे. शिवाय कालपर्यंतचे अंक स्वस्तात पडले हे वर समाधान.

आपण पान उलटतो. आत अर्थमंत्र्यांची मुलाखत असते.

'पाकिस्तानने अमेरिकेकडून एफ-१६ विमाने घेण्याचे ठरविले आहे. यामुळे संरक्षण खर्चात वाढ होणे अटळ आहे. नागरिकांनी कंबर कसून भावी काळात कष्टाची तयारी ठेवावी.'

पुन्हा वाढ अटळ ! भावी काळापेक्षा आतापर्यंतचे कष्ट कमी. पुन्हा समाधान ! केविलवाणेपणाचे समाधान.

आत आणखी एक बातमी असते. अर्थमंत्र्याचा इशारा असतो. 'काळ्या पैशासंबंधीचा इशारा.' बेअरर बॉंडची मुदत आणखी एक महिन्याने वाढविण्यात येत आहे.' या अवधीत अपेक्षित पैसा बाहेर न आल्यास नवे कर बसविणे अटळ होईल.'

आहे की नाही ? स्मगलरानी, धनिकानी काळा पैसा जमवायचा. तो थोडा तरी बाहेर यावा म्हणून बेकायदेशीरपणाला सरकारने कायद्याचे संरक्षण द्यायचे. कारण, नाइलाज. हे संरक्षण काळ्या पैशाला नको असते. काळ्या पैशाला पांढरे व्हायचेच नसते. तो पैसा बाहेर येत नाही. मग करवाढ. पुन्हा नाइलाज.

त्याच पानावर आयकराच्या थकबाकीची यादी असते थेट टाटा-बिर्लांपासून अनेक उद्योजकांकडे कराची बाकी लाखाच्या कोटीच्या घरात थकलेली असते. लोकसभेला ही माहिती पुरवून शेवटी अर्थमंत्री म्हणालेले असतात, 'प्रत्यक्ष करवसुली अपेक्षेइतकी न झाल्याने नवी करवाढ अपरिहार्य आहे.'

करवसुली नाही : नाइलाज. नवी करवाढ अपरिहार्य.

सरकारविषयी मनात कळवळून येते. सरकार म्हणजे मातब्बर, असे आपण चुकीने समजलो, हे लक्षात येते. पाकिस्तान, अमेरिका येथले कारखानदार, स्मगलर, व्यापारी धनिक, अकार्यक्षम अधिकारी साऱ्यापुढे सरकारचा नाइलाज असतो. ते तरी काय करणार ?

सरकारपेक्षा आपले बरे. आपल्याला निदान कल्पनेचे खेळ खेळता येतात. सरकारला तीही वाट मोकळी नाही कारण सरकारला मनच नसते ! □


## – नवीन दाखल झालेली पुस्तके –

१. एकान्त (कथासंग्रह) – अरविंद गोखले
२. कोवळी पालवी (कथासंग्रह) – अरविंद गोखले
३. पहिली पावलं (कथासंग्रह) – अरविंद गोखले
४. सर्वोत्कृष्ट मराठी कथा (खंड १३ वा) – सपादक : राम कोलारकर व छाया दातार
५. मृगजळातील नौका (राजकीय कादंबरी) – श्रीमती सुशीला गोखले / पटेल

1. **A Life In Our Times** ( Bestseller–Memoirs ) – J. K. Galbraith
2. **Loon Lake** ( Bestseller Novel ) – E. L. Doctorow
3. **Mortal Friends** ( Bestseller – A novel of Political intrigue & murder ) – James Carroll
4. **Family Business** (Bestseller – A family novel of power, conflict and unity) – Anthony Blond

★ '*Phoenix*' – *A library that is innovative !*

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ राज्यसभेची द्वैवार्षिक निवडणूक

राज्यसभेची द्वैवार्षिक निवडणूक येत्या २९ मार्च रोजी असून विद्यमान सभासदांपैकी ७३ सदस्य निवृत्त होत आहेत व या रिकाम्या होणाऱ्या जागासाठी ही निवडणूक घेतली जात आहे. राज्यसभेमध्ये सध्या इंदिरा काँग्रेस केवळ एक मताने बहुमतामध्ये आहे. २४४ सदस्यांपैकी १२३ सदस्य इंदिरा काँग्रेसचे आहेत. निवृत्त होणाऱ्या सदस्यामध्ये इंदिरा काँग्रेसचे ५४ सदस्य असून त्यांना राज्यसभेमध्ये आपले नाममात्र बहुमत टिकवून धरायचे असेल तर किमानपक्षी ५४ जागा जिंकाव्या लागतील. त्यामध्ये थोडे-फार मागे–पुढे झाले तर निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये नेमणुका झालेले जे सदस्य आहेत त्यांच्या जागी आपल्याला अनुकूल अशा सदस्यांची नेमणूक करून कामचलाऊ बहुमत टिकवून धरण्याचा इंदिरा काँग्रेसचा प्रयत्न आहे. राज्यसभा-सदस्या कै. नर्गिसच्या जागी शासनाने विख्यात तामीळ अभिनेते व इंदिरा काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते शिवाजी गणेशन यांची नेमणूक केली आहे. उरलेल्या चार जागांसाठी निवड करताना नेमणूक केल्या जाणाऱ्या व्यक्तीचा झाला तर आपल्याला उपयोग होईल, निदानपक्षी विरोध तरी होणार नाही, असा विचार करूनच नेमणुका केल्या जातील. इंदिरा गांधींनी घटनेच्या मूलभूत चौकटीमध्ये कोणताही बदल करण्याचा आपला विचार नाही हे वारंवार स्पष्ट केले असले तरी विरोधी पक्षाना या गोष्टीचा विश्वास वाटत नाही. त्यामुळेच राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीद्वारा इंदिरा काँग्रेसला मोठे यश मिळू नये यासाठी विरोधी पक्षानी एकत्र येऊन काम करण्यास प्रारंभ केला आहे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये विरोधी पक्षाचे १९२ सदस्य असून, या जागा शक्यतो विरोधी पक्षाकडेच रहाव्यात व शिवाय जिंकता आल्या तर इंदिरा काँग्रेसचे जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्या काही जागा जिंकाव्यात, अशा दृष्टीने विरोधी पक्षांचा प्रयत्न आहे. अर्थात ज्या राज्यांमध्ये या निवडणुका आहेत तेथील विरोधी पक्षाचे बलाबल लक्षात घेता या निवडणुकीमध्ये विरोधी पक्षांना मोठे यश मिळणे अवघड दिसते. खेरीज, विरोधी पक्षामध्ये जेवढे मतैक्य असणे जरूर आहे तेवढे मतैक्य नसल्याने, उमेदवार निवडून येणे अवघड आहे. उदाहरणार्थ प. बंगालमध्ये कम्युनिस्ट चार जागा सरळ जिंकतील. तथापि पाचवी जागा विरोधी पक्षाकडे रहावी यासाठी विरोधी पक्षांनी एकमताने आपला उमेदवार निवडणे जरूर आहे. याबाबतचे अधिकार मुख्यमंत्री ज्योती बसू यांना देण्यात आले. त्यानी उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे श्री. कल्याण रॉय यांची निवड केली. पण आघाडीमधील सर्व पक्षांचा त्यांना पाठिंबा मिळेल की नाही, याबाबत अजून साशंकता आहे. फॉरवर्ड ब्लॉक या निवडीबाबत समाधानी नाही, तर आर. एस. पी ने आपला स्वतंत्र उमेदवार उभा करण्याचे ठरवले आहे. निवृत्त होणाऱ्या सदस्यामध्ये शरद काँग्रेसचे सदस्य आहेत; पण आज परिस्थिती अशी आहे की, अन्य विरोधी पक्षांचे सहाय्य घेतल्याखेरीज शरद काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून येणार नाही. महाराष्ट्रातून शरद काँग्रेसतर्फे सुरेश कलमाडी यांची उमेदवारी घोषित झाली आहे. तर जनता पक्षाने डॉ. बापूसाहेब काळदाते यांचे नाव निश्चित केले आहे. आता या उमेदवारीबाबत काही तडजोड झाली नाही तर ते दोन्ही पक्षांच्या दृष्टीने हानिकारक आहे. विरोधी पक्षाचे जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यामध्ये भाजप, डावे कम्युनिस्ट, लोकदल व उजवे कम्युनिस्ट याचे प्रत्येकी दोन सदस्य असून, दोन अपक्ष सदस्य निवृत्त होत आहेत. शिवाय अकाली दलाचेही अनेक सदस्य निवृत्त होत आहेत. विरोधी पक्षांपैकी सर्वांत केविलवाणी अवस्था अर्थातच शरद काँग्रेसची होणार आहे. या पक्षाचे सदस्य परतणार असले तरी एकही नवा सदस्य निवडून यायची शाश्वती नाही ! याउलट डावे कम्युनिस्ट व भाजप याची परिस्थिती पुष्कळच बरी आहे. डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे ४ सदस्य निवडून येण्याची शक्यता असल्याने निवडणुकीनंतर या पक्षाच्या सदस्याची संख्या १४ वरून १६ झालेली असेल. तसे झाल्याने विरोधी पक्षांपैकी सगळ्यात मोठा गट या पक्षाच्या सभासदांचा असेल. लोकसभेमध्ये हे स्थान या पक्षाने पूर्वीच प्राप्त करून घेतले आहे. उत्तर प्रदेश व गुजरातमधून भाजप आपल्या दोन जागा राखण्याची शक्यता असून मध्यप्रदेश व राजस्थानमधून या पक्षाचा एखादा उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. विरोधी पक्ष कर्नाटक, आंध्रप्रदेश, बिहार, आसाम, जम्मू-काश्मीर व महाराष्ट्र विधिमंडळांतून होणाऱ्या निवडणुकामध्ये आपल्याला जागा मिळतील अशी अपेक्षा बाळगून आहे. त्यापैकी आसाम विधानसभा आता विसर्जित झाली आहे; पण अन्यत्र एकोप्याने काम करून ज्या १९ जागा कमी होत आहेत त्या कायम राखून, एखाद–दुसरी का होईना, त्या जागा जिंकून, राज्यसभेमध्ये आपले बहुमत प्रस्थापित करण्याचा विरोधी पक्षाचा जोरदार प्रयत्न असला तरी पक्षांतर्गत लाथाळ्या चालूच राहिल्या तर त्याना आपले हे उद्दिष्ट साध्य करता येणार नाही.

विरोधी पक्षामध्ये ऐक्य होणे शक्य नाही आणि त्यांच्यामधील मतभेदांमुळे होणाऱ्या फाटाफुटीचा आपल्याला निश्चित लाभ होईल, अशा दृष्टीने इंदिरा काँग्रेसने या निवडणुकीबाबतचे आपले धोरण आखलेले आहे. इंदिरा काँग्रेसचे जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यामध्ये एक कॅबिनेटस्तरीय मंत्री, तीन राज्यमंत्री व एक उपमंत्री आहेत. त्यामध्ये भीष्मनारायण सिंग, योगेंद्र मकवाना, सिसोदिया, चंद्रजित चानना व कुमुदबेन जोशी याचा समावेश आहे या पाच मंत्रीगणांपैकी चौघाना त्याच्या स्वतःच्या राज्यातून निवडून आणता येण्यासारखे असले तरी चंद्रजित चानना यांना अन्य राज्यातून निवडून आणावे लागेल. कारण ज्या दिल्ली मेट्रोपॉलिटन कौन्सिलतर्फ चानना निवडून आले होते ते कौन्सिलच अस्तित्वात नाही. चानना यांची अन्यत्र सोय लावणेही वाटते तेवढे सोपे नाही. कारण राज्यसभेच्या तिकिटांसाठी इंदिरा काँग्रेसकडे अनेक मातब्बरांची रीघ लागली आहे. पक्षामध्ये मोठी बंडखोरी होईल अशातला भाग नसला

तरी थोडेफार क्रॉस व्होटिंग होणे संभवनीय आहे. विशेषत: अनेक मंडळी नाराज होणार असल्याने ही शक्यता अधिक आहे. या निवडणुकीच्या संदर्भात सत्ताधारी पक्षाने विविध राज्यांच्या विधिमंडळाचे बलाबल लक्षात घेऊन जे आडाखे बांधले आहेत, त्यानुसार आपल्याला प. बंगाल व जम्मू–काश्मीरमधून प्रत्येकी दोन जागा गमवाव्या लागतील, हे गृहीत धरले आहे. आसाममधूनही या पक्षाला एक जागा गमावावी लागली असती, परंतु आसाम विधानसभा विसर्जित झाल्याने तो धोका टळला आहे. मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि राज्यस्थान येथूनही सत्ताधारी पक्षाला एक एक जागा गमवावी लागेल. नेमणूका करण्याच्या ज्या जागा हाती आहेत त्या जागी विश्वासाची माणसे नेमून ही तूट चार जागांनी कमी करता आली तरी आपले बहुमत जाऊन आपली सदस्यसंख्या १२३ वरून ११९ वर घसरण्याची शक्यता आहे, याची जाणीव ठेऊन या निवडणुकीची मोर्चेबंदी करण्यात येत आहे. अर्थात राजकीय डावपेचाना अपेक्षित यश आले नाही तर या पक्षाचे बहुमत जाऊन सर्वांत जास्त सदस्यसंख्या असलेला पक्ष, असे स्थान या पक्षाला प्राप्त होईल. पक्षामधील मतभेद जाहीर होऊ नयेत यासाठी निवडणुकीसाठी उमेदवार सुचवण्याच्या पद्धतीमध्ये थोडे-फार बदल करण्यात आले आहेत. पूर्वी संबंधित राज्यामधील राज्यपातळीवरील निवडणूक-समिती नावाची शिफारस करत असे; आता नावे फक्त मागवण्यात येतील व अंतिम निर्णय या पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीमार्फत करण्यात येईल. असा बदल करण्यात आल्याने इच्छुक उमेदवारानी दिल्लीमध्ये गर्दी केली असून आपली वर्णी लागावी यासाठी धडपड चालवली आहे. निवडणुकीनंतर राज्यसभेचे बलाबल कसे राहते यावर राजकीय पक्षाच्या पुढील हालचाली अवलंबून आहेत. या निवडणुकीमध्ये काही अनपेक्षित व आश्चर्यकारक निकाल लागण्याचा संभव जरूर दिसतो आहे.

## □ आसाम विधानसभा विसर्जित

केरळ आणि आसाम या दोन्ही ठिकाणी पुरेसे बहुमत पाठीशी नसूनही इंदिरा कॉंग्रेसने अनेक तडजोडी करून या दोन्ही राज्यांमध्ये स्वपक्षीय नेत्याच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार स्थापन करून विरोधी पक्षावर मात केली होती. या दोन्ही राज्यांत सरकार टिकू शकणार नाही, याची केंद्रीय नेत्यांना कल्पना असली तरी जेव्हा निवडणुका होतील तेव्हा आपल्याला फायद्याचे जावे याच हेतूने इंदिरा कॉंग्रेसने पुढाकार घेऊन या दोन्ही राज्यात सत्ता संपादन केली होती. परंतु ही दोन्ही मंत्रीमंडळे अपेक्षित काळाइतकेही काम करू शकली नाहीत. केरळमधील करुणाकरन सरकार तर सत्तेवर टिकून राहण्यासाठी गृहाच्या अध्यक्षांच्या निर्णायक मतावर अवलंबून होते. केरळ कॉंग्रेसच्या मणि-गटाच्या एकमेव सदस्याने आपला पाठिंबा काढून घेताच अध्यक्षीय खुर्चीच्या मेहरबानीवर चालणारे हे सरकार अल्पमतामध्ये गेले. आणि मुख्यमंत्री करूणाकरन यांच्यासमोर राजीनामा देण्याखेरीज अन्य पर्याय उरला नाही करूणाकरन याना मुख्यमंत्रिपद फार काळ लाभू शकत नाही, असे दिसते. गेल्या वेळी ते महिनाभर मुख्यमंत्री होते. या वेळची त्याची कारकीर्द थोडी अधिक होती इतकेच. विसर्जित विधानसभेमधील बलाबल लक्षात घेता आगामी निवडणुकीनंतरही केरळमधील पेचप्रसंग सुटेलच असे सागता येत नाही. तथापी एक गोष्ट नक्की की, निवडणुकांच्या वेळी सर्व विरोधी पक्षांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वाढीव शक्तीचा गंभीरपणे विचार करावा लागेल. संघाची सहानुभूती भाजपला असली तरी भाजपला अजून केरळ विधानसभेमध्ये प्रतिनिधित्व नाही कदाचित राजकीय तडजोडीतून काही विरोधकांचा पाठिंबा मिळू शकला तर भाजपचा आमदार केरळ विधानसभेमध्ये पहावयास मिळेल. शरद कॉंग्रेसचे दोन गट केरळमध्ये आहेत. त्यापैकी अँन्थनी याच्या नेतृत्वाखालील गट खरा शक्तिशाली आहे. अलिकडेच या गटाचा कोचीन येथे जो मेळावा भरवला होता त्याला मिळालेला प्रतिसाद पहाता या गटाची शक्ती वाढली नसली तरी निदान आहे तेवढी निश्चितपणे टिकून आहे. शरद कॉंग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वावर विश्वास ठेवून असलेला लहान गट फारसा प्रभावी ठरणार नाही. दोन्ही कम्युनिस्ट, इंदिरा कॉंग्रेस यांना आता निवडणुकीच्या तयारीला लागावे लागेल. संघ व भाजप यांना जाहीररीत्या शिव्याशाप देण्यात येत असले तरी काही पक्षांमार्फत त्यांचा अनुनय चालू आहे. आज केरळ विधानसभा जितक्या समतोलपणे दोन गटांमध्ये विभागली आहे तितक्या समतोलपणे ती निवडणुकीनंतर विभागलेली नसेल, हे खरे असले तरी अस्थिरता हा केरळच्या राजकारणाचा जो स्थायी भाव झाला आहे; त्याचेच प्रतिबिंब नवीन विधानसभेमध्ये पहावयास मिळेल. सरकार बनवणाऱ्या पक्षाला एखाद्या सदस्याची स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्याची मागणी पूर्ण करून त्याचा पाठिंबा घेणे आवश्यक ठरावे, अशी परिस्थिती नवीन गृहात असणार नाही, असे वाटते.

केरळपाठोपाठ आसाम विधानसभा विसर्जित करण्यात आली असल्याने तेथेही लवकरच निवडणुका अपेक्षित आहेत. आसाममधील सर्वसाधारण परिस्थिती अजून सुरळीत झालेली नाही. तेथील आंदोलन दोलायमान अवस्थेमध्ये असून चर्चेच्या अनेक फेरी झडल्या तरी परकीयांच्या प्रश्नावरील हे आंदोलन अजून थंड झालेले नाही. आसाममध्ये आपले शासन टिकू शकणार नाही, याची पुरेपूर जाणीव असूनही केशवचंद्र गोगाई यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार स्थापन करण्यात आले. पण हे सरकार केवळ ६५ दिवस सत्तेवर राहू शकले. विधानसभेमध्ये या सरकारविरुद्ध दाखल करण्यात आलेला अविश्वासाचा ठराव चर्चेला येण्यापूर्वीच सभापतीनी, मंत्रीमंडळाने राजीनामा दिला असल्याने आता चर्चेची गरज नाही, असे सांगून टाकले. मावळत्या मुख्यमंत्र्यानी विधानसभा विसर्जित करण्याचा सल्ला दिला आणि गृहामध्ये अविश्वासाचा ठराव दाखल झालेला असूनही राज्यपालांनी हा सल्ला स्वीकारला व केन्द्रीय शासनानें आसाम विधानसभा विसर्जित करून टाकली. विरोधी पक्षाचे नेते शरदचन्द्र सिन्हा यानी आपल्यामागे बहुमत असल्याने आपल्याला मंत्रिमंडळ बनवू द्यावे, अशी मागणी केली खरी; परंतु त्यांच्या या मागणीतही तसा फारसा दम नव्हता. गोगाई सरकार पाडण्यासाठी श्री सिन्हा याच्यापाठी उभ्या असलेल्या सर्व पक्षानी व व्यक्तीनी सिन्हाना ते मुख्यमंत्री झाले असते तर पाठिंबा दिला असताच असे

म्हणता येणार नाही. १९७८ नंतर आसाममध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार उभे राहू शकले नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता सिन्हा यांना संधी मिळाली असती तरीही आणखी एक सरकार आणखी काही दिवसानी कोसळले असते. त्यामुळेच राज्यपालांची शिफारस वाजवी मानावी लागेल. आसाम विधानसभेच्या १२६ जागा आहेत. कोणत्याही पक्षाला विसर्जित विधानसभेमध्ये बहुमत नव्हतेच. तसेच जुजबी पाठिंबा घेऊन सरकार स्थापन करण्याची ताकद कोणत्याही पक्षाकडे नव्हती. त्यामुळे जवळ येईल तो मित्र जोडून आघाडी उभी करण्यात आली होती. १२६ सदस्यांच्या सभागृहात निर्विवाद बहुमतासाठी ११४ जागांची आवश्यकता असताना सर्वाधिक सदस्य संख्या असलेल्या इंदिरा कॉंग्रेसचे केवळ ४६ सदस्य होते. आता ४६ ते ११४ हे अंतर तोडायचे म्हणजे अनेक आश्वासने आलीच. त्या आश्वासनांची पूर्ती केली तरी हे असले सरकार फार काळ टिकू शकत नाही. केरळपाठोपाठ आता आसाममध्येही या गोष्टीचा अनुभव आला. एक गोष्ट मात्र नक्की, या दोन्ही राज्यात ही आघाडी सरकारे अल्प काळासाठी का होईना, परंतु अधिकारावर येऊ शकली याचे कारण राज्यपालाची सहानुभूती सत्ताधारी पक्षाच्या बाजूने होती. राज्यपालाच्या नेमणुका केन्द्र सरकारमार्फत होत असल्याने आणि आपण आपल्याला नको असलेले राज्यपाल केव्हाही काढून टाकू शकतो, हे केन्द्र सरकारने दाखवून दिले असल्याने राज्यपालही केन्द्रस्थानी सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षाला अनुकुल ठरेल असे निर्णय घेऊन मोकळे होतात. तामिळनाडूचे माजी राज्यपाल प्रभुदास पटवारी किंवा राजस्थानचे माजी राज्यपाल तिलक याच्या उदाहरणांमुळे अन्य राज्याचे राज्यपाल केन्द्राला प्रिय होईल अशीच भूमिका घेणे पसंत करतात. केरळप्रमाणेच आसाममध्येही लवकरच निवडणुका होणार असल्याने दोन्ही राज्यांत राजकीय पक्षांच्या हालचालीना आता चांगलाच वेग येईल.

## ☐ रणजी करंडक—उपांत्य सामने

क्रिकेटच्या देशातर्गत सामन्यामध्ये रणजी करंडक सामन्याना विशेष महत्त्व असते. देशातर्गत स्पर्धेमध्ये मुंबई संघाचे असाधारण स्थान असले तरी या संघालाही अधूनमधून आव्हान मिळतच असते. कर्नाटक संघाने मुंबईच्या बलाढ्य संघाविरुद्ध पहिल्या डावामध्ये मोठी आघाडी संपादन करून त्या आघाडीच्या आधारे मुंबई संघाला पराभूत करून रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला आहे. दुसऱ्या उपान्त्य सामन्यात दिल्ली संघाने बिहारचा सहज पराभव करून सलग पाचव्या वर्षी अंतिम फेरीमध्ये प्रवेश मिळवला आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत दिल्ली विरूद्ध कर्नाटक असा अंतिम सामना मार्गी लागला असेल. कर्नाटक विरूद्ध मुंबई असा जो सामना बंगलोर येथे झाला त्या सामन्यावर खेळाडू व पंच यांच्यापेक्षा मैदानात सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकाचेच जास्त नियंत्रण होते. कर्नाटक संघाचा कर्णधार विश्वनाथ याला बाद दिले, हे प्रेक्षकांना पसंत पडले नाही. त्यानी एकच दंगल उडवून दिली. प्रेक्षकांच्या या वर्तनाचा पंचावर दबाव आल्याने सामना एकंदर तणावपूर्ण वातावरणातच खेळला गेला. कर्नाटकला पहिल्या डावामध्ये पुढावा मिळवून देणाऱ्या ब्रिजेश पटेल विरुद्ध अनेक वेळा अपील करण्यात आले. परंतु पंचाकडून ती फेटाळण्यात आली. या सामन्यात मुबई संघ केवळ २७१ धावा करू शकला. तर कर्नाटक संघाने पहिल्या डावात ९ बाद ३९५ अशी धावसंख्या रचून सामन्यावर आपले वादातीत प्रभुत्व संपादन केले. नाबाद १५५ धावा फटकावणारा सुधाकर राव, संघ अडचणीमध्ये असताना टिच्चून फलंदाजी करून ७८ धावा करून संघाला पहिल्या डावामधील पुढावा मिळवून देण्यासाठी धडपडणारा ब्रिजेश पटेल यांचा कर्नाटकच्या विजयात मोठा वाटा आहे. तसेच कर्नाटकचा लेग–स्पिनर रघुराम भट याच्या कामगिरीचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याने पहिल्या डावात मुबई संघाचे आठ फलंदाज बाद केले, तर दुसऱ्या डावात १७७ धावा देऊन पाच गडी बाद केले. या वर्षीच्या रणजी करंडक सामन्यामध्ये त्याने आजवर ४० खेळाडू बाद केले असून दिल्ली विरुद्धच्या अंतिम सामन्यातही रघुरामचा मोठा उपयोग होईल.

दिल्ली विरुद्ध बिहार हा दुसरा सामना तसा अगदीच एकतर्फी झाला. दिल्ली संघाने ८ बाद ४८३ अशी घसघशीत धावसंख्या उभारली, तर बिहार संघ पहिल्या डावात केवळ १८० धावा जमवू शकला. त्यामध्ये शुक्लाच्या ३६ धावा आहेत. मदनलालने ३, तर अमरनाथने बिहार संघाचे ५ खेळाडू बाद केले. कर्नाटक विरुद्ध मुबई या सामन्यामध्ये कर्नाटकची धावसंख्या ५ बाद १९५ असेपर्यंत तरी चुरस कायम होती परंतु दिल्ली विरुद्ध बिहार हा सामना सुरुवातीपासूनच एकतर्फी झाला. दिल्ली विरुद्ध मुबई हा अंतिम सामना तरी पुरेसा वेधक होईल, अशी अपेक्षा आहे हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत त्याही सामन्याचा रागरंग स्पष्ट झालेला असेल ! ☐


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

## लेखिका : सुमती देवस्थळे

**किंमत : ५५ रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

श्यामचा संसार (कथा २७ वी)

फिरोझ रानडे

# सोने लुटुनी सायंकाळी श्याम परतुनी आला – त्याची कथा

'ह्या सोन्यासारख्या संधीचा फायदा घेतला नाही तर आपल्यासारखे मूर्ख आपणच!' श्रीयुत भणगे श्यामला तावातावाने म्हणाले. हे भणगेच नव्हे, तर सगळेच मराठी लोक सगळ्या विषयावर व सगळ्या वेळी नेहमी तावातावाने का बोलत असतात बरे? श्यामच्या मनात विचार आला. तो तावातावाने चूप राहिला व भणग्यांचे म्हणणे शांतपणे ऐकू लागला.

ह्याचा अर्थ श्याम तावातावाने बोलत नसे, असे नव्हे. तोही समस्त 'बाधवा'प्रमाणे वेळोवेळी असेच तावातावाने बोलत असे; पण आजचा विषय असा होता की, मराठीत ज्याला 'शष्प' म्हणतात–तसे ह्या विषयात त्याला शष्पही कळत नव्हते व म्हणून तो चूप राहिला होता इतकेच.

ओमान–मस्कतमध्ये श्यामच्या वयाचे–साधारण त्याच्याइतकी आवक असलेले पालापाचोळा विधुर (Grass–Widower) बरेच लोक होते. त्या तसल्या पापावि लोकांचा आपआपल्या श्रद्धेप्रमाणे गट बनत असे. कोणाला एखाद्या खेळाची आवड म्हणून, तर कोणाला नाटकाची आवड म्हणून काही लोकांचे जास्त सख्य जमत असे.

श्री. भणगे व श्याम ह्यांचे मस्कतला येण्याआधीपासून सख्य होते. ते दोघे आसाममध्ये काही वर्षं एकाच गावी काम करत होते. त्यांची दोस्ती होतीच; पण त्या दोन कुटुंबाचा फार घरोबाही होता. मध्ये त्यांची काही वर्षं ताटातूट झाली होती; पण आता मस्कतला भेट झाल्याबरोबर चटकन जोडाजोड पण झाली. दोघेही पापावि असल्यामुळे एकमेकांकडे वेळोवेळी जेवणे, एकत्र खरेदी करणे, सिनेमाला जाणे वगैरे गोष्टी विनासायास होऊ लागल्या होत्या.

अशाच एका जेवणाच्या वेळी श्री. भणगे त्या सोन्यासारख्या संधीबाबत श्यामला तावातावाने सुनावते झाले. ही संधी नुसती अलंकारिक भाषेत सोन्यासारखी नव्हती, तर ज्याचे अलंकार बनवले जातात त्या खुद्द सोन्याबाबतच होती!

त्याचे असे झाले होते, गेले काही दिवस सोन्याचा भाव गडगडत होता, म्हणजे खाली येत होता व हिंदुस्थानात मिळते त्याच्या जवळजवळ पाऊण पट किंमतीत सोने मिळू लागले होते. अशा वेळी आपण ह्या सुवर्ण-संधीचा फायदा घ्यायलाच हवा, हे भणगे श्यामला पटवून देत होते.

कोणत्याही खरेदीच्या बाबतीत श्याम अगदी 'ढ' होता. त्याने आयुष्यात स्वत:च्या जबाबदारीवर खरेदी अशी कधी केलीच नव्हती. त्याने सोने कधी घेतले तर नव्हतेच, पण ते घ्यावे असेसुद्धा त्याच्या मनात कधी आले नव्हते. त्यातून तो गेली कित्येक वर्षं महाराष्ट्राच्या बाहेर राहिला होता. कधीमधी तो महाराष्ट्रात आला की त्याच्या बहिणी व इतर नातेवाईक बाया-मंडळी वारवार सोने घेतात, निदान गुरु–पुष्यावर थोडे तरी घेतातच, हे त्याने व राधाने पाहून ठेवले होते. हे पाहिले की, राधा सोने घेण्याकरता अगदी पेटून निघत असे. मग श्याम तिला आपण परत दिल्लीला वगैरे गेल्यावर घेऊ, असे म्हणून तिचे सांत्वन करीत असे. एकदा दिल्लीला गेल्यावर, 'येथे भरंवशाचे सोने कुठे मिळणार? त्यापेक्षा पुढील वेळी महाराष्ट्रात गेलो की घेऊ,' असे म्हणून श्याम परत एकदा तिचे सांत्वन करत असे. पुढे सोन्यासारखी मुले झाल्यावर राधाने सोन्याचा नाद सोडूनच दिला!

ज्या वेळी श्यामचे ओमानला जाण्याचे ठरले त्या वेळी झालेल्या चर्चेत त्या भागात सोने चिक्कार स्वस्त मिळते, असे काही लोक म्हणाले होते; पण त्या वेळी इतर गोष्टींच्या गडबडीत श्यामने त्या म्हणण्याकडे विशेष लक्ष दिले नव्हते.

पण एक दिवस बाजारातून फिरता फिरता Gold available here अशी रंगीत जाहिरात त्याने एका बँकेच्या काचेच्या मोठ्या तावदानावर पाहिली. ही अक्षरे लालभडक पार्श्वभूमीवर सोनेरी अक्षराने लिहिली होती! ह्या देशात सोने विकण्याच्या अशा जाहिराती देतात ना? श्याम थक्क होऊन मनाशी म्हणाला होता.

कारण नाशिकला वगैरे असताना त्याने दुकानावर 'आनंदाची बातमी – ५०१ साबणाचा चुरा आला आहे' वा पुण्याला 'कोरडी चिंच ६ रुपये किलो' वा मुंबईला 'रत्नागिरीचे हापूस आंबे, फणसपोळी व व कोकम' ह्याशिवाय बाकी काही जाहिराती पाहिल्याच नव्हत्या. त्यामुळे त्याच्या थक्कतेत भर पडली होती.

ही व अशी जाहिरात जागोजागी पाहून श्यामच्या मनात सोन्याच्या भावाची चौकशी करावी, असे येत असे; पण सोन्याच्या भावाची कशी चौकशी करतात? त्याचाही पोत वगैरे पहातात का? सोनारलोक काळ्या दगडांवर सोने घासून actually काय पहातात? व जे पहातात ते खरं गिऱ्हाइकांना सांगतात का? कशावरून? ह्या असंख्य प्रश्नांमुळे त्याचा सोने विकत घेण्याचा मानस – मानसच रहात असे!

श्री. भणग्यांनी श्यामला त्या सुवर्ण-संधीचा फायदा घ्यावा, हे एकदाचे पटवून दिले. पण दुर्दैवाने महिन्याचा शेवट आला होता व त्यामुळे श्यामकडले पैसे संपुष्टात आले होते. 'आता सात-आठ दिवसात पगार होईल मग नक्की सोने घेऊ', असे श्याम म्हणाला. भणग्यांनी थोडा विचार केला व म्हणाले, 'हरकत नाही, ह्या फलाण्या घरात गुरू आणखी पंधरा दिवस आहे. तेव्हा तितका काळ तरी भाव वाढण्याचा काही संभव नाही. तेव्हा एक–दोन तारखेपर्यंत थांबावयास काहीच हरकत नाही!'

मग पगार होण्यापर्यंतचे दिवस श्यामने सोन्याचे भाव विचारण्याऐवजी सोने हिंदुस्थानात कसे नेता येईल ह्याच्या चौकशीत घालवण्यात सुरुवात केली. जो कोणी हिंदी बांधव भेटेल त्याच्याकडे तो ह्याबाबत चौकशी करू लागला. हिंदुस्थानातल्या विविधतेत एकात्मता आहे असे त्याने संस्कृतीच्याबाबत वगैरे ऐकले व वाचले होते. तशीच ! विवि-

धता' व 'एकात्मता' सोन्याबाबतही असेल, अशी त्याला कल्पना नव्हती.

सगळया हिंदी बांधवाची सोने चोरून न्यावे, ह्याबद्दल एकात्मता होती. 'विविधता' होती ती फक्त ते किती व कसे न्यावे, ह्याबाबत.

कोणत्याही खरेदी-विक्रीबाबत गुजराथी लोकांइतकी दुसरी पटाईत जात नाही, असा श्यामचा पक्का विश्वास होता. म्हणून त्याने प्रथम एका गुर्जर बंधूला गाठले व पहिलं म्हणजे, सोने घ्यावे का? मग किती घ्यावे? व कसे न्यावे? असे प्रश्न धडाधड विचारले. त्या गुर्जराने चेहऱ्यावर आश्चर्य आणून 'म्हणजे तू अजूनी सोने घेतलेच नाही आहेस का? म्हणून श्यामलाच प्रश्न टाकला व पुढे म्हणाला, 'मी दहा तोळे सोने घेऊन त्याचे जुजबी दागिने बनवून ते बायकोबरोबर पाठवूनसुद्धा दिले!'

'घ्या!' श्याम मनाशी म्हणाला, 'हा आम्हा मराठी व गुजराथी लोकांतला फरक! आम्ही आपले चर्चा व विचार करत राहिलो आहोत व ह्या पठ्ठ्या भाईने सोने मुंबईला पाठवूनसुद्धा दिले!'

अर्थात ह्या उदाहरणाचा श्यामला काहीच उपयोग नव्हता. बायकोबरोबर दागिने पाठवावयाचे म्हणजे त्याला बायको येथे असायला पाहिजे ना? श्यामच्या मनात एक दु:खाची छटा येऊन गेली.

पंजाबी मित्रांची तऱ्हा खास पंजाबी पद्धतीची होती. त्यांचे म्हणणे असे की, दहा-बारा तोळयात समाधान न मानता चांगले तीस-चाळीस तोळे सोने न्यावे. कारण त्यांनीही गेल्या वेळी असेच तीस-चाळीस तोळे सोने नेले होते. ते हिंदुस्थानात न्यावे कसे, ह्या श्यामच्या प्रश्नाला त्याचे उत्तर असे, 'हमारे इन-लॉज के एक फ्रेंड है। वो बंबई मे इक्साइज कमिशनर है। हमारे इन-लॉजने उनको लेटर लिखवाया। बस, हमारा काम हो गया।'

श्यामने ह्या पंजाबी लोकांचे एक पाहून ठेवले होते. त्याचे वडील वा सख्खे भाऊ वगैरे कोणी मोठे नसतात, पण त्याचे In-Laws मात्र खूप मोठे व त्या in-laws चे मित्र तर कोणी तरी फारच मोठ्ठे असतात. श्यामला ह्याही उदाहरणाचा उपयोग नव्हता. त्याचे in-laws च काय, पण out-laws सुद्धा अगदी सर्वसामान्य लोक होते.

मद्रासी लोकांची वेगळी तऱ्हा. त्यांनी सोने घ्यावे की नाही, किती घ्यावे व कसे न्यावे ह्या सर्व प्रश्नाना अतिशय मोघम उत्तरे दिली. त्यामुळे त्या उत्तराचा काहीच फायदा नव्हता. ह्या त्याच्या मोघमपणामुळेच तर हे मद्रासी लोक सरकारी खात्यात यशस्वी होत नसतील ना? श्यामच्या मनात आपला एक प्रश्न येऊन गेला.

मग राहाता राहिली मराठी बांधवमंडळी. काहींनी फक्त एक-दोन तोळे न्यावे, जास्तीच्या भानगडीत पडू नये, म्हणून सल्ला दिला. काहींनी दहा तोळे सोने न्यावे व इक्साइजवाल्यांना स्पष्ट सांगावे, 'की बुवा, मी आपले इतके तोळे सोने आणले आहे' असे सांगितले.

आणि त्यानी, 'की बुवा, मग भरा वीस हजार रुपये दंड वा बुवा, फोडा खडी दोन वर्षं, म्हणून म्हटले तर?' श्यामने मोठ्या चिडीने विचारले. त्यावर तो बांधव शांतपणे म्हणाला, 'तुम्ही विचारलेत म्हणून मी सांगितले. तुम्हाला योग्य वाटेल ते करा!'

मजेची व अभिमानाची गोष्ट अशी की, कोणाही भारतीयाने सोने नेणे बेकायदेशीर आहे, ते देशाच्या हिताच्याविरुद्ध आहे व आपण सुशिक्षित लोकांनी तरी असे करू नये, असे म्हटले नाही. फक्त किती न्यावे व कसे न्यावे ह्याबाबत विचारभिन्नता होती. भारतीय एकात्मतेत विविधता आहे म्हणतात ती अशी!

योग्य दिवशी पगार झाला व श्याम आणि भणगे ह्यांच्या सोन्याबाबत कारवाया सुरू झाल्या. एका सायंकाळी श्याम भणग्यांच्या कचेरीत गेला व ते दोघे बाहेर पडले. सोनाराच्या दुकानात, रेशनच्या दुकानात असते तशी गर्दी होती त्यातले बहुतेक हिंदी बांधव व भगिनी होत्या, हे वेगळे सांगावयास नकोच! प्रत्येकाला सोन्याचा भाव सांगायला नको म्हणून मालकाने एका बोर्डवर २४ कॅरेट, २१ कॅरेट वगैरेचा भाव स्वच्छ शब्दांत लिहून ठेवला होता.

श्यामने व भणग्यांनी मागे बघितला होता त्यापेक्षा आता भाव खाली आला होता. खर म्हणजे, त्यांनी ताबडतोब 'ऑर्डर' द्यावयास पाहिजे होती. पण श्याम भणग्यांना हळूच म्हणाला, 'बाहेर चला मग सांगतो.' बाहेर आल्यावर श्याम पुढे म्हणाला, 'भणगेसाहेब, आज भाव खाली आला आहे. दोन दिवस थाबले तर कदाचित आणखी पण भाव खाली येईल, नाही?'

आता दोन दिवस थाबले तर जसा भाव खाली येण्याचा संभव असतो, तसा वर जाण्याचा पण असतो; पण माणसाचा विश्वास भाव खाली जाण्याच्या संभवावर चटकन बसतो. श्रीयुत भणगे पण माणूस असल्यामुळे त्यांचा 'खाली येईल' ह्यावर विश्वास बसला. त्यांनी परत विचार केला व गुरु आपल्या घरात किती दिवस रहाणार आहे ह्याची चाचपणी केली. अखेर श्यामला 'गुरु पक्का आहे. दोन दिवसांनी म्हणता आहात तर दोन दिवसांनी घेऊ या!' असे म्हणून आपले सहमत प्रदर्शित केले व दोन दिवसानी भेटण्याचे ठरवले.

पण काही ना काही कारणांनी त्यांची चांगली चार-पाच दिवस भेटच होऊ शकली नाही. ज्या दिवशी त्यांची भेट झाली व दुकानात जाऊन भाव पाहिला तर तो चांगलाच वर गेलेला! दोघांनी एकमेकाकडे पाहिले व मनातल्या मनात एकमेकांना दोष दिला. आता अशा चढत्या भावात सोने विकत घेणे शक्य नव्हते. दुकानातून बाहेर आल्यावर श्याम भणग्यांना म्हणाला, 'पण तुम्ही तर म्हणत होतात की गुरु आपल्या घरात पक्का आहे म्हणून? मग भाव असा वाढला कसा हो?' त्याच्या आवाजात रागापेक्षा काकुळता जास्त होती.

भणग्याचा चेहरा थोडा पडला; पण ज्योतिषवाल्यांना, डॉक्टराना व वर्तमानपत्राच्या संपादकांना एक तऱ्हेचे धारिष्ट्य असते. त्यांचे अंदाज वा ठोकताळे चुकले तरी ते खजिल म्हणून होत नाहीत. त्या वृत्तीला अनुसरून भणगे म्हणाले, 'गुरु आपल्या घरी पक्का आहे हो! पण कालपासून हा शनी वक्री झालाय. त्यामुळेच हा घोटाळा झाला!'

'च्यायला, ह्या शनीला वक्री व्हायला काय धाड झाली होती?'

ग्रहांना च्यायला वगैरे म्हणू नये, हे भाव वाढण्याच्या मन:स्थितीत श्याम अगदी विसरून गेला होता. त्याने जीभ चावली. हो, उगाच हे शनीने ऐकावयाचे व तो आणखी वक्री होऊन सोन्याचा भाव आणखी वर जावयाचा!

मग त्या दोघानी आपण आयुष्यात कधी सोने कसे घेतले नाही, बायकोमात्र त्याच्या-

करता नेहमी कशी भुणभुण लावते ह्याची चर्चा मद्राशाकडे मसाला-डोसा वगैरे खात खात केली व परत दोन–चार दिवसांनी भेटण्याचे ठरवून ते दोघे पांगले.

श्यामची 'च्यायला' शिवी बहुधा शनी-महाराजांनी ऐकली नसावी असे वाटते. त्यांचा वक्रीपणा त्या दोन–चार दिवसांत खूप कमी झाला असावा. कारण सोन्याचा भाव खूप खाली आला होता. श्यामने व भणग्यांनी तो भाव वाचला व सोने घ्यायच्या कट्ट्या-कडे ते सरसावले.

श्यामने कट्ट्यावरच्या माणसाला सोन्याचे बिस्किट कसे असते, म्हणून विचारले. त्या विक्रेत्याने 'कसे असते म्हणजे? नेहमी असते तसेच.' असे, म्हटले तर उर्मट, म्हटले तर स्पष्ट उत्तर दिले. खरे म्हणजे श्यामने पण सोन्याची बिस्किटे खाण्याच्या बिस्किटा-सारखी असतात, असे ऐकले होते; पण खाण्याची बिस्किटे म्हणजे आपल्या पुण्याच्या साठ्यांच्या बिस्किटासारखी की पार्ल्याच्या साठ्यांच्या बिस्किटासारखी? हा प्रश्न त्याला सतावत होता म्हणून त्याचा प्रश्न होता.

त्या विक्रेत्याच्या उर्मट उत्तराने श्याम खजिल झाला नाही. गेले पंचवीस वर्षं त्याने सरकारी खात्यात काम केले होते. त्यामुळे त्याला उर्मट उत्तर देण्याची व घेण्याची चांगली सवय होती. त्याने धीर करून विचारले, 'पन् कितने तोले का है? या ऑसका है?' आधीच श्यामला सोन्यातले तोळा-मासा ज्ञान व जे काय होते ते ह्या मेट्रिक पद्धतीने नष्ट केले होते. त्या मेट्रिक पद्धतीपेक्षा आपली नॉन-मेट्रिक पद्धत बरी, असा विचार श्यामच्या मनात आला.

'दस तोळे का एक बिस्किट होता है। और आपको इतने रियाज देने पडेंगे। कितने चाहिये?' 'दो...न' श्यामने भणग्यांकडे अभिप्रायार्थ बघत, म्हटलं तर हिंदीत, म्हटलं तर मराठीत उत्तर दिलं. भणग्यांनी मानेनं होकार दिला व पैसे काढण्याकरिता कोटाच्या खिशात हात घातला. श्यामची छाती चक्क धडधडत होती. भणगे पैशाचे मोठे-मोठे व्यवहार करत असल्यामुळे त्याची छाती शांत होती, असे त्यांच्या शांत चेहऱ्यावरून दिसत होते.

तेवढ्यात श्यामच्या मनात काय आले कोणास ठाऊक. भणग्यांच्या जवळ जाऊन त्यांना, बुटातल्या खड्यासारखा मघापासून टोचणारा प्रश्न तो विचारता झाला, 'पण काय हो भणगेसाहेब, हे सोनं खरंच शंभर नंबरी असेल ना? व त्याचे वजन पक्के दहा तोळे असेल ना?'

कच खातात म्हणजे actually काय खातात हे कोणालाही माहीत नसते; पण सर्व-जण ती वेळोवेळी खात मात्र असतात. आपल्याकडे तर सदाशिवरावभाऊपासून श्यामरावभाऊपर्यंत सगळेच त्यात पटाईत! श्यामने कच खाल्लेली पाहून भणग्यांनी दात-ओठ खाल्ले व मनातल्या मनात दहा नंबर मोजले व असा काय खुळ्यासारखा प्रश्न विचारता आहात ह्या भलत्या वेळी? असा चढा भाव चेहऱ्यावर आणला. तो भाव पाहून श्याम खजिल झाला व आता काय वाटेल ते होवो म्हणून पुढे सरसावला. मना-तल्या मनात 'देवा, नारायणा, हे सोने शंभर नंबरी व दहा तोळ्याचे निघू दे रे बाबा!' असे म्हणून त्याने देवाचा धावा केला आणि हातातल्या नोटांचा जुडगा त्या विक्रेतेच्या हातात दिला.

विक्रेत्याने खरेच बिस्किटासारखे साध्या पातळ कागदात बांधलेल्या दहा बिस्किटांचे बंडल काढले व त्यावरचा कागद फाडून त्यातली दोन बिस्किटे श्यामच्या हातात दिली. त्यातले एक त्याने भणग्यांच्या हातात दिले. 'दहा तोळे म्हणजे चांगलेच जड असते की! व थंड पण किती आहे!' असे म्हणाला. खरं म्हणजे सोने थंड नसून श्यामच गरम झाला होता. भणग्यांचा चेहरा मात्र थंड होता.

भणग्यांनी आपल्या गाडीतून श्यामला त्याच्या घरी सोडले. येताना दोघे एकमेकांशी एक चकार शब्दही बोलले नाहीत. आपल्या अगदी 'एकरा वाजताच्या' (eleventh hour) सोन्याच्या नंबराबद्दलच्या व वजना-बद्दलच्या प्रश्नामुळे श्यामला फार कानकोंडे वाटत होते. म्हणून तो चूप होता. भणगे शांतपणे विचार करत होते. श्यामचा कान-कोंडेपणा वाढत होता. त्याचे घर येताच दोघांनी 'अच्छा' केले व भणगे निघून गेले.

'काय हा शांत माणूस!' एवढे दहा तोळे सोने घेतले, पण त्याच्या नंबरपणाबाबत या वजनाबाबत ह्याला काही कशी फिकीर नाही?' श्यामने जिना चढता चढता मनाशी आश्चर्य व्यक्त केले.

पण भणगेसुद्धा 'बांधवां'पैकी एक होते. दुसऱ्याच दिवशी सायंकाळी ते श्यामच्या घरी आले. त्यांचा नेहमी आनंदी असणारा चेहरा जास्तच आनंदी दिसत होता. घरात येता येताच ते जवळ जवळ ओरडून म्हणाले, 'श्यामराव, त्या सोन्याचा प्रश्न मिटला बरं का!'

म्हणजे ह्या गृहस्थाने एका दिवसात सोने हिंदुस्थानात पाठवले पण? श्याम मनाशी म्हणाला; पण मोठ्याने विचारता झाला, 'म्हणजे कसला प्रश्न?'

'त्या दिवशी नाही का तुम्ही ते सोने शंभर नंबरी आहे की नाही, दहा तोळ्याचे आहे की नाही, विचारत होतात ना?' भणगे म्हणाले.

'हो' या अर्थी श्यामने मुंडी हलवली.

'खरं म्हणजे मलाही तोच प्रश्न पडला होता; पण त्या वेळी बोललो नाही. नंतर मनात आले, तुमच्या प्रश्नाचे निरसन करून खरेदी करायला हवी होती. मग रात्रभर झोप आली नाही. सकाळी दुसऱ्या दुकानात गेलो व दोन्ही गोष्टींची खात्री करून घेतली अगदी शंभर नंबरी माल!'

'खरच?' श्यामला जास्तच आनंद झाला व त्या आनंदात त्याने कपाटात ठेवलेले सोन्याचे बिस्किट हातात घेतले. आता ते जास्तच जड लागत होते; पण थंड नाही, गरम! □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## भारतांतर्गत एक रशिया, भारतांतर्गत एक इस्त्राइल, भारतांतर्गत एक चीन, भारतांतर्गत एक नेपाळ!

# विजापूरजवळचा एक मठ

रवींद्र कृष्ण देसाई

सहा वर्षांपूर्वी प्रथम दादाकडूनच (मा. मधुकरराव देवल, मिरज) या मठाबद्दल बरेच काही तरी मी ऐकले होते. नेमके काय ऐकले होते, ते आता कणभरही लक्षात नाही; पण तो मठ प्रत्यक्ष जाऊन पहावा असे त्या वेळीही प्रकर्षाने वाटले होते, एवढे मात्र आजसुद्धा आठवते. मधली सारी वर्षे ती हकीकतच काय, पण त्या मठाचे नावगावही विसरून गेलो होतो; पण आज जेवता जेवता पुन्हा एकदा इंचेगिरी मठाचा उल्लेख आला आणि विस्मृतीतील ती इच्छा चाळविली गेली.

पण जमणार कसे? अरुण गांधी इंचेगिरीला, अगदी खास ग. डी वगैरे करून, २५ तारखेला (जानेवारी ८२) जाणार आहेत वगैरे सगळे ठीक आहे. त्याचेबरोबर मा. दादासुद्धा जाणार आहेत, हेही फार चांगले आहे; पण बरोबर आणखीही कोणी कोणी असतील. गाडीत जागा असेल, नसेल. आपणहून विचारायचे कसे? माझ्या साऱ्या 'इंग्लिश मॅनर्स' नेमक्या ऐनवेळी आडव्या येतात ना!

चोवीस तारखेला रात्री वसंतरावानी (देवलबंधू) सर्वांनाच भोजनास बोलविले होते. अरुण गांधी आणि सुनंदा गांधी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित; पण त्या दोघांशीही माझे 'हॅलो हॅलो' व्यतिरिक्त संभाषण नाही. अडचण इंग्रजीची नाही. नव्हती. बुजरेपणाही माझ्या अंगी फारसा नाही. वसंतरावांशी आणि घरातल्या इतर सर्वांशीही झकास गप्पा वगैरे मारत होतो. माफकसा विनोद वगैरे करून सर्वांना थोडे-फार हसवत होतो. दोघे-तिघे ऑस्ट्रेलियन पाहुणेही उपस्थित होते. त्यांच्यातल्या लोनिकेची नेहमीप्रमाणे, तेथेसुद्धा चेष्टा मस्करी करीत होतो; पण का कोण जाणे, गांधी दाम्पत्याची आणि माझी मात्र वेव्हलेंग्थ जुळत नव्हती. तेव्हाही जुळली नाही आणि अगदी ते दोघे मिरजेहून मुंबईला परत गेले तोपर्यन्तही नाही. कदाचित, महात्मा गांधींचा नातू या अपेक्षेने मी त्यांचे जे चित्र मनोमन रंगविले होते ते चित्र आणि प्रत्यक्षातला तो यामध्ये मला जो जमीन-अस्मानाचा फरक जाणवला, त्यामुळे असे झाले असेल. खरे तर हा गृहस्थ महात्मा गांधींचा नातू आहे, एवढ्या एका कारणामुळे तो भेटला की, त्याला अगदी पायाला हात लावून नमस्कार करायचे मी मनोमन ठरविले होते. त्याची आणि माझी भेट एखाद्या घरात प्रथम झाली असती आणि त्याचा अॅपिअरन्स आहे त्याहून थोडा जरी वेगळा असता तरी तो बेत मी अंमलात आणला असता. खरे तर मी इतका भावनाप्रधान नाही. व्यक्तिपूजक तर नाहीच नाही; पण 'महात्मा गांधी' या नावाची माझ्या मनावर विलक्षण जादू आहे. प्रत्यक्षात अरुण गांधींची आणि माझी गाठ पडली ती उघड्यावर! जीनची पँट वापरणारा, हेमिंग्वेसारखी दाढी वाढवलेला, आणि हेमिंग्वेसारखाच हा जाडजूड गृहस्थ, महात्माजींचा नातू असेल यावर माझा विश्वासच बसेना. त्यातून गृहस्थ तर इंग्रजीवाचून दुसरा शब्द तोंडातून काढीना! तेव्हा मी मनोमन रंगविलेली प्रतिमा भंगवणारा हा गृहस्थ माझा प्रथम भेटीत मित्र बनू शकला नाही, यात फारसे नवल नाही. चोवीसच्या रात्रीची ती पार्टी आटोपून घरी आलो तेव्हा रात्रीचे चक्क बारा वाजले होते. गांधी कंपनी सकाळी सहा वाजता इंचेगिरीला जाणार होती. दादांच्या अंगात थोडी कणकण असल्याने त्यांनी जाण्याचा बेत रहित केला. दादांनी 'तू जाणार का?' असे मलाही विचारले नव्हते आणि लोनिकालाही विचारले नव्हते. गांधी दाम्पत्यही इंचेगिरी मठापर्यन्त न जाता, फक्त गिरीश फार्म पाहून परत फिरण्याची शक्यता होती. तेव्हा आता उद्या पहाटे उठायची जरूरच पडणार नव्हती. अंथरुणावर ऊन येईपर्यंत झकासपणे झोपायला मिळणार होते.

पण इच्छापूर्ती व्हायची असली की, कोणत्याही मार्गे होतेच. पहाटेच अरुण चव्हाणांकडून फोन. मला झोपेतून सहसा कधी जाग येत नाही; पण बाहेरच्या दिवाणखान्यात आत्याबाईंनी घेतलेल्या फोनच्या चाहुलीने मी चक्क जागा झालो आणि मी जागा आहे हे पाहून दादांनी विचारले, 'तुला इंचेगिरीला जायचे आहे का?'

'गाडीत जागा असेल तर!' मी तत्परतेने उत्तर दिले. गाडीत जागा रगड असणार होती. मग दादांनी मला लगेच तयार व्हायला सांगितले. माझे सारे आवरून मी (कदाचित आयुष्यात प्रथमच) सकाळी सहापूर्वीच तयार झालो. चहा घेताना दादांनी विचारले, 'लोनिकेला जायचे आहे का?' 'गाडीत जागा असेल तर!' मी पुन्हा तेच उत्तर तत्परतेने दिले. 'मग तिलाही उठव!' (लोनिका व्हॅनक्ले नावाची ऑस्ट्रेलियन मुलगी त्या वेळी म्हैसाळच्या विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीचा अभ्यास करण्यासाठी आली होती आणि जवळजवळ एक महिना तिचा मुक्काम मिरजेला देवलांच्या घरीच होता आणि मी तिचा इंटरप्रिटर म्हणून काम करीत होतो) प्रत्यक्षात दारात टेम्पो येऊन उभा राहिला तेव्हा केवळ गिरीश फार्मलाच नव्हे तर इंचेगिरीलासुद्धा जायचे ठरले, तेव्हा आपल्या तब्येतीची कुरकूर दुर्लक्षून खुद्द दादासुद्धा तयार झाले आणि मग आमचा स्पेशल टेम्पो निघाला. बारा जणांची सोय होऊ शकणाऱ्या टेम्पोत केवळ गांधीदांपत्य, प्रो. अरुण चव्हाण, शाहीर

निकम, लोनिका, दादा आणि मी असे फक्त सात जण. तेव्हा प्रवास आरामात झाला यात नवल नाही. खाण्या-पिण्याची सामुग्री एखाद्या युद्धमोहिमेला लाजवील एवढी होती. मुख्य ग्रुपच्या गप्पांमध्ये माझा पुन्हा फारसा भाग नव्हता. शाहीर आणि मी मागच्या बाकावर बसून गप्पा मारीत बसलो. शाहीर, गांधी स्मारकनिधीचे राज्यपातळीवरील कोणी तरी पदाधिकारी होते. नुकताच राजीनामा देऊन मुक्त झाले होते. इंचेगिरी मठाशी त्यांचा गेले कित्येक वर्षे संबंध होता. ते अत्यंत भावूकपणे मठ आणि वारलेल्या मठाधिपती महादेवप्पाबद्दल काहीबाही सांगत होते आणि माझी मुळातली उत्सुकता अधिकच वाढवत होते.

विजापूरच्या अलीकडचा सारा जवळजवळ वैराण भाग. मिरज ते विजापूरमध्ये अथणीसारखा एखादा अपवाद वगळला तर 'मोठे' म्हणावे असे गावसुद्धा लागले नाही; शहराची तर बातच सोडा! दुष्काळी वाटावा इतका जवळजवळ सारा भाग रुक्ष. कशीबशी उभी असलेली ज्वारीची पिके. बागाईत कोठेच नाही. केवळ उजाडपणा! शाहीर तर म्हणालेसुद्धा, 'या भागातून तीन-चारशे वर्षांपूर्वी लाखालाखांच्या संख्येने सैन्य येत होते हे खरे मानायचे तरी कसे? ना वस्ती, ना पिके, ना पाणी! सैन्य जमत होते कोठून? खात होते काय? आणि लूट तरी कशाची करत होते?' पूर्वी या साऱ्या भागात जंगल होते आणि जंगलतोड होऊन हा भाग उजाड झाला म्हणतात; पण जंगलात लाकूड तोडायला तरी कोण, कुठून आणि का येत होते? त्या काळी काही आपल्या निर्जीव बॉयलर्ससाठी जिवंत झाडे जाळणारी कारखानदारी नव्हती! केवळ स्वैंपाकासाठी आणि घरबांधणीसाठी, त्या काळच्या अल्प लोकसंख्येसाठी लाकूड लागून-लागून कितीसे लागत असेल? शिवाय एक झाड तोडले त्या जागी, जर शेती केलेली नाही, तर तेथे दुसरे झाड का नाही उगवले? नवीन जंगल का नाही माजले? एकाहून एक प्रश्नच प्रश्न! दादा विनोदाने एकदा म्हणाले होते जर जंगलवाढ व्हायला हवी असेल तर चरायला जाणारी सारी जनावरे, विशेषत. शेळ्या कापून काढल्या पाहिजेत! जंगलेही वाढली पाहिजेत आणि जनावरेही पाळली पाहिजेत, असे असेल तर मग मात्र 'Stall feeding is a must.'

विजापूरच्या जवळपास अनेक भग्न अवशेष दिसतात. त्यातील बरेच अवशेष मशिदीचे आहेत. विजापूरमधून जाऊनसुद्धा गोलघुमट किंवा मुलुखमैदान मात्र पहायला गेलो नाही. कारण इंचेगिरी मठ आणि गिरीश फार्म पहाण्यात किती वेळ जाईल याचा नक्की कोणालाच अंदाज नव्हता. त्यामुळे गाडीतून दुरूनच गोलघुमटाचा प्रचंड घुमट पाहिला. तो मोठा जरूर वाटला; पण भलत्याच दूरवरून पाहिल्याने 'प्रचंड' मात्र वाटला नाही! अर्थात त्याच्या प्रचंडपणाबद्दल माझ्यासारख्याने सर्टिफिकेट द्यायची गरज नाही. तो प्रचंड आहे, हे सर्वांना ठाऊकच आहे आणि मलाही मान्य आहे.

इंचेगिरी मठ म्हणजे अनेकांच्या लेखी चंबळच्या दरोडेखोरांची केवळ प्रदर्शनी पारमार्थिक प्रतिकृती! चंबळचे दरोडेखोर सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी दौडत असतात आणि हे एकाच जागी ठाणबंद आहेत, एवढाच काय तो फरक. दुसरा मोठा फरक म्हणजे, चंबळचे दरोडेखोर स्वतःकडे फक्त जंगम मालमत्ता बाळगतात, तर इंचेगिरीचे हे 'गुड' जमीनजुमलासुद्धा बाळगून आहेत! Yes! आणखी फार मोठा फरक म्हणजे, इचेगिरी मठात सतत भजन कीर्तन, नामसप्ताह चालू असतात. चंबळकाठचे दरोडेखोर या पारमार्थिक कर्मकांडात भाग घेत नाहीत; पण तरीसुद्धा दोघांच्या वृत्तीत काडीचाही फरक नाही!

## मठाधिपती गुरुपुत्रप्पा

मुख्य रस्त्यावरून गाडी मठाकडे वळली आणि थोड्याच वेळात मठाची शेती दिसू लागली. शेती फार काळजीकाटघाने चालली होती, आधुनिक तंत्रविज्ञानाचा त्यात वापर केला होता असे बिलकूल जाणवत नव्हते. म्हैसाळ, नांद्रे, कवठेपिरान येथील आमच्या संयुक्त शेती सोसायटयांची पिके आणि ही पिके यामध्ये जमीन-अस्मानाची तफावत आढळली! आम्ही श्रावण महिन्यात मठामध्ये चाललो होतो. मठामध्ये वर्षातून पाच सप्ताह होतात. त्यात श्रावणातला एक असतो. प्रत्येक सप्ताह साधारणतः एक महिन्याचा. सप्ताहाला चाललेल्यांच्या तुरळक बैलगाड्या ओलांडून आम्ही मठाच्या प्रांगणात प्रवेश केला. नव्हे, नव्हे, एका अद्भुत विश्वातच प्रवेश केला!

संपूर्ण आवारात झाडांची दाटी आहे. एखाद्या आमराईप्रमाणे सारी जागा शीतल सावलीने सुखद वाटत होती. विशेषतः, विजापूरच्या रखरखाटातून, भर बाराच्या उन्हातून आल्यानंतर तर हा विरोधाभास चांगलाच जाणवत होता. या बागेला पाणी पुरवणारा पाट मुक्तपणे (खरे तर बेशिस्तपणे) आवाराच्या अगदी मध्यातून वेडावाकडा वाहत होता; पण सुदैवाने चिखल मात्र झाला नव्हता. मुख्य प्रांगणातच एका मोठ्या देवळाचे आणि सभामंडपाचे काम चालू होते. आत्ताशी फक्त चार फूट उंचीचे खांब इथे तिथे उभे आहेत. शिल्पकलेची शैली धड दाक्षिणात्य नाही, धड जैन पद्धतीचीही नाही. अर्थात केवळ चार फूट उंचीच्या काही खांबांवरून हे मत मांडणे धाडसाचे आहे; पण शैली कोणती आहे यापेक्षा कोणती नाही, हे सांगणे तसे सुलभ आहे.

मुख्य आवाराच्या उजव्या अंगाला एका देवळापुढे मंडप घालून त्यामध्ये काही भक्त बसले होते आणि त्याच मंडपामध्ये देवळाच्या कट्ट्यावर एक साधीसुदी सतरंजी हातरून हल्लीचे मठाधिपती बसले होते. गुरुपुत्रप्पा!

गुरुपुत्रप्पाचे वय असेल साधारणतः बेचाळीस-पंचेचाळीस रंगाने काळेसावळे, काळसरपणाकडेच जास्त झुकलेला सावळेपणा धोतर, नेहरु-शर्ट आणि गांधी टोपी हा वेष. कपडेही टिनोपॉल शुभ्र नव्हेत, तर केवळ हातधुलाईचे बिनइस्त्रीचे. खादीचे चेहरा अत्यंत समाधानी. चेहऱ्यावर अगदी सहजासहजी हसू उमटू शकत होते. अत्यंत निगर्वी दुसऱ्याच्या मनात सहजासहजी विश्वास निर्माण करू शकणारा साधासुधा तरी पण आश्वासक, हसरा चेहरा. किंचितसा स्थूल वाटणारा हा गृहस्थ, आपण या साऱ्या साम्राज्याचे मालक आहोत असा जरासुद्धा आव आणीत नव्हता. श्रावणमासामुळे बहुधा गेले काही दिवस त्यांनी दाढीसुद्धा केली नव्हती; पण स्वत.च्या बाह्य अवताराकडे अजिबात लक्ष न देणाऱ्या या माणसाला लोक किती मान देत होते!

ते चक्क त्यांच्या पायांवर डोके टेकत होते. काही जणांनी तर त्यांच्या पायांवर ओठसुद्धा टेकलेले मी पाहिले! देवळाच्या कट्ट्यावर-कोणत्याही खास आसनावर नव्हे, तर केवळ एका सतरंजीवर-बसलेल्या

गुरुपुत्रप्पांनी लोकांच्या सोईसाठी पाय पसरून ठेवले होते आणि तिकडे चक्क दुर्लक्ष करून, तरी अभावितपणे आशिर्वादासाठी हात उचलून, आशीर्वाद पुटपुटत, दुसरीकडे श्री. अरुण गांधींच्या प्रश्नांना ते उत्तरेही देत होते.

देवलाची आणि मठातल्या अनेक कार्यकर्त्यांची भलतीच जान-पहेचान होती. शिवाय निकमांचा गेले कित्येक वर्षांचा मठाशी संबंध आणि जगातले कोणतेही कुलुप उघडू शकणारा 'गांधी' हा परवलीचा शब्द! यामुळे गाडीतून उतरल्याबरोबर आम्हाला लगेच गुरुपुत्रप्पांकडे नेण्यात आले आणि ते ज्या कट्टयावर बसले होते त्याच बैठकीवर मठाधिपतीच्या आगेमागे आम्ही स्थानापन्न झालो! अरुण गांधींची मुलाखत चालू झाली.

खुद्द गुरुपुत्रप्पा मठाधिपती बनण्याआधी, गेली पंधरा वर्षे विनोबांबरोबर भूदानयात्रेमध्ये पदयात्रा करीत होते. ऐकून धक्काच बसला; पण मठामध्ये असे धक्क्यामागून धक्केच बसणार होते. सपूर्ण गावठळ वेषातील गुरुपुत्रप्पा आणि त्यांच्यापेक्षा साधेसुधे कपडे घातलेले (आता त्यांच्याहून साधेसुधे कपडे काय असणार म्हणा!) आणि अगदीच शेतकरी भासणारे त्यांचे शिष्य आमच्याशी इंग्रजी, हिंदी, मराठी आणि कानडीतून (माझ्याशी नव्हे!) बोलत होते. त्यांच्या इंग्रजी भाषणात शेकडो चुका होत होत्या; पण त्या क्षम्यच धरायला हव्यात. कारण ती काही त्यांची सवयीची किंवा त्यांच्या वापरातली बोली भाषा नव्हे गुरुपुत्रप्पाचे शिष्य थोडेसेच शिकलेले आहेत. किती? फक्त B. A. LL. B.! B. Sc. LL. B.! M. A. LL. B. वगैरे! त्यांना कोणी रस्त्यात पाहिले तर हे सारे निरक्षर शेतकरी आहेत असे कोणीही कबूल करेल. इतके शिकले-सवरलेले लोक स्वतःचे 'मीपण' इतके हरवून, मठातील इतरांपैकीच एक बनले आहेत.

हा मठ आहे समर्थपंथीय! सभामंडपात दासबोधातील श्लोक जागोजागी लिहिले आहेत. प्रार्थना–प्रवचने रामदासप्रणीतच. प्रवचने नेहमीसाठी कानडीतूनच चालतात. समर्थांच्या या सेवकानी, स्वसामर्थ्याने सरकार-दरबारीसुद्धा भय निर्माण केले आहे.

यापूर्वीचे मठाधिपती कै. महादेवप्पा याचेबद्दल बरेच चागले–वाईट किस्से मी ऐकले आहेत. रॉबिनहूडप्रमाणे शस्त्रबळावर त्यांनी गुडगिरी केली, असा सरकार पक्षाचा आरोप आहे. उलट त्यांनी जे काही केले ते गरिबांच्या भल्यासाठीच केले, ते देवमाणूस होते असे मानणारे आजही हजारो, लाखोजण आहेत! 'पैशाच्या ताकदीच्या जोरावर एकादा सावकार, गरिबांना नडत असेल तर त्याला सरळ करण्यासाठी हाती कायदा घेतला तर बिघडले कोठे?' असे त्याचे म्हणणे. 'शेवटी महत्त्वाचे काय? कायदा की माणूस?' गुरुपुत्रप्पांचा शिष्य अगदी कळकळीने विचारत होता.

'माणूस!' मी उत्तर दिले; पण केवळ शिष्टाचार वा भीरुतेपोटीच मी हे उत्तर दिले, असे मला नाही वाटत.

जत संस्थानांची जमीन. आधीच सारा प्रवेश दुष्काळी. त्यातून-जिराईत शेती. जमिनीच्या छोटया–मोठया तुकडयावर घाम गाळणारे अगतिक, अशिक्षित, अर्धपोटी भूमिपुत्र. स्वत. राबून संस्थानची तुंबडी भरणारी 'कुळे'. स्वातंत्र्यानंतर जमीनसुधारणेबाबत कायदे झाल्यावर संस्थानिकाचे मन पालटले. लेखणीच्या एका फटकाऱ्याने त्याने ही सारी 'कुळे' काढून टाकली आणि चार–सहा श्रीमंत शेतकऱ्यांच्या कराराखाली जमीन कसायला म्हणून दिली. अन्नाला मोताद झालेली बापडी 'कुळे' दीनवाणी होऊन महादेवप्पांपुढे उभी राहिली. महादेवप्पांनी बदुकीच्या जोरावर ते श्रीमत बहिवाटदार उठवले आणि गरीब कुळाना पुन्हा त्यांच्या जागी आणून बसविले; पण हे कायद्यात बसेना मग!

मग आरोपत्रे!

खटले!!

तुरुंगवास!!!

पण तुरुंगवास काही महादेवप्पाना नवा नव्हता स्वातंत्र्य-लढयात त्यानी भाग घेतला होता. संस्थाने विलिनीकरणासाठी आंदोलन उभारले होते. संस्थानिकांकडूनच तुरुंगवास पत्करला होता! खुद्द राज्याशी वैर असे स्वस्तात थोडेच जाणार होते? स्वातत्र्यानंतर संस्थानिकच जनताप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात मिरवायला हजर आणि स्वत च्या मतानुसार, कुवतीनुसार,–भले, जरूर तेथे कायदा ठोकरून–तरी पण जनतेचेच काम करणारा मात्र सरकारलेखी गुंड! म्हणून तुरुगास!

## महादेवप्पांना काय समजायचे?

स्वातंत्र्यलढयात त्यांनी भाग घेतला होता म्हणून अनेकजण त्यांना स्वातंत्र्यसैनिक समजतात. संस्थाने विलिनीकरणासाठी त्यांनी आदोलन उभारले म्हणून त्याना लोकशाहीवादी म्हटले पाहिजे. गोवामुक्ती आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता म्हणून त्याना वसाहतवाद–विरोधक समजले पाहिजे; पण थांबा! लेबले चिकटवण्यासाठी अजून अवकाश आहे. आधी मठाचे काम कसे काय चालते ते पाहू. नवी नवी कित्येक लेबले तुम्हाला आपणहूनच सुचतील!

खुद्द मठाला देणगी म्हणून अर्पण केलेल्या आणि संस्थानिकांकडून बळजबरीने परत मिळविलेल्या सर्व जमिनीची, सहकारी शेती सोसायटी स्थापून मशागत केली जाते. सारेजण या शेतीवर आणि आनुषंगिक कामावर राबतात, याबद्दल त्यांना मोबदला!

तसा कागदोपत्री मोबदला दिल्याचे दाखवले जाते; पण प्रत्यक्षात त्या नोंदीनुसार मोबदला दिला जात नाही! त्याऐवजी ... सर्वांच्या जेवणासाठी सामुदायिक भोजनगृह आहे, चक्क इस्राएली किबुत्झ! अगदी स्वच्छ, नेटके, देखणे! सकाळ–संध्याकाळ तेथेच जाऊन जेवायचे. सर्वांसाठी एकच मेनू! समाजवादच की! सर्वांसाठी एकच पंगत, जातिभेद नाही, शिवाशीव नाही, खरेखुरे एकत्र कुटुंब, रात्री झोपण्यासाठी फक्त वेगवेगळया स्वतंत्र झोपडया आहेत. बाकीचे सारे व्यवहार एकत्रित. मुला-बाळाची शिक्षणे मठाच्या खर्चाने. कितीही शिका. मघाशी सांगितलेले सारे कार्यकर्ते मठाच्या खर्चानेच शिकलेले आहेत. महाविद्यालयाचा सारा खर्च, अगदी वसतिगृहाचासुद्धा खर्च मठातर्फेच पुरविला जातो!

सर्वांनाच कपडे मठातर्फे. अर्थात साधेसुधे. अगदी चपला, अंथरूण-पांघरूणसुद्धा मठाच्या खर्चाने. म्हातारपणाची, आजारपणाची, दवापाण्याची, हॉस्पिटलची, सारी व्यवस्था मठातर्फे. विश्वास नाही ना बसत? त्यांचा एक कार्यकर्ता, जवळच बसलेल्या एका म्हाताऱ्याकडे बोट दाखवून म्हणाला, 'याच्या आजारपणात हॉस्पिटलचे बिल झाले

सोळा हजार! मठातर्फे सर्व खर्च केला गेला.' त्या म्हाताऱ्यानेही कृतज्ञतेने हात जोडून, मानेने होकार दिला.

इंचेगिरी संप्रदायाचे त्यांच्या दाव्यानुसार तीन कोटी भक्त आहेत. आजपर्यंत त्यांनी १३,००० आंतरजातीय विवाह लावले आहेत. दोन्ही आकडे अतिशयोक्तीचे नक्कीच असतील; पण त्यांचे आकडे जरी १।१० प्रमाणात खरे मानले तरी आंतरजातीय विवाहाची संख्या भरते १३०० आणि ही संख्यासुद्धा नेत्रदीपकच आहे. विचार करा, ज्या भारतात दोन जातीमधून धड विस्तवसुद्धा जात नाही त्याच देशात एका मठामध्ये शेकडो कुटुंबे ब्राह्मण, मराठा, लिंगायत, महार. मांग, कानडी, मराठी, असले काहीही भेदभाव न करता, एकत्र राधलेले अन्न सेवन करतात, असे नव्हे तर जातीपातीचा विचारही मनात न आणता त्यांच्यात विवाहसुद्धा लागतात! तुरळक नव्हे, अगदी सर्रास! आमच्याशी बोलणाऱ्या तिघांपैकी दोघांचे असेच आंतरजातीय विवाह आहेत. त्याहून मजा म्हणजे या मठाचे शिष्य मुसलमानातही आहेत आणि चार–पाच मुसलमानाचेसुद्धा असे आंतरधर्मीय विवाह आहेत. नेहमीप्रमाणे मुसलमान मुलगा आणि परधर्मीय मुलगी असे नव्हे, तर अगदी उलट बाजूनेसुद्धा!

**तेव्हा इथे जे काही घडते आहे ते भारतीय समाजजीवनात खरोखरच अलौकिक आहे. अपूर्व आहे!** इथला मठपती स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध भाग घेणारा क्रांतिकारक होता. (कै. महादेवप्पांचा भगतसिंगांशी संबंध होता, असे त्यांच्या शिष्यगणाचे म्हणणे आहे.) संस्थाने विलीन व्हावीत, गोवा मुक्त व्हावा म्हणून आंदोलन उभारणारा लढवय्या होता. कै. महादेप्पा कॉम्रेड डांगे यांचे साथीदार होते. डांगे तर त्यांना कम्युनिस्टच म्हणतात! (कीर्तनकार कम्युनिस्ट! कानाला कसे काही तरीच वाटते, नाही?) महादेवप्पानी बी. डी. जत्ती (कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भारताचे माजी उपराष्ट्रपती) यांच्याविरुद्ध विधानसभेची निवडणूकसुद्धा लढविली होती. (त्यामध्ये त्यांचा पराजय झाला ही गोष्ट वेगळी; पण त्या पराजयाची मीमांसासुद्धा त्यांचे शिष्य, कै. महादेवप्पानी जत्तीच्या बायकोला 'विजयी भव' म्हणून त्यांनीच दिलेल्या आशीर्वादाचे फळ असे मानतात! ही म्हणजे महाभारतातील भीष्म-द्रौपदी प्रसंगाचीच पुनरावृत्ती म्हणायची!) अशी ही मठाधिपतीने राजकारणात सक्रीय भाग घ्यायची परंपरा, मठातील सध्याच्या पिढीतील अनेक कार्यकर्ते, गांधीजींच्या सत्याग्रहात भाग घेतलेल्या सत्याग्रहीची मुले आहेत. सध्याचे मठपती सर्वोदयी कार्यकर्ते!

सहकारी पद्धतीचीच नव्हे तर सामुदायिक शेती. एकत्र जीवनपद्धती. सामुदायिक भोजनगृह. जातिभेदविरहित समाजरचना; आंतरजातीय विवाह, उपभोग्य वस्तूंचे समाजवादी वाटप, कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे छोटे रूप, येथपर्यंत सर्व गोष्टींचे कौतुक करावे तेवढे थोडकेच आहे. अर्थकारण, राजकारण, समाजकारण आणि परमार्थ येथे हातात हात घालून एकत्र चालताहेत, हेही ठीक आहे; पण तरीसुद्धा प्रचंड प्रमाणात मनाला खटकणाऱ्या गोष्टीही तेथे आढळतात.

जाणवणारी (किंवा वादाकरिता भासणारी म्हणा फार तर) सर्वांत **पहिली गोष्ट म्हणजे, हे जे सारे चालले आहे ते सर्व एका व्यक्तीवर ठेवलेल्या आत्यंतिक श्रद्धेपोटी! ही श्रद्धा कशातून उगम पावली** असावी? एक तर भारतीयाच्या मनातल्या अंधश्रद्धेच्या परंपरेतून. दुसरे म्हणजे महादेवप्पांच्या (किंवा आत्ताच्या गुरुपुत्रप्पांच्या) शस्त्रसज्जतेतून आलेल्या दराऱ्यापोटी. (मठाकडे शस्त्रांचा साठाच आहे, असे नाही तर गावठी बंदुका-पिस्तुलांचे उत्पादनसुद्धा मठामध्ये आहे, असे मठाचे विरोधक म्हणतात. याच शस्त्रांच्या धाकावर मठाचे भक्त 'खुषीच्या सक्तीरूपे' पैसा जमा करतात, दहशत माजवतात असा सरकारपक्षाचा दावा आहे) आणि याहून महत्त्वाचे म्हणजे जवळजवळ जीवनातूनच उठलेल्या माणसाना (त्यातूनही बहुताशी निरक्षर व अडाणी) दोन्ही वेळच्या जेवणाची आणि निवाऱ्याची हमी, संरक्षणाची हमी आणि वर पारलौकिक पुण्याचा बोनस यावर हा सारा डोलारा उभा आहे; पण हे असे असणे कितपत योग्य आहे?

ही सारी माणसे येथे काय करतात? well, शेतात काम करतात! किती? सुपरवायझर्स सांगतील तितके! मनापासून करतात का? उत्तर देणे अवघड आहे. कारण...

...कारण, तेथे असलेल्या माणसांना स्वतंत्र मन असेल असे वाटतच नव्हते. ती सारी माणसे कुठल्या तरी वेगळ्याच ग्रहावरची माणसे वाटत होती. म्हणजे तसे काही त्यांना शिंग, शेपूट होते असे नव्हे. मठाबाहेर त्याना पाहिले असते तर त्यांना इतर भारतीय निरक्षर, खेडूत शेतकऱ्यापासून वेगळे काढता आले नसते; पण चार-सहा कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आढळणारी हुषारी वगळता, का कोण जाणे, पण बाकीचे सारे स्वतःचे मन, बुद्धी आणि विचारशक्ती गहाण टाकून जगणारी माणसे वाटत होती.

## केवळ निरुपयोगी!!!

आम्ही मठामध्ये प्रवेश केल्यानंतर दहाएक मिनिटांतच देवळातून की कोठून तरी भजन म्हणत म्हणत एक तांडा बाहेर आला. कर्नाटकी तालवाद्ये आपल्यापेक्षा थोडी वेगळी असतील, निदान नेहमी भजनकऱ्याच्या गळ्यात आढळणाऱ्या पखवाजाऐवजी मला वाटते घटम् हे ते वाद्य असावे. ठेकाही अत्यंत वेगळा आणि त्या आगळ्या ठेक्यामध्ये 'जय गुरु, जय गुरु' असे शब्द गुंफलेले कानडी (?) भजन. खरे सांगतो, केवळ परीकथेत शोभेल असे अद्भुत, enchanting वातावरण मी अनुभवले. अगदी शिस्तीने ती सारी माणसे आली वेगाने, पण थोडीदेखील घाईगर्दी न करता. आम्ही बसलो होतो त्या देवळासमोरील मंडपात उभे राहून, थांबून त्यांनी उभ्या, उभ्यानेच एक भजन म्हटले, गुरुपुत्रप्पाच्या पायावर काहींनी डोके ठेवले 'जय गुरु'चा पुन्हा एकदा जयघोष केला आणि ते सारेजण तितक्याच सहजपणे, तितक्याच शिस्तीने दुसऱ्या एका देवळाकडे वळले. बरोबरच्या कार्यकर्त्याने सांगितले की, सकाळचे, संध्याकाळचे दीड/दोन तास असे फिरते भजन चालते. सकाळ-संध्याकाळ एक/एक तासाचे प्रवचन. शिवाय दिवसभर देवळात भजन, रात्री कीर्तन चालूच असते.

आणि हा सारा परिपाठ एक दिवस नव्हे, दोन दिवस नव्हे!
वर्षातून पाच वेळा!
किमान पाच महिने!!

असल्या या कार्यक्रमातून त्यांची आध्यात्मिक उंची वाढत असेल यावर मूर्ख माणूससुद्धा विश्वास ठेवणार नाही. मग हे काय आहे? माझ्या लेखी शुद्ध निष्क्रियतेला आणलेली ही निखळ झिंग आहे.

रोजच्यारोज मठातले भक्त तर असतातच; पण सप्ताहासाठी बाहेरूनही लोक जमतात. कार्यकर्त्यांच्या दाव्यानुसार रोज पाच/दहा हजार लोक सप्ताहाच्या वेळी जेवायला असतात; पण मला हाही दावा अतिशयोक्तीचा वाटला. कारण पहिल्या पंगतीला सुमारे ४०० लोक दिसत होते. आणखी तेवढ्याच फार तर दोन-तीन पंक्ती झाल्या असल्या. म्हणजे १६०० पेक्षा जास्त माणसेच त्या दिवशी तरी हजर नव्हती; पण 'ग्रेस' म्हणून कितीही सोडले तरी हजार-दीडहजार लोकांनी वर्षानुवर्षे, महिनोगणती केवळ टाळ कुटीत रहायचे हे Horrible आहे! मजा म्हणजे, या सप्ताहाला हजर रहाण्यासाठी, मठाच्या वेगवेगळ्या फार्मवरील सर्व कर्मचारी आपापले कुटुंब-कबिले, इतकेच काय, पण फार्मवरील शेतीची जनावरे वगैरे सारेच घेऊन, पाचही महिने इचेगिरीलाच मुक्काम ठोकतात! या पाच सप्ताहाच्या पाच महिन्यात फार्मवर केवळ अतिआवश्यक अशी चार-पाच माणसे थांबतात. सगळे लोक मठावर येतात तेव्हा फार्मवर चोरी वगैरे झाली तर? माझी बापडी, भाबडी शंका. पण त्यांना या शंकेने स्पर्शसुद्धा केलेला नव्हता. त्याच्या फार्मवरची तनसडीही चोरायची चोरांचीसुद्धा छाती नाही! 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे?' हेच खरे. त्यामुळे हे सारे चक्क कामधाम सोडून मठात हजर. समर्थांना अपेक्षित असलेला 'आधी संसार करावा नेटका' असाच असेल काय?

यामुळेच मठाचा हा सारा निरर्थक खर्च केवळ त्याच्या शेती-उत्पन्नातून चालत नाही, हे उघड आहे. कारण ही अशी HALF HEARTED पारलौकिक शेती या आध्यात्मिक खर्चाला कशी काय पुरी पडेल? तेव्हा भक्तांच्या देणग्या हेच शेतीचे अर्थशास्त्र असावे. आणि केवळ श्रद्धेपोटीच देणग्या मिळत असतील हे खरे कसे मानायचे? विशेषत: एकूण लौकिकाच्या पार्श्वभूमीवर?

गिरीश फार्मवर केवळ लिंबाचो झाडे उभी होती. पण तीसुद्धा पाण्याअभावी सुकल्यासारखी वाटत होती. तेव्हा हा बागिचासुद्धा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नव्हता; पण ही जमीन करण्यात मठाने अत्यंत परिश्रम घेतले आहेत, हे उघड आहे. एकामागोमाग एक असे बांध घालून ओढ्याचे पाणी अडविले आहे. आणि ते शेतात जिरविण्याची सोय केली आहे. हजारो, लाखो रुपये खर्च करून विहीरी खोदल्या आहेत. तेव्हा जर कोणा कार्यकर्त्याने मनावर घेतले तर अगदी व्यावसायिक कसोटीवरसुद्धा अत्यंत किफायतशीर बागायत येथे होऊ शकेल.

◻

पण महत्त्वाचा प्रश्न शेतीचे भवितव्य हा नसून मठाचे भवितव्य काय, हा आहे.

सरकारदरबारी तर हे लोक केवळ गुड आहेत. सत्ताधारी पक्षाविरुद्ध त्यानी निवडणुका वगैरे लढविल्यामुळे तर आता हा डाग धुवून निघणे फार कठीण आहे. खुद्द मठाची शिकवण खटासी असावे खट, उद्धटासी उद्धट, खटनटासी खटनट, अगत्य करी। अशी समर्थपंथीय असल्याने मठाची कार्यपद्धती वा विचारसरणी बदलेल अशी शक्यता नाही!

मठाधिपती वंशपरंपरेने नेमला जात नाही. विश्वस्त मंडळाकडून निवडला जातो, असे सर्व शिष्यानी आवर्जून सांगितले. अत्यंत चांगली बाब, पण त्यानंतर मात्र ही लोकशाही प्रक्रिया येवढ्यावरच थांबते. अंधश्रद्धेला आणि व्यक्तित्वपूजेला जेथे अनन्यसाधारण महत्त्व आहे तेथे समाजपरिवर्तनाचा डोळस प्रयत्न लोकशाही पद्धतीने, सामुदायिक नेतृत्वपद्धतीने, परस्परविचारानी होईल हे असंभाव्य आहे. म्हणजे एकचालकानुवर्तित्व हे कायम राहणारच. आणि मग हा आजचा किंवा उद्याचा सर्वेसर्वा मठपती, या मठाला कोठे घेऊन जाईल?

येथे होणारे मिश्रविवाह किंवा जातीभेदविरहित सामूहिक जीवन पद्धती ही कदाचित अपघाताने स्वीकारली गेली असावी, असे राहून राहून वाटते. ही अत्यंत विचारपूर्वक स्वीकारलेली जीवनधारा वाटत नाही. म्हणूनच दैनंदिन कारभारात विज्ञाननिष्ठेऐवजी अंधश्रद्धेचा आधार घ्यावा लागत असावा. यामुळेच येथील प्रयोगातून स्फूर्ती घेऊन ही क्रांती अन्यत्र कोठे पसरवण्याचा प्रयत्न कोणी केलेला नाही. कोणी करेल अशी शक्यता वाटत नाही. आजपर्यंत असे काही प्रयत्नपूर्वक झालेले नाही. होण्याचीही शक्यता नाही. लोनिकाने फार सुरेख शब्द वापरला. ती म्हणाली, येथे Feudal Marxism आचरला जात आहे. अगदी खरे आहे. जातीभेदविरहित सामूहिक जीवन ही एका टोकाची अचिव्हमेंट तर दिवसाचे चोवीस तास हरिभजनात गुंगून आध्यात्मिक नेत्याचे पाय चुबायचे, ही दुसऱ्या टोकाची वस्तुस्थिती, यातून हा मठ पुढचा मार्ग कोणता स्वीकारेल यावरच या मठाचे सामाजिक स्थान अवलंबून राहील.

मठाचे सध्याचे नेतृत्व किंवा सेकंडरी लिडरशीप या गोष्टीचा विचार करण्यास सक्षम दिसते का? केवळ दोन तासांच्या अल्प वास्तव्यातून कोणताही निष्कर्ष काढणे हे नक्कीच घाईचे आणि धाडसाचे ठरेल. पण तरीही हे नेतृत्व येथे तोकडे पडेल, असे वाटते. कारण या मठाबाहेर (आणि भू-दान चळवळीबाहेरही) अफाट जग पसरले आहे; त्यातील सर्व नवेनवे आणि प्रागतिक विचार येथे आले पाहिजेत, रुजले पाहिजेत, आचरलेले गेले पाहिजेत, यासाठी काही प्रयत्न मुद्दामहून केले पाहिजेत, असे या नेतृत्वाला जाणवलेले दिसत नाही. येथे असलेली मिश्रविवाहपद्धती किंवा जातिभेदविरहित कल्याणकारी राज्याची छोटी प्रतिमा ही कोणत्याही विचार चिंतनातून स्फुरलेली, निदान स्वीकारलेली वाटत नाही. तीही एक परंपरा म्हणूनच जतन केली आहे. एक आदेश म्हणून, एक अपरिवर्तनीय पायडा म्हणून, एक गुरुनिष्ठा म्हणून स्वीकारली गेली आहे, असे वाटते. आणि म्हणूनच हे लोक नामगजरासारख्या क्रियाशून्यतेसाठी, शेतीवाडी वाऱ्यावर सोडून चार-चार, पाच-पाच महिने येथे निरुद्योगीपणे बसून राहू शकतात, प्रवृत्तीमार्गी रामदासाचे नाव घेत निवृत्तीमार्गी अन्य संताचे अनुकरण करू शकतात, त्यांच्याच आचारातील आणि विचारातील विसंगती त्यांच्या ध्यानात येत नाही!

आणि हे ध्यानात येत नाही, याचाच अपरिहार्य परिणाम म्हणून येथे हे सर्वेसर्वा अध्यात्मिक नेतृत्व काठ्या, कुऱ्हाडी अन् बंदुकाच्या जोरावर उभे आहे. जातीभेदासारखे कृत्रिम भेदभाव नष्ट करून आणलेली समानता पुन्हा गुरु-शिष्यासारखे कृत्रिम भेदभाव निर्माण करून उच्च-नीचता वाढवीत आहे. एका माणसाला दुसऱ्या माणसाच्या पायावर डोके टेकायला भाग पाडीत आहे! मान्य आहे की, गुरूच्या पायावर डोके टेकायची सक्ती येथे नाही, पण एक वेळ सक्ती असती तर परवडले असते! कारण मग निदान सक्तीविरुद्ध कोणी तरी बंड

करून उभे राहिले असते. पण येथे भक्तिमार्गाचा अवलंब करून, मोक्षाचे आमिष दाखवून, इहलोकातील सुरक्षिततेची लालूच दाखवून ही गुंगी आणली जात आहे. ब्रेन वॉशिंगइतकेच हे वाईट आहे. इथे घडणारी पुरोगामी क्रांतिकृत्ये ही वैचारिक पायावर नव्हेत, बुद्धीला आवाहून नव्हेत, तर अंधश्रद्धेतून मिळणाऱ्या सामर्थ्याचे प्रदर्शन करणाऱ्या आदेशातून साकारली जात आहेत. उद्या आदेश देणाऱ्याचे मन पालटले, बुद्धी फिरली तर नेमके आजच्या विरुद्ध निर्णय घेतले जातील, आदेश दिले जातील. आणि आज्ञाधारकता व गुरुशरणागती हेच परम कर्तव्य मानणारे हे विचारशून्य अनुयायी, पहिल्याइतक्याच उत्साहाने या गोष्टीही करतील !

आज सुदैवाने गुरुपुत्रप्पांवर सर्वोदयी संप्रदायाचे संस्कार आहेत. त्यामुळे ते भलतेच मवाळ व्यक्तिमत्त्वाचे वाटतात. कर्तुमकर्तुम् सत्ता हाती असूनसुद्धा ! जरी त्यांनी बहुतांशी भारत पाहिला असला तरी दुर्दैवाने त्यांचे अनुभवविश्व भू-दान चळवळीइतकेच मर्यादित असावे, असे जाणवते. त्याच त्यांच्या वैचारिक मर्यादाही ठरू शकतील. पण मठाची सत्ता वापरून, श्रद्धा-अंधश्रद्धांचा नेटका उपयोग करून, जुन्या परंपरांचे परिशीलन करून, एक संपूर्ण नवा आचारधर्म ते या मठातील शिष्यांना देऊ शकले तर ......

..तर भारतातच एक इस्राएल वसविल्याचे पुण्य त्यांच्या पदरात पडेल. एक असे किबुत्झ् की, जेथे 'लोकनियुक्त प्रतिनिधी' सर्वसत्ताधीश आहे. लौकिकाची कास धरूनच तेथे पारलौकिक चिंतन चालू आहे. एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ, हे तत्त्व तेथे खरोखरच अवलंबिले जात आहे. जातीभेदविरहित समाज आहे. समता आणि बंधुभाव आहे. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची आहेत आणि उपभोग्य वस्तुंचे न्याय्य वितरण केले जात आहे. कल्याणकारी सरकार आहे, स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण ग्रामीण वसाहत आहे. शक्ती आणि शांती एकत्र नांदत आहेत.

एक 'युटोपिया' प्रत्यक्षात अवतरला आहे ! □

# पुस्तके तराळ-अंतराळ

## एका संवेदनाक्षम मनाचे वास्तववादी म्हणूनच भेदक चित्रण....वि. शं. पारगावकर

'तराळ–अंतराळ' ही शंकरराव खरातांची जीवनकथा वाटण्यापेक्षा ती एक 'स्टोरी ऑफ दि अनटचेबल' महाराची जीवन–कथा वाटावी असा माझा प्रयत्न आहे.'

शंकररावांनी आपली जीवन-कथा संपविताना जे शेवटचे 'अग्निदिव्य' हे प्रकरण लिहिले आहे त्यामध्ये सुरुवातीलाच त्यांनी आपल्या जीवन-कथेविषयीचे वरील विचार व्यक्त केले आहेत. त्या दोन ओळीतच त्यांच्या जीवनाविषयीचे सारे सार आले आहे. त्याच प्रकरणात खरातांनी डॉ. आंबेडकरांचेही एक विचारवाक्य दिलेले आहे. 'क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले. आमासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांतीच होऊ शकत नाही. ते चक्र आम्हीच फिरवू...!'

खरातांचे 'आत्मचरित्र' वाचल्यावर मन खिन्न होते, विषण्ण होते. मनात विचारांचा डोंब उसळतो. आपल्याच मनाला एक असाध्य आजार जडल्याची, अस्वस्थतेची भावना रक्तात पसरते. रक्तधमन्या विषारी नागाप्रमाणे सळसळू लागतात. खरातांचं अवघं जीवन रक्तात भिनतं आणि सारं अंग शहारुन उठतं. फार एकाकी वाटायला लागतं आणि जीवनावरचा विश्वासच उडून जातो. पंख कापलेल्या पक्ष्यासारखी केविलवाणी तडफड सुरू होते.

आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराच्या खऱ्या ताकदीची प्रचिती खरातांचे आत्मचरित्र वाचून येते. ही शक्ती कोठून निर्माण होते ? कशी निर्माण होते ? का निर्माण होते ? हे एक विचित्र कोडं आहे ! खरात ही अस्पृश्य समाजातील एक व्यक्ती जेव्हा उघड्या समाजात आपलं चहूबाजूंनी कुंठीत झालेलं जीवन जगत असते, तेव्हा तिच्याबद्दल समाजाला सहानुभूती वाटत नसते. इमाम या सांडणीस्वाराच्या सोबतीने विद्यार्थी खरात हायस्कूलच्या शिक्षणासाठी आपल्या गावाहून साठसत्तर मैल दूर असलेल्या औन्धला जात असतात, तेव्हा त्यांच्या शरीराला स्पर्श तर सोडाच, पण सहानुभूतीचा स्पर्शदेखील त्या सांडणीस्वाराकडून त्यांच्या वाट्याला येत नाही. तो साठ-सत्तर मैलांचा प्रवास छोट्या खरातांनी उंटापासून किमान अंतर ठेवून परंतु त्याच्या चालीची गती सांभाळून केलेला आहे.

या प्रसंगावरून मी लहानपणी एका क्रमिक पुस्तकात वाचलेला एक इंग्रजी धडा मला आठवला.

एका वालुकामय प्रदेशातून एक इंग्रज उंटावरून प्रवास करीत होता. प्रवासात बरोबर बरेच अरब नोकर पायी चाललेले होते. सात–आठ दिवसांचा तो एकाकी प्रवास त्या इंग्रज प्रवाशाच्या अंगावर आला. प्रवासात एक शब्ददेखील कोणाशी बोलता आलेला नव्हता. अत्यंत कंटाळवाणा आणि जीव नकोसा करणारा तो प्रवास होता. परंतु एके दिवशी समोरून उंटावरून आणखी एक प्रवासी येत असलेला त्याला दिसला. इंग्रजाचं मन पुलकित झालं. त्याच्या आशा पालावल्या. कोणी तरी आपल्यापैकीच येत

असल्यास त्याच्याशी चार शब्द तरी बोलता येतील, या विचाराने त्याच्या मनाला आनंद झाला. तो सांडणीस्वाराचा ताफा जसजसा जवळ येऊ लागला तसतसे याचे मन उचंबळून येऊ लागले. शेवटी समोरून येणारा ताफा अगदी जवळ आला. उंटावरून एक इंग्लिश माणूसच प्रवास करीत होता. तो ताफा जवळ आल्यावर बरोबरचे अरब एकमेकांत मिसळले. उंट उंटाला भिडले अरबांच्या एकमेकाशी गप्पा झाल्या. खांद्याला खांदे भिडवून झाले. त्या वेळात हे दोन इंग्लिश प्रवासी फक्त एकमेकाकडे पाहात होते. शेवटी अरबांनी अरबाचा निरोप घेतला. उंटांनी उंटांचा निरोप घेतला, परंतु हे दोघे इंग्रज प्रवासी एकमेकांशी एक शब्दही बोलले नाहीत. दोन्ही ताफे आपापल्या मार्गाने निघून गेले. मग हे दोघे इंग्रज प्रवासी एकमेकांशी का बोलले नाहीत ? तर शिष्टाचार मध्ये आडवा आला. कोणी तरी ओळख करून दिल्याशिवाय एकमेकांशी बोलायचं नाही ! मला तो धडा वाचून तेव्हा त्या दोन इंग्रजांची कीव आली होती. आज खरातांचा त्या साडणीस्वाराबरोबरच्या प्रवासाचा प्रसंग वाचून त्या साडणीस्वार इमामाची कीव आली.

शिष्टाचार, संस्कृती, धर्म, वर्णविचार, जातीव्यवस्था या सर्व अशा गुतागुतीच्या समस्या आहेत. माणसाने त्या निर्माण केल्या आणि माणूसच त्याचा बंदीवान झाला ! खराताचे आत्मचरित्र वरील समस्यातून निर्माण झालेल्या यातनांचा इतिहास आहे. हा एक सामाजिक आजार आहे. या आजारावर औषध म्हणजे समाजपरिवर्तन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे क्राती, सपूर्ण क्राती व्हायला हवी ! क्रांतीचे चाक आसासह पूर्ण फिरायला हवे.

पण हे चाक कसे फिरणार ? कोण त्याला फिरवणार ? आबेडकरानी अर्धे चाक फिरविले. ते गेल्यावर आज तर चित्र असे दिसत आहे की, हे राहिलेले अर्धे चाक क्रातीच्या उजव्या बाजूने फिरण्याऐवजी डाव्या बाजूनेच फिरत आहे. अलीकडे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या अस्पृश्यांवरील अत्याचाराच्या बातम्या हेच सागत नाहीत का ? साधा प्रश्न — मराठवाडा विद्यापीठाचे नामकरण. त्याला डॉ. आंबेडकराचे नाव देण्यासाठी कोण खळखळ, केवढा विरोध ! मध्या गल्ली-बोळाना, राजरस्त्यांना, चौकांना आणि मोठमोठ्या ऐतिहासिक इमारतींनादेखील, त्यांची पूर्वीची (पूर्वीच्या व्यक्तींची) नावे बदलून भारतीय नेत्यांची नावे दिली जात आहेत. मग आंबेडकरांच्या नावाविषयीच एवढी खळखळ का व्हावी? याचा अर्थच हा आहे की, समाजामध्ये जातीयतेचे विष खोलवर भिनलेले आहे आणि त्यावर उतारा शोधण्याचीही कोणाला गरज (फिकीर) वाटेनाशी झालेली आहे !

समाज तर आज अशा अवस्थेला पोहोचलेला आहे की, त्याला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि वैचारिक क्षेत्रात नेतृत्वच उरलेले नाही ! सगळीकडे स्वार्थ आणि स्वत.पुरते पाहणे. अस्पृश्यांचे प्रश्न हे तर हिंदु धर्मातील पोटजातीचे प्रश्न आहेत; परंतु भारतातील मुस्लिमांच्या समाजविषयक प्रश्नांकडे तरी कोणाचे लक्ष आहे ?

आज अस्पृश्य जातीतील संवेदनाक्षम मनांला कंठ तरी फुटला आहे. दया पवार, लक्ष्मण माने, प्र. ई. सोनकांबळे, माधव कोंडविलकर, शंकरराव खरात आपापल्या आत्मकथनाच्या माध्यमातून समाजापुढे आपल्या व्यथा घेऊन येत आहेत. त्यांच्या दु खाचं एक विदारक, भेदक, स्फोटक चित्र समाजापुढे माडत आहेत, हेही नसे थोडके ! यालाच क्रांतीचं अर्धं चाक म्हणायचं काय ?

## अनेक ताण

आत्मचरित्र हा साहित्यप्रकार वाचकमनावर दोन प्रकारे परिणाम करतो, असे दिसून येते. एक म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनाचा आणि दुसरा म्हणजे त्या चरित्रात व्यक्त झालेल्या सामाजिक घडामोडीचा. खरातांनी सुरुवातीलाच सागितले आहे की, माझे आत्मचरित्र ही एक 'स्टोरी ऑफ अनटचेबल ' आहे. खरातांनी इतरही ललित साहित्य लिहिले आहे. अस्पृश्यांच्या अनेक कथा त्यांच्या साहित्यात पूर्वी येऊन गेलेल्या आहेत. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यातूनही दलितांची कथा आलेली आहे. मग त्यांना दलिताची कथा सांगण्यासाठी स्वतः-च्याच जीवनाचा ललित आविष्कार का करावासा वाटला, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांना समाजापुढे आत्माविष्काराच्या माध्यमातून प्रगट व्हावेसे का वाटले ? मला वाटते, व्यक्तीचे जीवन एखाद्या विशिष्ट इतिहासाचे वळण घेऊ लागते, त्याच्या जीवनाला महत्त्वपूर्ण सामाजिक संदर्भाचे महत्त्व प्राप्त होते तेव्हा ते जीवन खाजगी, वैयक्तिक किंवा वळचणीचे जीवन राहात नाही. त्या जीवनात विलक्षण ताण निर्माण झालेले असतात. हे ताण त्या व्यक्तीच्या केंद्रबिंदूशी थेट येऊन भिडलेले असतात. व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाच्या आविष्कारातून निर्माण झालेले ताण आणि समाजाच्या निरनिराळ्या केंद्रबिंदूपासून निर्माण झालेले ताण यांचा संघर्ष व्यक्तिजीवनात सतत चालू असतो. या ताणामुळे तिच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. व्यक्तीच्या जीवनाला जी एक सामाजिक परिस्थिती लाभलेली असते; त्या परिस्थितीत राहून हे ताण सहन करणे कठीण होऊन बसते. व्यक्तीचे वैयक्तिक जीवन या ताणांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे क्षणोक्षणी स्फोटक बनते आणि अशा परिस्थितीत सापडलेली व्यक्ती जर संवेदनाक्षम असेल, बुद्धिमान असेल, तर तिला हे ताणांचे जीवन जगणे अशक्य होते. मनाने तर निश्चितच अशक्य होते !

अशा या अनंत ताणांचा संघर्ष खरातांच्या जीवनचित्रातून व्यक्त झालेला आहे.

आत्मचरित्राच्या सुरवातीलाच त्यांनी निवेदन केलेला प्रसंग या दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. एक तराळ खरातांच्या वडिलांच्या दारी त्यांचे एक अर्धेमुर्धे पत्र घेऊन येतो, कधी नव्हे ते दारात आलेले पत्र पाहून सर्वांचीच मने गलबलतात. पत्र कोणालाच वाचता येत नाही. या व्यथेचा एक ताण. ते दुसऱ्याकडून वाचून घेण्याची पाळी. परावलंबित्वाचा हा दुसरा ताण. ज्या मास्तराकडून ते वाचून घेण्याची पाळी येते त्यामधून वर्णविषमतेचा निर्माण झालेला ताण. त्यामधून 'महार दाराशी आला आहे. त्याच्याकडून लाकडं फोडून घ्या!' या मास्तराच्या बायकोच्या वाक्याचा आघात. निरक्षरता, विषमता, असहाय्यता आणि अस्पृश्यता (दारी आला आहे.) या सर्वांच्या मिश्रणाने निर्माण झालेली एक दयनीय भावना ! सर्व लाकडे फोडून झाल्यावर मास्तर खरातांच्या वडिलांना ते अर्धेमुर्धे अमगल

पत्र वाचून दाखवितात. हा शेवटचा फसवणुकीचा फटका जबरदस्त आहे. त्याचा परिणाम छोटया खरातांच्या (या सर्व प्रसंगाला साक्षी असणाऱ्या) मनावर झाल्याशिवाय कसा राहील ?

खरात आपल्या आत्मचरित्रभर असे छोटेमोठे प्रसंग निवेदन करीत जातात. अशा प्रसंगांतूनच त्यांचे जीवन घडत जाते. त्यांच्या आत्मचरित्राला तसे पाहिले तर आत्मचरित्राचे रूप नाही. (हा झाला ललित साहित्यविषयक विचार.) प्रसंग तारीखवार टिपीत जाणाऱ्या डायरीचेही त्याला रूप नाही, तर प्रसंगानुरूप आठवणी सांगत जाणारे रूप त्यांच्या निवेदनाला लाभलेले आहे. त्यामुळे त्यातून कालप्रवाहाचा ओघ विकसित होत नाही. एखादी आठवण सांगून ती मध्येच सोडली जाते. उदाहरणार्थ, बहीण सासरहून पळून माहेरी आल्याचा प्रसंग. नंतर काही समझोता होऊन तिला पुन्हा सासरी पोहोचवून आल्याचा प्रसंग. त्यानंतर पुन्हा शेवटपर्यंत तिच्याविषयीचे काहीही उल्लेख नाहीत. तसेच आत्मचरित्राच्या शेवटी वडील आणि दोन बहिणी हयात नाहीत एवढाच उल्लेख करून त्यांनी आपल्या घराच्या भावबंधाचे चित्र पूर्ण केले आहे; म्हणजे तसे अपूर्णच सोडले आहे.

खरातांचे मन स्वतःच्या कुटुंबात पूर्ण रमलेले आहे. त्यांच्या चंद्रमौळी घराची वास्तू, तिच्यात राहणारी प्रत्यक्ष रक्तसंबंध असणारी माणसे, इतकेच नव्हे तर मणीलवंगीसारखे आश्रित प्राणी त्यांच्या संवेदनाक्षम बालमनाला चिकटलेले आहेत. धाकटा भाऊ जिवावरच्या दुखण्यातून बरा व्हावा म्हणून आईने घरच्या शेळीचा बोकड बळी दिला तेव्हा खरातांचे मन आक्रंदून उठले ! देव-धर्म, व्रतवैकल्य, धर्मभावना, ईश्वराचे अस्तित्व आणि रूढीचे बंधन यांचा गुंता त्यांच्या मनात इतक्या विलक्षण रीतीने गोळा झालेला दिसतो की, त्यापेक्षा अधिक गुतागुंतीची वस्तू जगात कोणती नसेल ! (प्रकरण ३५, पान २०४)

त्यांच्या साऱ्या आत्मचरित्रात व्यक्त झालेलं खरातांचं जे मन आहे, ते कलावंताचं मन आहे. वास्तवाचं भान कुठेही सुटू न देता त्यांच्या आत्मचरित्राला कलाकृतीचं रूप लाभतं ते या त्यांच्या मनामुळंच. वास्तवाच्या खत-पाण्यात तर त्याचं पोषण झालेलं आहेच आणि तरीही कल्पित सत्याच्या सीमारेषांचं त्याला चांगलं भान आहे. ते अलिप्त आहे तितकंच ते वास्तवाच्या समोर जाण्याइतकं समर्थही आहे ! जीवनात हरघडी निर्माण होणाऱ्या सामाजिक, जातीय, वर्णविषयक विषमतेनं ते पेटून उठतं, व्याकूळ होतं; परिणामी निराशेनं, खिन्नतेनं भरून जातं. तरीही संस्कारक्षम प्रगल्भतेमुळं ते विचलित होत नाही, पिसाट होऊन ते आक्रोश करीत नाही, बेभान होऊन जीवनाच्या एका विशाल सत्यापासून दुरावत नाही. त्याना त्या सत्याचं एक शहाणं भान आहे !

चरित्राचा विषय जेव्हा ललित साहित्याचं रूप घेऊन अवतरतो तेव्हा त्याला सौंदर्याचं रूप घ्यावंच लागतं. लक्ष्मीबाई टिळक यांनी जेव्हा आपली 'स्मृति-चित्रे' लिहिली तेव्हा त्याच्या प्रस्तावनेत कमलाबाई देशपांडे यांनी लेखनातील अलिप्ततेविषयी असे लिहिले आहे की, 'चरित्र सांगणाराला जो एक त्रयस्थाची भूमिका घेता यावी लागते ती त्याना साधली आहे. हा अलिप्तपणा लेखकाला साधला तर संसारात ( जीवनात ) घडलेल्या घटनांचं मूल्यमापन लेखक बरोबर करू शकतो. ही अलिप्तपणाची वृत्ती साधणं कठीण आहे; पण लक्ष्मीबाईंना तीच नेमकी साधली !'

आपल्या आत्मचरित्रात खरातानाही ही अलिप्तता बरीच साधलेली आहे. आत्मचरित्र म्हणजे आक्रोश नव्हे, विद्रोह नव्हे, क्रिया-प्रतिक्रियांचं तुंबळ युद्ध नव्हे. तो जीवनाकडे आणि त्याचबरोबर जगाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण आहे. रणांगणावर युद्ध चालू असतं तेव्हाचा प्रत्यक्ष अनुभव आणि युद्ध संपल्यावर एखादा योद्धा युद्धाची कथा सांगतो ती अनुभव-कथा, यात सत्याचा विपर्यास नसूनदेखील अनुभवाला मिळालेल्या कलात्मक रूपामुळं त्याचं स्वरूप अधिक सौंदर्यमय झालेलं असतं. कटु गोष्टी संपन्न दृष्टिकोणातून रूप घेऊन बाहेर पडल्या म्हणजे मूळ परिणामापासून त्या अधिक प्रत्ययकारी होतात. घटना आणि व्यवहाराला चिकटलेल्या मनातून परिस्थितीचं बहुरंगी आकलन होत नाही. त्यासाठी मनाला परिस्थितीपासून अलगद सोडवून घ्यावं लागतं. त्याला अलिप्ततेच्या पातळीवर नेऊन निरनिराळया टप्प्यांवरून परिस्थितीकडे पाहायला लावावं लागतं. त्यामुळंच परिस्थितीमधून निर्माण होणाऱ्या अनुभव-चित्राला डायमेन्शन्स लाभतात.

खरातांच्या आत्मचरित्राला अशी डायमेन्शन्स अनेक ठिकाणी लाभलेली दिसतात.

### बकऱ्याचा अंत

'म्हसोबाला बोकड दिला !' या प्रकरणात खरातांच्या मनाच्या पातळया फार तरलतेनं व्यक्त झालेल्या आहेत. धाकटया मुलाचा मृत्यू टळावा म्हणून खरातांची आई म्हसोबाला बोकड बळी देण्याचं ठरविते, त्याचं सारं वर्णन आहे. तो बोकड घरच्या शेळीचा आहे. लळा लागलेला आहे. सुंदर, गोजिरवाणा आहे. इथं त्यांच्या आईचं मन एका साध्या आईचंच मन आहे. पोटच्या पोराच्या मायेनं अंतर्बाह्य व्यापलेलं ! खरात वयानं लहान आहेत; पण त्यांचं मन संवेदनाक्षम आहे, त्यांच्या हातात कृतीचं सामर्थ्य नाही, स्वातंत्र्यही नाही ! मनाला फक्त विचार करण्याचं सामर्थ्य आणि स्वातंत्र्यही आहे. भावना आणि विचार यांच कार्य या प्रकरणभर चालू आहे. त्यांच्या मनाला त्या बळीच्या बकऱ्याचा आक्रोश ऐकू येतो. गावाकडं पाहून बें ऽ बें करून ओरडणाऱ्या त्या आवाजाने खरातांच्या आतडयाना पीळ पडतो. बोकडाच्या आईची त्यांना आठवण येते. आपल्या आईकडेही ते सुप्त मनानं पाहतात. (त्या सुप्त मूक मनाचा स्फोट पुढ होतो : पान ३५७ ). घासाघासानं मृत्यूच्या जबडयात जाणाऱ्या आपल्या आजारी भावाचीही त्यांना आठवण येते !

बकऱ्याचा अंत ही घटना त्यांच्या मनाला यातना देते. असे का होते ? कापलेल्या कोंबडया-बकऱ्याचं मांस खरातानी खाल्लेलं आहे. त्यांना त्यात निषिद्ध काहीच नाही. ते अहिंसावादी नाहीत. रानात बकऱ्या चारत असताना त्यानी गलोलीनं व्हले मारून तिथल्या तिथं भाजून खाल्लेले आहेत ! मग या हिंसेच्या बाबतीत त्यांचं मन का गलबलावं ? खरातांच्या लेखणीतून हा जो चरित्रांश उतरलेला आहे, तो अनेक पातळयावरून बोलका झालेला आहे. एक तर भावाप्रमाणे लळा लावलेला बोकड बळी जात आहे. दुसरे धाकटा भाऊ मरणाच्या

पंथाला लागलेला आहे. तिसरे रूढीची आणि धर्मभावनेची निरर्थकता त्यांच्या मनाला कुठे तरी जाणवलेली आहे. हे बलिदान परिणामकारक नाही, तर निरर्थक आहे, याचीही एकीकडे जाणीव आहे. या साऱ्या विलक्षण गुतागुंतीच्या ताणामुळं त्यांचं मन सुन्न झालेलं आहे. मनाच्या याच एका अवस्थेतून या प्रकरणाचं चित्रण झालेलं आहे. निराशा, निरर्थकता, विषण्णता, नश्वरता, खिन्नता आणि अपराधी भावना या साऱ्यांचे पदर या प्रसंग-चित्रणाला लाभले आहेत. या साऱ्या प्रसंगांनी ओथंबलेलं खरातांचं मन त्यांच्या केंद्रस्थानी आहे.

या त्यांच्या मनाचं दर्शन सतत घडत जातं आणि त्यामुळच त्यांच्या या आत्मचरित्राला केवळ प्रसंगनिवेदनाचं एकेरी स्वरूप राहात नाही. ती केवळ एक 'स्टोरी ऑफ दि अन्‌टचेबल' या एकाच पातळीवर राहात नाही. माणसाने माणसाशी दिलेला माणुसकीसाठी झगडा, असं विशाल स्वरूप त्याला लाभलेलं आहे!

त्यांच्या गावात राहणाऱ्या त्यांच्या जातीच्या लोकांचीही एक जीवनपद्धती आहे. तिथेही एक तक्क्या-न्यायालय आहे. तिथे त्यांच्या या जीवनपद्धतीचं मथन होतं. न्यायनिवाडे होतात आणि ते सर्व जमातीवर बंधनकारक असतात. खरात त्यांच्या या ज्ञातीच्या समूह-जीवनाच चित्रण करतात, तेव्हा तेही अनेक पदरांतून व्यक्त झालेलं दिसतं. येथेही नीति-अनीतीचे, कुटुंब-व्यवस्थेत धर्मभावनेचे आणि माणुसकी या सदरात येणारे प्रश्न आहेत. स्पृश्य आणि अस्पृश्य समाजात या प्रश्नाचा तोंडवळा सारखाच आहे; परंतु एखाद्या टाकलेल्या बायकोने व्रतवैकल्य करावीत, ती जितकी केविलवाणी दिसतात तशा स्वरूपाचे हे सारे व्यवहार दिसतात!

म्हणजे एकीकडे माणूस म्हणून वाट्याला आलेल्या नियतीची त्यांना डोळस जाणीव झालेली आहे. ते जीवन जगणं अपरिहार्य आहे. त्यातून निर्माण झालेल्या सर्व बधाची त्यांच्या मनाला कल्पना आलेली आहे. आपलं घर, आई-बाप, भावडं, चुलते, पुतणे, शेजारी आणि त्यापलीकडचा आपला समाज. त्यांच्यात जगलं पाहिजे, तसंच त्यांच्यासाठीही जगलं पाहिजे, याची सुप्त जाणीव त्यांच्या मनाला जशी आहे तशीच स्वत साठीही जगलं पाहिजे, परंतु ते जगणं परंपरेतल्या प्रवाहामधलं असता उपयोगी नाही; आपली वाट आपणच काढली पाहिजे, प्रसंगी फोडली पाहिजे, याची दुर्दम्य जाणीवही तिथे दिसते!

ही जाणीव जसजशी प्रगत आणि प्रबळ होत गेली तसतसे त्यांच्या जीवनात अनंत प्रकारचे ताण निर्माण झाले. हे ताण शेवटपर्यंत त्यांच्या जीवनाला वेढून राहिलेले दिसतात. अगदी मराठवाडा विद्यापीठाचं कुलगुरुपद मिळालं, पुणे विद्यापीठाच का नाही? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होतो आणि हा प्रश्न वरवर दिसतो तितका साधा सरळ नाही! त्यांच्या जीवनाभोवती वेढल्या गेलेल्या ताणांतून तो निर्माण झालेला आहे. म्हणजे इथे नियतीविरुद्धच्या झगड्याचा पदर सुटलेला आहे आणि एका विशाल सामाजिक झगड्याशी येऊन तो भिडलेला आहे! नियतीशी झगडा हा तर प्रत्येक जन्मलेल्या माणसालाच द्यावा लागतो; परंतु खरात देत असलेल्या झगड्याचं स्वरूप दुहेरी (तसंच अनेक पदरी) आहे.

ज्या समाजात त्यांनी जन्म घेतला त्या समाजाची सारीच सुख-दु:ख नियतीतून निर्माण झालेली नाहीत. ती मानवनिर्मित आहेत, समाजनिर्मित आहेत ती अनिवार्य नाहीत, तर सूर्याआड ढग यावेत तशी ती आहेत आणि यातूनच अस्पृश्यतेचा काळा डाग निर्माण झालेला आहे. अस्पृश्य माणूस समाजात जिथे जाईल तिथे हा डाग त्याचा पिच्छा सोडीत नाही. शिवाय हा डाग जिथे जातो तिथे त्या माणसाला माणूस म्हणून वागवलं जात नाही! धड माणूस म्हणूनही नाही आणि धड जनावर म्हणूनही नाही, अशी त्रिशंकूसारखी त्याची विचित्र अवस्था झालेली आहे आणि या अवस्थेविरुद्ध अविरत चाललेल्या झगड्याचा तो शब्दरूप आविष्कार आहे. त्यात त्यांना शिक्षणापासून झालेल्या फायद्याचं जसं प्रामाणिक चित्रण आहे, तसंच या शिक्षणामुळं आपल्या अवस्थेची झालेल्या विदारक जाणिवेचही चित्रण आहे. त्यामुळ त्यांच्या दु:खाला उलट अधिकच गहिरेपणा आलेला आहे.

अलीकडच्या तीस वर्षांच्या काळात खेडी बदलत आहेत, शहरं बदलत आहेत. परिस्थितीमध्ये हळूहळू सुधारणा होत आहे, परंतु त्यामधून अशीही एक तीव्र जाणीव होत आहे की, हा सारा बदल वरवरचा आहे. अजून माणूस बदलत नाही. त्यांच्या धमन्यांमधून वाहणाऱ्या रक्तातील संस्कार बदलत आहेत काय? त्याने निर्माण केलेल्या परंपरागत रूढ कल्पनेला हादरे बसत आहेत काय? चार शिष्यवृत्त्या देऊन आणि वतने नष्ट करून काही सुधारणा होणार आहे काय? त्यामुळं प्रस्थापित जीवनव्यवस्थेत आमूलाग्र क्रांती होणार आहे काय? हे समग्र क्रांतीचं चाक आसासह कशाने फिरेल? या प्रश्नांची उत्तरं कुठून मिळतील? ती उत्तरं कोणाकडून मिळतील? खरातांच्या आत्मचरित्राच्या निमित्तानं असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात.

हेच त्या आत्मचरित्राचं मोठेपण! ¤

तराळ-अंतराळ
लेखक : शंकरराव खरात
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठे : ४२७ (डेमी)
मूल्य : चाळीस रुपये.

फिनिक्स निवड

# भाषा

अलीकडे अमेरिकेत 'भाषा' या विषयावर एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्याचे नाव आहे 'On Language'. काही लोकाना भाषा, भाषेची व्युत्पत्ती हे शुष्क विषय वाटतात. या पुस्तकाच्या लेखकाला (William Safire) ती जाणीव असावी म्हणूनच त्याने ह्या विषयातील नेहमीची क्लिष्टता टाळून एक वेगळा, ताजा अॅप्रोच घेतला आहे. या त्याच्या शैलीमुळे हे पुस्तक किचकट असेल असे तुम्ही मनातून काढून टाका!

भाषेच्या व्याकरणाला आपण अवास्तव महत्त्व देत असतो. त्यामुळेच भाषा कुंठित होत असते. शेवटी भाषा असते कशासाठी? विचारांच्या देवाणघेवाणीसाठी. आपल्याला आत्माभिव्यक्ती करता यावी यासाठी. जी माणसे आपापले अनुभव-विश्व आटोपशीर-

रीत्या मांडू शकतात, ते लेखक. अनुभवविश्व कागदावर उतरले की ते साहित्य. साहित्यात महत्त्व असते ते अनुभव विश्वाला, भाषेला नाही. तुम्हीच सांगा की, तुम्हाला एखाद्या मुलुखावेगळ्या माणसाने (त्याच्या क्षेत्रात) लिहिलेले अनेक व्याकरणयुक्त चुका असलेले आत्मचरित्र आवडेल, की अगदीच अस्खलित, बिनचूक, भावे, कर्तरी, कर्मणी प्रयोगशैलीत लिहिलेले; पण हातचे राखून लिहिलेले आत्मचरित्र आवडेल ? भाषा ही अशी लिहायला हवी की, बहुतेक प्रा. त्यांच्या खुर्चीवर वरखाली (Squirm) होतील.

भाषा ही अशी एक वस्तू आहे की, आपण तिच्यापासून अनेक प्रकारचे स्वातंत्र्य घेतले पाहिजे. (We must take liberty with the language. Only then it becomes pliable.) समजा, तुम्ही एका व्यक्तीवर भरपूर प्रेम करता. तुम्ही तिच्याशी किती लिबर्टीज घेता ? कितीशी लगट करता ? याचे उत्तर असेच द्यायला हवे की, तुमचे जितके प्रेम अधिक, तितकेच तुमचे तिच्याशी स्वातंत्र्य घेण्याचे प्रमाण अधिक. प्रेम करण्याची जेवढी उत्कटता अधिक, तेवढ्याच प्रमाणात इंद्रीयव्यापारनिग्रहाची (inhibitory process) घट अधिक. तुम्ही भाषेशीही स्वातंत्र्य घेतले नाही तर तिथेही मनोनिग्रहाची वृद्धी होत असते. चुका तुम्ही कितीही करा. व्याकरण-सम्राटांना त्याची दुरुस्ती करू द्या; पण तुम्ही जर चिकाटी ठेवली तर एक दिवस असा येईल की, कोणत्याही व्याकरण-सम्राटापेक्षा तुम्ही अधिक वाचनीय मजकूर लिहू शकाल. व्याकरणाविषयी आदर जरूर ठेवा ! मुद्दामहून त्याचे नियम धाब्यावर बसवू नका; पण त्या नियमाची भीती ठेवू नका !

असे म्हणतात की, लिखित भाषेत जेवढी अवधाने ठेवाल तेवढी थोडीच; पण हे विधान न पटण्यासारखे आहे; पण तुम्ही बरीच अवधाने ठेवायला जाल तर मनोनिग्रहाच्या वेटोळ्यात (कमी-अधिक प्रमाणात) गुरफटून जाल ! भाषा समृद्ध होत असते ती अशी अनावधानानेच. भाषासमृद्धीसाठी मुद्दामहून शब्दसंचय करायचा कुणी प्रयत्न करीत नाही. एका भाषेचा दुसऱ्या भाषेशी जितका घनिष्ठ प्रमाणात संबंध येतो तितकी ती भाषा संपन्न होत असते. असे म्हटले जाते की, मराठी माणूस सीमित असतो. या कारणामुळेच तर मराठी भाषा सीमित राहिली नसेल ?

भाषा बावनकशी ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या भीतीचा व नियमांचा उपयोग होत नाही. आधी सांगितल्याप्रमाणे जितके नियम अधिक ! तेवढ्या भाषेच्या जालीम जखमा अधिक. भाषा बावनकशी ठेवण्यासाठी व समृद्ध करण्यासाठी अधिकाधिक लेखकाची, वक्त्यांची जरुरी असते. वक्ते व लेखक हे भाषेचे कुंभार असतात. (एखाद्या वेळेला खऱ्या कुंभाराचे इन्कम लेखकापेक्षा जास्त असेल !) तेच तिला आकार देत असतात. कारण भाषेशी स्वातंत्र्य घेताना ते कसे व किती प्रमाणात घ्यावे याचे त्यांना भान असते. निदान बहुतेकांना तरी. अर्थात् नियमांचा अती बाऊ केल्याने जसा भाषेचा खून पडतो, तसाच भाषेशी घेतलेल्या बेजबाबदार स्वातंत्र्यानेही तिचा खून पडू शकतो.

मोठ्या शहरातील काही नामांकित पेपरात, 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरात एखाद्या गावरान पत्रात, जोष कसा ढब्बू मिरच्यात लवंगी मिरचीसारखा वाटतो !

मराठी भाषेची सध्या तुम्हाला चिंता वाटते ना ? मग वक्ते व लेखक यांना जोपासा. त्यांचे पेव फुटू दे ! उत्तमोत्तम ग्रंथालये चालू द्या. मराठी लेखकांना जो 'शिधा' मिळतो तो बंद करा किंवा 'मानधन' हा रूढ झालेला शब्द काढून 'शिधा' हा शब्द प्रचलित करा. सध्या बहुतेक लेखकांना मानही मिळत नाही व धनही मिळत नाही !

संस्कृतीचा डोलारा व शासनाचा कारभार भाषेच्या स्तंभावर आधारित असतो. असे असतानाही साहित्य व भाषेच्या वृद्धीसाठी प्राधान्य दिले जात नाही आणि दिलेच तर ते कधी–कधी चुकीचे दिले जाते. लेखकांना तणावयुक्त वातावरणात विचार करायची व लिहायची संधी मिळाली पाहिजे. पोटतिडकीचे लेखक भाषेशी जे स्वातंत्र्य घेतात ते अगतिक असते. कारण त्यांना जे सांगायचे आहे ते नेहमीच्या चौकटीत त्यांना न सापडणारे असते. काही काही वाक्प्रचार व काही रूढ शब्द एक तर त्यांना पटत नाहीत किंवा ते वापरून वापरून इतके गुळगुळीत झालेले असतात की, त्यामुळे हवा तो असर होत नाही. क्वचितच जोसेफ कॉनरॅडसारखा एखादा लेखक असा होऊन जातो की, 'I do not possess the language. The language possesses me.' परंतु अधिक खोल विचार केला तर हे 'क्वचित' होत नाही, हे वरचेवर होत असते. आपल्यातील काही व्यक्तींना विचित्र, वेगळ्या प्रकारची अनुभूती येत असते अनुभूती शब्दबद्ध करण्यासाठी आपला जीव कासावीस, व्यथित व व्याकूळ होत असतो. विशेषत: प्रसंग जर पहिलावहिला असेल तर ती व्यथा फारच तीव्र असते. पुढे जितका सराव होत जातो तितकी तीव्रतेची धार कमी होत जाते; पण पोटतिडकीच्या लेखकाला ही धार नेहमीच सतावत असते, व्याकूळ करत असते. म्हणजे आपल्याला असे म्हणता येईल की, आता भाषा त्या पोटतिडकीच्या लेखकाचा सपूर्ण ताबा घेत असते. तुम्ही पुढचा सवाल असा कराल की, कुणी भाषेच्या ताब्यात गेला, तर ती व्यक्ती तिच्याशी लिबर्टिज घेणार कशी ? पण ताबा घेण्याचा प्रकार संपल्यानंतर भाषा व लेखक याचे घरमालक–भाडेकरी असे संबंध रहात नाहीत. सुदैवाने पुढच्या टप्प्यात ते एक प्रकारचे प्रेमी युगुल बनते. उत्तम लिखाणात शैली, विचार व विषय शेवटी गायक, तबला व तंबोरा यांचा लयबद्ध सूर कातायला लागतात. लेखकाने या प्रकरणात भाषेला रखेली (इथे रखेलीचा अगदी व्यापक अर्थ घ्यावा. प्रेयसी म्हणा हवं तर !) म्हणूनच ठेवले पाहिजे. नाही तर स्त्री स्वभावानेच अशी असते की, तिला दुसऱ्याला नाचवायला व खेळवायला सारखे आवडत असते ! (क्षमा करा, स्त्रीमुक्तीवाल्यांनो ! पण सत्य कसे झाकले जाईल ?)

लिखित भाषेत फक्त काही ढोबळ नियमांचे पालन केले की भागते. (तात्त्विकदृष्ट्या कितीही जरी अवधाने ठेवली तरी लिखित भाषेत ती कमी पडतात. हे या आधीच मी 'माणूस'मध्ये एकदा लिहिलेच होते.) मला इथे भाषेविषयी जे लिहायचे आहे ते फक्त अनुभूती शब्दबद्ध करण्यासाठी. तसा विचार केला तर अनुभवविश्व शब्दबद्ध केलेले साहित्यच खरे साहित्य असते. अनुभवाचं रूपांतर शब्दात उतरण्यासाठी लेखकाने एका गोष्टीचे भान पदोपदी ठेवावे लागते. ते हे की, लिखित भाषेची वाचनीयता ही उन्हाळ्यातील शेकलेल्या पापडासारखी कुडुम–कुडुम वाजायला पाहिजे. हा पापडाचा ताजेपणा

व बिस्किटाचा Crispness जुन्या पिढीतील एका इंग्रजी लेखकाला अवगत होता तितका पुढे अरूल्या जगात कुणाला जमला नाही ! सॉमरसेट मॉमने एकदा स्वतः कबूल केले होते की, ' I am in the very first row of second–raters ' आणि गंमत अशी की, आपण ज्या क्लासिक लिटरेचरच्या साहित्याचे निकष लावतो ते जर मॉमना लावले तर ते कदाचित Very first in the third row च्या पंक्तीत बसतील ! मॉमना जे लक्षावधी वाचक मिळाले ते त्यांच्या वाचनीय मजकुरासाठी व त्यांनी उभ्या केलेल्या व्यक्तिचित्रणासाठी.

साहित्य हे दुसऱ्यापर्यंत जाण्यासाठी असते. त्यासाठी भाषेच्या कुरकुरीतपणाची अत्यंत आवश्यकता असते. साहित्याच्या दर्जाचा प्रश्न त्यानंतर येतो. सॉमरसेट मॉमची शोकांतिका अशी की, पहिले महत्त्वाचे पाऊल घेऊनच तो थांबला. जणू स्वतःच्या शैलीच्या ताजेपणानेच नार्सिस्टिकरीत्या मंत्रमुग्ध झाला. पुढील तितकाच महत्त्वाचा टप्पा त्याला कधीच अंगिकारता आला नाही.

भाषेत कोणताही एक शब्द इतर अनेक वाक्यानंतर जरी वापरला तरी लिखाणाचा ताजेपणा थोडा कमी होत असतो. त्यामुळे दुसरा पर्यायी शब्द वापरलेला बरा.

तसे पाहिले तर संगीत, चित्रकला, अभिनय, फार काय अनेक प्रकारचे खेळ हे आत्माभिव्यक्तीचेच प्रकार असतात; पण बोलणे आणि लिहिणे हे अभिव्यक्तीचे महत्वाचे व अतिम प्रकार आहेत. ते तसे आहेत म्हणूनच इतर Self–expression चे प्रकार होऊ शकतात. काव्याचा प्रकार हा एक आत्माभिव्यक्तीमधला भला मोठा अडसर आहे. कारण काव्यामुळे अनुभूतीच्या आविष्काराचे वर्तुळ आकुंचन पावत जाते म्हणजे ते कमीत कमी लोकापर्यंत जात असते. गंगाधर गाडगीळ नव्हते का एकदा म्हणाले, "महान गुतागुंतीचे व व्यामिश्र विषय काव्यातून सागता येत नाहीत."

लेखकांनी Self–expression करताना 'हीच माझी शेवटची संधी आहे' असा दृष्टिकोन ठेवला तर लिखाण उत्तम होत असते. या वेळी भाषेला तजेला व धार चढते व त्याला जे सांगायचे असते त्याच्या ८०–९० टक्के वाचकांपर्यंत पोचले जाते.

भाषेच्या वापराबद्दल आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे शब्दांची काटकसर. तुम्हाला नेमके जे काही सागायचे आहे ते कमीत कमी शब्दात सागण्याची सवय ठेवली तर तुमचा शब्दसंग्रह कमी न होता सेव्हिंग अकाउंटसारखा व्याजासह वाढत राहील ! वाचकालाही ते आवडते. माणसाचा सामान्यतः स्वभावच असा असतो की त्याला अपव्यय आवडत नाही.

विल्यम सॅफायरने 'On Language' या त्यांच्या पुस्तकातील वरील थोडे मुद्दे सागितले आहेत. बाकीचे मी माझ्या स्वतःच्या अनुभवावरून लिहिले आहेत.

आता आपण या पुस्तकातील गमतीदार विभागाकडे वळू. एक माणूस जुन्या मोटारगाड्या विकण्याचा धदा करीत असे. 'सेकडहँड कार्स अॅव्हलेबल' ही पाटी काढून त्याने "Fine pre–owned cars" ही पाटी लावल्यानंतर त्याचा धंदा वाढीस लागला !

आणखी एकाने Birth Control ला evading the issue असे नाव दिले !

विल्यम सॅफायरनी या पुस्तकात खुद्द अमेरिकन प्रेसिडेट कार्टरची चूक काढली आहे. कार्टरनी एकदा लिहिले होते (का न्यूयॉर्क टाइम्सने छापले होते ? ) "The Iranian Government cannot FLAUNT the expressed will and law of the world community." अर्थात इथे FLAUNT च्या ऐवजी FLOUT हवे होते; पण या चुकीमुळे त्या अमेरिकन प्रेसिडेंटचा 'पीनटपणा' अधिकच वाढला ! अध्यक्षाना रखेल्या ठेवणे अत्यंत सोपे असते असे म्हणतात, पण अध्यक्षांना आपल्यासारखे भाषेला रखेली म्हणून निश्चित ठेवता येत नाही !

एकदा यूजीन ओ'नील म्हणाला होता, "Writing for me is a holiday from living." हॉलीडे घेत असताना भाषेच्या नाइसिटीजबद्दल कोण विचार करणार ?

–जे. एन्. पोंडा

## मुंबई सकाळ : पृष्ठ ४ वरून

यांनी मंत्रालयात नुकतीच एक बैठक घेतली. बैठकीत सविस्तर चर्चा झाली आणि वरील मागणी कामगारांनी पुढे रेटली.

याच मागणीसाठी १७ मार्चला या कामगारानी सकाळ प्रा. लिमिटेडचे अध्यक्ष जसवंत मटूभाई यांच्या घरावर मोर्चा काढला. त्यांना कामगारांनी एक निवेदन सादर करुन हा संप लवकर मिटविण्यासाठी आवाहन केले.

'मुंबई सकाळ' लवकर चालू व्हावा. नव्हे तो बंदच पडावयास नको होता, हे जरी व्यवस्थापक आणि कामगार यांना वाटत नसले, तरी त्यांच्या असंख्य वाचकांना तसे वाटते. मुंबईतील कामगारांचा 'मुंबई सकाळ' आवडता आहे. गिरणगावातील प्रत्येक चाळीत 'मुंबई सकाळ' पहिल्यांदा आवडीने वाचला जातो. म्हणूनच संपावर असलेले २॥ लाख गिरणीकामगार या पेपरची आतुरतेने वाट पहात आहेत. गुढीपाडव्यापर्यंत हा पेपर मुंबईकरांच्या हातात पडेल असं चिन्ह आज दिसत आहे. म्हणूनच प्रतिक्षा आता गुढीपाडव्यापर्यंत आहे !

–मोहन शं. कुलकर्णी
घाटकोपर

## राष्ट्रीय एकात्मता : पुणे

पृष्ठ १ वरून

यावर काही तरी, मलमपट्टी का होईना, पण केलीच पाहिजे, असं इथल्या कट्टर हिंदुत्ववाद्यांनाही वाटायला लागलं. त्यातूनच गेल्या महिन्यात १ ते १४ फेब्रुवारी या काळात विश्व हिंदु परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जनजागरण अभियान मोहिमेचा जन्म झाला. सर्व जाती, पंथ विसरून, अस्पृश्यतेला मूठमाती देऊन सकळ हिंदुनी संघटित व्हावं. बंधुत्वाच्या नात्यानं वागावं, असा या मोहिमेचा मुख्य संदेश होता. तो ज्यांच्यापर्यंत पोचायला हवा होता त्यांच्या पर्यंत पोचला की नाही, याची कल्पना नाही, पण अभियानाची पुण्यातील सागता मिरवणूक काही निर्विघ्नपणे पार पडली नाही. मुसल-

मानांच्या दुकानावर दगडफेक करण्याचे, लकी आणि सनराइज ही इराण्यांची दोन प्रसिद्ध हॉटेलं जाळण्याचे प्रकार सागता मिरवणूक चालू असतानाच घडले. काही ठिकाणीं याला मुसलमानांनी स्थानिक ताकदीनुसार प्रत्युत्तरही दिलं. यात सुदैवाची गोष्ट एवढीच की, या प्रकाराची सख्या व तीव्रता वाढली नाही; उलट झपाट्याने संपुष्टात आली. याच मुख्य श्रेय, पुण्यातल्या हिंदू मुस्लिमांच्या समजूतदारपणाबरोबरच पुण्याचे पोलीस आयुक्त एस. राममूर्ति यांनाही द्यायला हवं ! पण घडलेल्या गैरप्रकारांना जबाबदार कोण, याची चर्चा आता सुरू झाली. इतराप्रमाणेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसलेही आपल्या बुद्धीनुसार या चर्चेत सहभागी झाले. धर्मवेड्या हिंदुत्ववाद्यांची ही दुष्कृत्यं असल्याचा (विशेषतः पतितपावन संघटना) निर्वाळा देऊन डावी मडळी स्वस्थ झाली, तर हिंदुत्ववाद्याच्या गोटात निराळीच खळवळ माजली. विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकारांबद्दल समाजकंटक व गुडाना दोषी धरलं; पण त्याच वेळी पतितपावन संघटना, हिंदु एकता व शिवसेना या तीन बहुताशी समविचारी संघटनांमधील अंतर्गत सत्तास्पर्धेतूनच, एकमेकाना बदनाम करण्याच्या हेतूनेही हे प्रकार घडल्याच्या निष्कर्षाप्रत काहीजण आले.

दरम्यान गेल्या २६ जानेवारीला पुण्यातच सुरू झालेल्या एका घटनेचा दुःखद शेवट एकात्मता परिषदेच्या आधी जेमतेम तीनचार दिवस झाला होता. ती घटना म्हणजे, २६ तारखेला पतितपावन संघटनेतर्फे रामोशी गेटाजवळ सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती, या पूजेला पतितपावन सघटनेचे शहरातल्या विविध भागातले कार्यकर्ते छोट्या छोट्या मिरवणुकांनी येत होते. 'इस देशमे रहना होगा, तो वंदेमातरम् कहना होगा', "पाकिस्तान जला दो" अशा घोषणा कार्यकर्ते देत होते. अशीच एक मिरवणूक संध्याकाळी साडेसातच्या सुमारास रामोशी गेटाजवळ पोचली आणि तिच्यानंतर अर्धा–पाऊण तासाने सायकली–स्कुटरवरून पूजेला चाललेल्या पतितपावनच्या आठ–दहा कार्यकर्त्यांवर मुस्लिम तरुणांच्या एका टोळक्याने सशस्त्र हल्ला केला. त्यामध्ये पतितपावनचे चार कार्यकर्ते जखमी झाले. वातावरण तंग झाल. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून हल्लेखोराना अटक केली. वातावरण थोडसं निवळलं. जखमी कार्यकर्त्यांपैकी तिघेजण बरे झाले, पण श्रीकात लिंगायत हा तरूण जास्त जखमी झाला होता. अखेर त्यातच त्याचं दुःखद निधन झालं. एरवी लढाऊ म्हणून प्रसिद्ध असलेल्या पतितपावनच्या कार्यकर्त्यांनी यावेळी मात्र चांगला सयम ठेवला. पुण्यातल्या काही समंजस मुस्लिम युवकानीही या हत्येचा एका पत्राद्वारे जाहीर निषेध केला. भरपूर पोलिस बंदोबस्तात श्रीकातच्या पार्थिव देहावर अन्त्यसंस्कार करण्यात आले.

या काही स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील घटनांची इथे थोड्याशा विस्तारानं नोद घेण्याचं कारण, पुण्यात झालेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेचं खरं स्वरूप त्याशिवाय लक्षात येणार नाही. झाडाला पानं यावीत तशी या परिषदेची कल्पना कुणाला स्फुरली नाही. वर उल्लेखिलेल्या घटनांची पार्श्वभूमी तिला निश्चितच होती. श्री. माजगावकरांनी आपल्या सपादकीयात म्हटल्याप्रमाणे ते 'प्रत्युत्तर' होतं; राजकीय प्रतिपेच होता. मीनाक्षीपुरमच्या घटनेतून जनजागरण अभियानाची कल्पना निघाली, तर या जागरणावर पाणी मारलंच पाहिजे, या उद्देशाने राष्ट्रीय एकात्मता परिषदेची आखणी सुरू झाली. मात्र 'हिंदू' शब्दाच्या 'द्वेषातून' हे सुरु झालं असं वाटत नाही. एकात्मता परिषदेत व्यासपीठावरून बोललेल्या अनेक वक्त्यांनी 'हिंदुस्तान' हा शब्द निःसंकोचपणे उच्चारला. नुसत्या 'हिंदु' शब्दाचाही त्यांना द्वेष नाही, राजकीय गैरसोय जास्त वाटते !

राष्ट्रीय एकात्मता परिषद हा जनजागरण अभियानाला टाकलेला राजकीय प्रतिपेच, प्रत्युत्तर असल्याचं वर म्हटलं आहे. म्हणजे, अभियानातही काही तरी राजकीय पेच निर्माण करणारा हेतू दडलेला होता, हे त्यातून सूचित होतं. अभियानाची मोहीम म्हणजे धर्मवादाचं राजकारण होतं. हा देश कोणाच्या मालकीचा, तर हिंदु धर्मियाच्या, असं त्यामधून सुचवलेलं होतं. मग अन्य धर्मियांचं काय ? त्यानी इथे राहयला हरकत नाही, पण या देशावर मालकी हक्क हिंदूचाच !

यातूनच निर्माण होणारा पुढला प्रश्न म्हणजे, 'हिंदु' कोणाला म्हणायच? या प्रश्नावर तर गेल्या शतकापासून आजतागायत वादावादी सुरू आहे. याबाबत थोडासा व्यापक दृष्टिकोन घेणारे स्वा. सावरकराची 'हिंदु' शब्दाबद्दलची व्याख्या पुढे करून असं म्हणतात की, सिंधु नदीपासून हिंदी महासागरापर्यंत असलेली भूमी ज्याला पुण्यभूमी पितृभूमी वाटते, तो प्रत्येकजण हिंदु आहे ! पण अभियानवाल्यांची या व्याख्येला मान्यता आहे का ? आपल्या मोहिमेत त्यांनी वापरलेलं 'धर्मो रक्षति रक्षितः' हे बोधवाक्यच त्यांची याबाबतची प्रतिक्रिया नकळत, पण स्पष्टपणे सागून जातं. या बोधवाक्याचा मूळ संदर्भ काय ? महाभारतात धर्मराजाने असे उदगार काढले आहेत की,

धर्म एव हतो हन्ति, धर्मो रक्षति रक्षितः।
तस्माद्धर्मं ना त्यजामि,
मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥

या उद्गाराचा मथितार्थ असा की, जो कोणी धर्माचा नाश करू पाहतो त्याचा धर्माकडूनच नाश केला जातो. जो कोणी धर्माचं रक्षण करतो त्याचं धर्माकडूनही रक्षण केलं जातं. म्हणून मी धर्माचरण करतो. (म्हणजे धर्मराजही स्वनाशाच्या भितीपोटीच धर्माचरण करत होतो तर ! )

यावरून हे स्पष्ट होईल की, अभियानवाल्यांना अभिप्रेत असलेली 'हिंदु' शब्दाची व्याख्या भौगोलिक स्वरूपाची नसून धर्माधिष्ठित आहे. मग आता हिंदुधर्मीय कोण ? तर प्रत्येक धर्माच्या काही श्रद्धा, संस्कृती परंपरा आहेत. त्याचं जो आचरण करतो तो त्या त्या धर्माचा, म्हणून ओळखला जातो. तेव्हा हिंदु धर्मातल्या श्रद्धा, संस्कृती, परंपरांचं जो आचरण करतो तो हिंदुधर्मीय ! हे मानणाऱ्या, पालन करणाऱ्या व्यक्तिचंच संघटन अभियानवाल्याना मुख्यत्वे अभिप्रेत होतं. तसं ते नसतं, या मोहिमेद्वारे किमान हिंदुमधील दलिताशी समाननेचं, जवळिकीचं नातं निर्माण करण्याची त्यांची मनापासून इच्छा असती तर दलिताना सर्वात जास्त दुखावणारा, त्याचा 'वीक पॉइंट' असलेला 'मनुस्मृति' हा ग्रथ पुण्यातल्या अभियान सागता मिरवणुकीत अग्रभागी ठेवला गेला नसता. या संदर्भात खाजगीत बोलताना अभियानामधील एका जबाबदार कार्यकर्त्याने

MANOOS ( Marathi Weekly ) 100 Paise Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ).

असं सांगितलं की, तो ठेवण्याची आमची इच्छा नव्हती. उलट आमचाही त्याला विरोधच होता. पण अनवधानाने तो ठेवला गेला. दुर्लक्ष, इतक्या नाजुक सामाजिक प्रश्नाविषयी दुर्लक्ष, हा जास्त अक्षम्य अपराध आहे ! बरं, मिरवणूक चालू असतानाच ही चूक लक्षात आली होती. मग लगेच तो काढून का घेतला नाही ? याचंही समाधानकारक उत्तर अभियानवाले देऊ शकत नाहीत. मिरवणुकीच्या अखेरीस घडलेल्या गैरप्रकारांना ते जबाबदार नसतील, त्यामध्ये त्याचा हातही नसेल, पण ते घडवून आणणारे या मिरवणुकीमध्ये सामील झाले होते एवढंच नव्हे, तर सबंध मोहिमेतील जबाबदार घटकापैकी ते होते. त्याना तसं समाविष्ट करून घेण्यात आलं होतं, हे तरी अभियानवाल्यांना नाकारून चालणार नाही. त्याच्याच शैलीत सांगायचं तर, श्वापदाच्या अंदाजाने दशरथाने सोडलेला बाण श्रावणाला लागला यात दशरथाचा जाणीवपूर्वक अपराध नसेल, पण त्यामुळे श्रावणाचा मृत्यू ओढवला आणि पुढलं सारं रामायण घडलं, हे विसरून चालणारं नाही.

या संदर्भातला शेवटचा मुद्दा– अशा तऱ्हेने एक पधरवडा साजरा करून विश्व हिंदू परिषदेसारखी संघटना काय साधू शकणार होती ? जागृती ? कोणत्या स्तरापर्यंत, किती खोलपर्यंत ? भिंती रंगवून, पोस्टरं डकवून, सभा, मेळावे भरवून, मिरवणुका काढून सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू करता येत असती तर या देशातले अनेक सामाजिक प्रश्न फार चटकन् सोडवता आले असते; पण दुर्दैवाने ते शक्य नाही. त्यासाठी परिषदेने देशात अनेक ठिकाणी मिशनरी पद्धतीनं चालवलेल्या स्पृहणीय खडतर कार्याचीच गरज आहे. त्याची व्याप्ती आणि खोली वाढवली तरच परिषदेला या अभियान मोहिमेद्वारे अभिप्रेत असलेली सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया काही अंशी घडून येऊ शकेल. नो शॉर्ट कटस् प्लीज !

या सबंध पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मता परिषदेत काय दिसलं ? 'हिंदुत्वा' पेक्षा 'भारतीयत्व' हे जास्त व्यापक तत्त्व आहे, असं समाजातल्या विविध थरांच्या मनावर ठसवण्याची प्रामाणिक, तळमळीची इच्छा या परिषदेच्या संयोजनामागे होती का ? दुर्दैवाने याचंही उत्तर 'नाही' असंच द्यावं लागतं. अभियानवाल्यांनी पुकारलेल्या धर्मवादाच्या राजकारणाला इथल्या व्यासपीठावरून असं उत्तर दिलं गेलं की, ठीक आहे. 'धर्मो रक्षति रक्षितः' असं मानणारे, त्यानुसार आचरण करणारे 'हिंदु' तुमचे आहेत ना, मग या देशात आमच्याकडेही काही सैन्य आहे. इथले मुस्लिम, दलित व इतर अल्पसंख्य तुम्हाला अभिप्रेत असलेली हिंदुत्वाची व्याख्या स्वीकारू शकणार नाहीत. या घटकांचा वापर आम्ही करून घेऊ. होऊन जाऊ दे !

मग एकदा राजकारणच म्हटल्यावर अभियान-मोहिमेच्या वेळी विश्व हिंदु परिषदेच्या पत्रकारपरिषदांमध्ये अभियानामागची भूमिका स्पष्ट करणारी निवेदनं वाटणारे राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्याही व्यासपीठावर दिसू लागले. समाजवादी, मार्क्सवादीही आले. आपण या परिषदेत का सामील झालो याचं मजेशीर, पण प्रामाणिक स्पष्टीकरण मार्क्सवादी पक्षाच्या एका जबाबदार कार्यकर्त्याने दिलं. तो म्हणाला, 'च्यायला, इतके दिवस काय होत होतं रे,' इथल्या राष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमानांनाही ज्याप्रमाणे सरसकटपणे 'अँटी–नॅशनल्स' म्हणून धोपटलं जातं, तसंच आम्हा कम्युनिस्टांचं १९६२ सालापासून होत आलं आहे. तेव्हा म्हटलं, आपलं 'नॅशनॅलिस्ट नेचर' सिद्ध करायला चांगली संधी आहे. घुसा ! परिषदेच्या प्रचारासाठी आम्ही शहरात जवळजवळ २५ सभा स्वतः पुढाकार घेऊन आयोजित केल्या. भिंती रंगवल्या, भाषणं केली, निधी उभारला. २० तारखेला अहिल्याश्रमातल्या परिषदेच्या ठिकाणी मिरवणुकीनं यायचं नाही, असं ठरविण्यात आलं होतं; पण आम्ही चांगला दीड–दोनशेचा मोर्चा घेऊन आलो. म्हटलं, काय होईल ते होईल. आपलं राष्ट्रीयत्व सिद्ध करण्याची ही संधी सोडायची नाही !'

परिषदेचं उद्‌घाटन करताना पुलंनी केलेलं सुमारे पाऊण तासाचं अघळपघळ भाषण वातावरणातला ताण कमी करणारं होतं. पण नंतरच्या वक्त्यांनी पुन्हा चढा सूर लावलाच परिषदेच्या ठरावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद यांना कोणत्याही मार्गानं मदत करू नये, अशी केलेली मागणी हल्ल्याचं खरं लक्ष्य उघड करणारी होती. जोडीला धर्मनिरपेक्षतेचा आव आणण्यासाठी 'जमाते इस्लामी'चं नाव ! पण याचबरोबर मराठा महासंघाला मात्र धक्का लावण्याची या मंडळीची प्राज्ञा नव्हती. त्या संदर्भात ठरावातली मोघम वाक्यं अशी– 'आर्थिक दुर्बलांना स्वतंत्रपणे सवलती मागण्याऐवजी मागासवर्गीयांच्या सवलती रद्द करण्याच्या मागण्या वारवार केल्या जातात. केवळ आर्थिक दुबळेपणामुळेच मागासलेपण नसतं. म्हणून मागासवर्गीयाचा सामाजिक मागासलेपणा दूर करण्यासाठी घटनेनुसार ज्या सवलती दिल्या जातात त्या चालू राहतील, असं शासनानं जाहीर करावं.'

तेव्हा जनजागरण अभियान काय किंवा राष्ट्रीय एकात्मता परिषद काय, दोन्ही ठिकाणी प्रयत्न एकच–आपल राजकारण पुढे रेटायचं ! आणि दोन्ही ठिकाणचा सर्वांत वाईट भाग हाच की, दोघाचाही आव आणि आवेश विश्वबंधुत्वाच्या, एकात्म मानवतावादाच्या तत्त्वाला कवेत घेऊन फिरण्याचा, प्रत्यक्षात प्रचार आणि कृती मात्र स्वतःच्याच पारंपारिक तत्त्वज्ञानाच्या भोवऱ्यात गिरक्या घेण्याची ! पण आपण तसं करत असल्याचं मान्य करण्याची मात्र दोघांचीही तयारी नाही !

हे सारं चित्र पाहिल्यावर खेद याचा होतो की, विसावं शतक संपत आलं असतानाही या देशात साधा 'माणूसपणा' अजून सर्व स्तरांवर निर्माण झालेला नाही. पण त्याची बोच, त्याची वेदना, इथल्या परंपरावाद्यांना किंवा पुरोगाम्यानाही जाणवत नाही. ते अजून 'आम्ही हिंदू' – 'आम्ही भारतीय' या वाद-चक्रातच भरकटत आहेत. भोवतालच्या समाजालाही त्यामध्ये ओढत आहेत.

□